भाजपच्या 'अफूच्या गोळी'वरील उतारा : विचक्षण बोधे

मानवी हक्क म्हणजे काय ? – नागार्जुन वाडेकर

भट्टी पक्षाची असो वा अपक्षाची चकाकते ते 'तांबे'च


पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ अंक ११ वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ फेब्रुवारी २०२३





# भाई और बहनों... जल्दही उडान लेंगे, लेकीन बाहर का वातावरण खराब है...

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ ।
अंक ११ । मूल्य : रु. ४० । दिनांक : १ ते १५ फेब्रुवारी २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.
**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822

**जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/- रुपये फक्त

**द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाइन पमटसाठा यथ स्कन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** भाई और बहनों... जल्दही उडान लेंगे, लेकीन बाहर का वातावरण खराब है....- ३ / बीबीसीने माहितीपट दाखवला भाजपला तो जुना अल्बम वाटला! - **जयदेव डोळे** - ५ / सुपारी राजकारणाचा नवा अध्याय - **अनंत बागाईतकर** - ७ / **दिल्ली दरबार :** भाजपच्या 'अफूच्या गोळी'वरील उतारा - **विचक्षण बोधे** - १० / मानवी हक्क म्हणजे काय ? - **नागार्जुन वाडेकर** - १३ / जवाहरलाल नेहरू विरुद्ध नरेंद्र मोदी - **शेषराव चव्हाण** - १६ / नमस्कार, मैं रविश कुमार... - **प्रा. अर्जुन अ. पगारे** - २० / वादांमुळं गाजलं मुस्लिम मराठी साहित्य संमेलन- **कलीम अजीम** - २२ / धर्मांतरविरोधी राजकारणाचे दुष्परिणाम - **डॉ. सुरेश वाघमारे** - २५ / प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा उलटा प्रवास - **प्रा. डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे** - २८ / **व्यक्तिविशेष :** शांताबाई कृष्णाजी कांबळे - **प्रो. डॉ. नितीश सावंत** - ३० / **ग्रंथ परिचय :** आई समजून घेताना : उत्कट भावनांच्या कल्लोळाचे प्रभावी चित्रण - **डॉ. अनमोल शेंडे** - ३२ / **कोणता भारत.. :** - ३३ - भट्टी पक्षाची असो वा अपक्षाची चकाकते ते 'तांबे'च । सरकारी शाळांचा अजून किती भो ऽऽऽ... देशभरात पसरतेय आता नोकऱ्या बदलण्याची साथ...। उर्फीच्या तंग कपड्यांनी पुरवलं राजकारणाला खाद्य । **कविता :** गांधी म्हणजे... - **हेमंत दिनकर सावळे** । तुकडे-तुकडे - **मेघराज मेश्राम** । - **श्रीपाद भालचंद्र जोशी** - ३८

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# भाई और बहनों... जल्दही उडान लेंगे, लेकीन बाहर का वातावरण खराब है...

इंडिया उडान ले रहा है, इंडिया दौड रहा है, इंडिया शायनिंग हो रहा है, इंडिया विश्वनेता हो रहा है... यांसारख्या अनेक घोषणा देणाऱ्या कारभाऱ्यांना ऑक्सफॅम या मानवाधिकार संघटनेने दाखवलेल्या आरशाने जमिनीवर आणले आहे. कारभारी दाखवत असलेला आरसा जत्रेतला आहे. त्यात झुरळही हत्तीसारखे दिसते. हाच आरसा दिल्लीपासून गल्लीपर्यंत गाजवण्यात आला. इतका, की लोकांमध्ये भ्रम निर्माण झाला. खरंच आपण धावत आहोत असं वाटायला लागलं. आत गेलेली पोटे आणि दारिद्र्याच्या निखाऱ्याचे चटके बसल्यानं हा भ्रम दूर झाला. त्यातच ऑक्सफॅमचा अहवाल आला आणि त्यातून कोण धावताहेत आणि कोण सरपटताहेत यावर लाल किल्ल्यावर चकाकणाऱ्या फ्लड लाईटप्रमाणे उजेड पडला. हा उजेड सांगतो, की भारतातील एक टक्का धनदांडग्यांकडे देशातील चाळीस टक्के संपत्ती आहे. संपत्तीची चटक लागलेले हेच धनदांडगे अजून संपत्ती मिळवण्यासाठी धावत आहेत. इंडिया त्यांचा आहे आणि तो शायनिंग मारतो आहे. देशात जे पन्नास टक्के गरीब लोक आहेत, त्यांच्या मालकीची म्हणजे पन्नास टक्के गरीब लोकांकडे फक्त तीन टक्के संपत्ती आहे. हा भारत आहे. तो भाकरीच्या भ्रमात जगतो आहे. श्रीमंत वेगाने वाढतो आहे आणि त्याच्या दुप्पट वेगाने गरीब वर्गही वाढतो आहे. भारतात २०२० मध्ये एकशे दोन धनदांडगे होते. २०२२ मध्ये त्यांची संख्या १६६ वर गेली. या सर्वांची संपत्ती एकत्रित मोजली, की ती ५४ लाख बारा कोटी म्हणजे भारताच्या अठरा महिन्यांच्या अर्थसंकल्पाइतकी होते. याचा अर्थ असा होतो, की अख्खा देश चालवण्याची क्षमता या १६६ जणांत आहे. प्रत्यक्षात मात्र ते देश चालवत नाहीत, तर लुटत राहतात. जल, जंगल आणि जमीन सारे काही व्यवसायाच्या नावानं लुटत असतात आणि ज्यांची लूट होते ती त्यांना कळू नये म्हणून इंडियाच्या तोंडावर रंग लावून तोच नाचवला जातो. इंडिया विरुद्ध भारत अशी ही स्पर्धा आहे आणि या स्पर्धे त भारताला रोज लुटून नग्न केले जात आहे. गोऱ्या ब्रिटिशांपेक्षा इंडियातले काळे लुटारू महाभयंकर आहेत की काय, असं वाटायला लागतं. या भानगडीत एक गंमत आहे आणि ती म्हणजे, कमीत कमी कर भरणाऱ्यांत या धनदांडग्यांचा समावेश आहे आणि जास्तीत जास्त कर भरणाऱ्यांत गरिबांचा समावेश आहे. त्यांनी कोणतीही गोष्ट अगदी जगण्यासाठीची आवश्यक गोष्ट खरेदी केली तरी त्यांच्यावर अनेक कर बसतात. त्यांचे जगणे आणि जगण्यासाठीचा प्रत्येक श्वास महाग होतो. धनदांडग्यांवर पाच टक्के जादा कर आकारला तरी देशातील सर्व गरिबांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटू शकतो; पण कर आकारणार कोण? सत्ताधारी स्वतःच श्रीमंत आहेत आणि ते भांडवलशाहीच्या कुशीत झोपत असतात. देशातील सगळी माध्यमे, सगळा निसर्ग आणि एवढेच नव्हे, तर शे-दोनशे लोकप्रतिनिधी विकत घेण्याची ताकद त्यांच्याकडे आहे. कोरोनाच्या काळात हे आणखी स्पष्ट झाले आहे. ज्यांचे उत्पन्न लाखो कोटींत आहे, ते पाच-पन्नास कोटी दान देत होते आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या कायद्याचा लाभ




घेऊन त्यावरचा करही वाचवत होते. त्यामुळेच देशातील ९९ टक्के लोकांच्या संपत्तीपेक्षा दुप्पट संपत्ती एक टक्का धनदांडग्यांकडे आहे. एक भयाण वास्तव घेऊन आपण जगतो आहोत. या वास्तवाच्या ओझ्याखाली सामाजिक लोकशाही, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायसारख्या मूल्यांचा कचरा होत आहे. आपण एका भयाण विषमतेत लोकशाही स्वीकारली आहे. शक्य तेवढ्या लवकर आपण विषमता संपवली नाही, तर देशात लोकशाही रुजणार नाही, असा इशारा जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला राज्यघटना सादर करतानाच देऊन ठेवला होता. हा इशारा आता वास्तवाचे रुप घेऊन आपल्या सर्वांच्या पुढे उगवला आहे. देशात आता सामाजिक लोकशाही नसून गरिबांची पिळवणूक

करणारी आणि धनदांडग्यांना आणखी मस्तवाल बनवणारी लोकशाही तयार झाली आहे. तिने इंडिया विरुद्ध भारत, बर्गर विरुद्ध बाजरीची भाकरी, मॉल विरुद्ध मोफत थाळी अशी विभागणी केली आहे. ती पूर्ण झाली आहे.

भारतातील दीड अब्ज म्हणजे जवळपास दीडशे कोटी श्रमिकांची अवस्था अतिशय बिकट आहे. ते अल्पकमाई आणि महागाईच्या चक्रात अडकले आहेत. जर पगार वाढलाच तर महागाईही दुपटी-तिपटीने वाढलेली असते. पैसा आहे; पण तो भाकरी देण्याइतका सक्षम नाही, अशी परिस्थिती तयार होते. आरोग्य, शिक्षण आणि एकूणच जगणे आदींचे गंभीर प्रश्न तयार होतात. एखाद्या आपत्तीच्या काळात तर ते आणखी गंभीर बनतात. कोरोनाच्या काळात असंख्य गरीब लोक मेले. जे जगले ते कंगाल झाले. धनदांडगे मात्र गब्बर झाले. कोरोनाकाळात जी काही राष्ट्रीय संपत्ती तयार झाली होती, त्यातील सत्तर टक्के संपत्ती एक टक्का असलेल्या धनदांडग्यांनी गिळली, तर राहिलेली तीस टक्के उरलेल्या गरिबांच्या वाट्याला आली. दरडोई रुपयाही आला नाही. गेल्या एका वर्षात भारतामध्ये गौतम अदानींच्या संपत्तीत ४६ टक्के वाढ झाली, तर तिकडे युरोपात एका वॉल्टन कुटुंबाच्या संपत्तीत साडेआठशे कोटी डॉलर इतकी वाढ झाली. हा खेळ असाच चालू आहे आणि याच खेळाला आपण लोकशाही म्हणत आहोत. लोकशाही असेल, तर ती भांडवलशाहीची रखेल ठरलेली आहे. तिला लोकांशी काहीच देणेघेणे नाही. लोकशाहीच्या मार्गाने मूठभर लोकांनी गर्भश्रीमंत होण्याचा हा खेळ आहे आणि या खेळात जगातील साठ टक्के जनता भूक, दारिद्र्य आणि उपासमारीच्या विस्तवात फेकली गेली आहे. अहवालानुसार, दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात विषमता वाढलेली आहे. श्रीमंत वर्ग कळसावर आणि गरीब दारिद्र्याच्या चिखलात रुतलेला दिसून येतो. श्रीमंतांची आणि उच्च मध्यमवर्गीयांची संपत्ती वाढू लागली, की महागाई वाढू लागते आणि तिचा फटका तळात सरपटत जगणाऱ्या गरिबांना सर्वप्रथम बसतो. महागाई पचवण्याची क्षमता श्रीमंतांमध्ये असते आणि गरिबांमध्ये ती नसते.

भांडवलशाही आपल्या रक्षणासाठी नवमध्यमवर्ग तयार करते. या वर्गाचा विकास होत नसला तरी त्याला थोडेफार चंगळवादी जीवन लाभते. अजून मोठे होणार या भ्रमात हा वर्ग खालच्या वर्गापासून तुटतो. तो कधी महागाई-बेकारीविरुद्ध आवाज उठवत नाही. आपल्यापासून फक्त श्वासाच्या अंतरावर असणाऱ्या गरिबांच्या मदतीला कधी जात नाही. मग आवाज उठवणार कोण? ज्यांनी आवाज उठवायचा त्यांची पोटे पाठीला चिकटली आहेत. वाढती बेकारी आणि महागाईच्या चक्रात तोच पिळवटून निघतो. यावरचा एक साधा उपायही अहवालात सांगण्यात आला आहे आणि तो म्हणजे मोजक्या श्रीमंतांवर फक्त पाच टक्के अतिरिक्त कर लावला म्हणजे जगातील किमान दोनशे कोटी लोकांना दारिद्र्याच्या चिखलातून बाहेर काढता येणे शक्य आहे; पण भांडवलदार ते करू देणार नाहीत. त्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे, गरिबांच्या पिवळवणुकीतूनच त्यांचे मनोरे उभे राहत असतात. पिळवणूक बंद झाल्यास नफा कमी होतो आणि दुसरे म्हणजे, कर वाढल्यावरही नफा कमी होतो. श्रीमंतांची नफ्याची तर गरिबांची भाकरीची भूक वाढत जाते. एक श्रीमंताचे घर पाच-पंचवीस हजार कोटी रुपयांचे तर शेजारीच फूटपाथवर झोपणाऱ्यांची किंवा पाणी नसताना, पोटात काही नसताना संडास घेणाऱ्यांची गर्दी वाढत असते.

पूर्वी काही वेळा भांडवलशाहीला वेसण घालण्याचे काम सरकार आणि जनचळवळी करायच्या. आता भांडवलदार आणि भांडवलशाही एकाच अंथरूणावर पहुडतात. चळवळीही भांडवलशाहीच्याच गर्भाशयातून आलेल्या एनजीओंनी खत्म केल्या आहेत. आता खालपासून वरपर्यंत मोठ्या भांडवलशाहीची म्हणजे कॉर्पोरेट कंपन्यांची सत्ता आहे. अभेद्य भिंतीत ती राहते. देशही तीच लुटते आणि सत्ताही तिच्याच मुठीत जाते आहे. एकट्या अदानीवर काही अतिरिक्त कर लावला तर दोन लाख कोटी रुपये उभे राहू शकतात आणि त्यातून पन्नास लाखांहून अधिक शिक्षकांना एका वर्षाच्या वेतनाइतकी रक्कम देता येणे शक्य होते. सर्वच भांडवलदारांनी स्वतःच्याच महागड्या शाळा आणि महागडे दवाखाने, महागडे रस्ते सुरू केल्याने ते गरिबांच्या शाळांकडे लक्ष देण्याची आवश्यकता नाही. आपली संपत्ती, आपली व्यवस्था त्यांनाच विकण्याची घाई



सरकारने चालवली आहे. लोकांनी बोंब मारू नये म्हणून कोणाला मोफत मूठभर धान्य, कुणाला मोफत गॅस तर कोणाला खिचडी देऊन असंतोष दाबून टाकण्याचा प्रयत्न होतोय. सरकार कर्ज काढून श्रीमंत उद्योजकांकडची संडासाची भांडी विकत घेते आणि गरिबांना ती मोफत देते. पाणी नसल्याने संडासाचा मोफत वापर होत नाही आणि पैसे नसल्याने गॅस पुन्हा विकत घेता येत नाही. सारे जग अशा एका विषमतेच्या खाईत अडकले आहे. जोडीला मूलतत्त्ववाद, राष्ट्रवाद, धर्मवाद, वंशवाद भरात आला आहे. 'आता कोठे धावे मन' या संत तुकारामांच्या अभंगासारखी सामान्यांची स्थिती झाली आहे. यावर उत्तर काय, असा सहज आणि स्वाभाविक सवाल अनेकांच्या ओठावर आल्याशिवाय राहत नाही आणि त्याचे उत्तर लोकांच्या प्रश्नातच असते. आपल्याला गुलाम करणारे, आपल्याला भुकेकंगाल बनवणारे, आपल्याला भ्रमात जगवणारे आणि आपल्याला उपाशी मारणारे सरकार आम्हाला नको, असे लोकांनीच सांगायला हवे. भांडवलशाहीच्या दावणीला रवंथ करणारे आम्हाला नकोत, हेही सांगायला हवे. ●●●

# बीबीसीने माहितीपट दाखवला भाजपला तो जुना अल्बम वाटला!



जयदेव डोळे

**इतिहास व भूतकाळ यांचे चर्वण करीत धार्मिक फाटाफूट करणारे राजकारण संघ परिवारच करतो जणू. बाकीच्यांना ते जमत नाही, असे नाही. ते बीबीसीने केले, की नाही हे माहीत नाही; परंतु काही जुन्या क्षणांचा अल्बम सर्वांसमक्ष उलगडून दाखवला तर त्यात चिडायला काय झाले? आपले ठेवावे झाकून अन् दुसऱ्याचे पहावे वाकून, ही भाजपची सवय देशाला ठाऊक झाली आहे.**

केवढा विरोधाभास आहे बघा. सारखा जुना इतिहास, प्राचीन प्रथा आणि भूतकाळ यांत आनंद मानणारा भारतीय जनता पक्ष २२ वर्षांपूर्वीचा त्याचाच भूतकाळ बघायला अन् बघू द्यायला तयार नाही. एरव्ही आपला देश कसा वैभवशाली होता हे सांगण्याची घाई झालेला हा पक्ष चक्क इतरांनी तो वेगळ्या रितीने दाखवला तर चिडचिड करू लागला आहे. २००१ साली गोध्रा या गुजराती गावच्या रेल्वे स्थानकापाशी काय झाले ते साऱ्यांना माहीत आहे. त्यानंतर पुढचे तीन दिवस सबंध राज्यात दंगली कशा उसळल्या तेही सारे जाणतात. त्या घटनांचीच उजळणी ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनने (बीबीसी) केली, तर भाजपच्या ऐतिहासिक नाकाला मिरच्या का झोंबल्या?

**भयापोटी अनेकांचा या विषयावर बोलण्यास नकार!**

'इंडिया. द मोदी क्वेश्चन' अशा शीर्षकाचा दोन भागांतला माहितीपट बीबीसीने जानेवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात प्रसारित केला. त्यात मुस्लिमांची कत्तल, त्यांच्या मालमत्तेची जाळपोळ आणि पोलिसांनी व राज्यकर्त्यांनी दंगलखोरांवर कारवाई करण्यात दाखवलेला 'संयम' असे बरेच काही आहे. काही पत्रकार, राजकारणी, लेखक, संशोधक यांच्या मुलाखती आहेत. दोन्ही बाजू दाखवायचा बीबीसीचा प्रयत्न त्यात दिसतो. सुमारे ३० जणांनी भयापोटी आमच्याशी या विषयावर बोलायला नकार दिला, असेही या पटातली माहिती सांगते.

दुसरा भाग फक्त इंग्लंडमध्येच प्रदर्शित झाला. पहिला मात्र भारतातही दिसला. तो बघण्यासाठी काही विद्यापीठे आणि शिक्षणसंस्था यांमधील विद्यार्थ्यांनी पोलिस तसेच भाजप यांच्याशी संघर्ष केला. का करावी लागली झटापट? हा माहितीपट बंदी घातलेला आहे का? सरकारने त्यावर अधिकृत मनाई घातली आहे का? गृहमंत्री वा प्रसारणमंत्री त्यासंबंधी काही बोलले आहेत का?

नाही. बंदी कोणीही घातलेली नाही. मात्र एक चलाखी नेहमीप्रमाणे भाजपने केली. सदर माहितीपट भारताची बदनामी करतो म्हणून तो न दाखवण्याची सूचना ट्विटर, यूट्यूब, टेलिग्राम आदी मंचांना दिली. त्या बाजारू पडद्यांवरून मग हा पट अदृश्य झाला.




**बीबीसीने केलेला प्रयत्न खोडसाळ असल्याचा भाजपचा आरोप**

माहितीपटाचे नाव मोदी असताना भारताची बदनामी कशी काय होते, हा पहिला प्रश्न. मोदी म्हणजे देश नाहीत, की कोणी महात्मा. शिवाय मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असतानाच्या घटनांची नव्याने नोंद घेण्यात आलेली आहे. याचा अर्थ, जुन्या घटनांची उजळणी काही

व्यक्तींच्या तोंडून केली गेली आहे. त्यावेळच्या भयंकर हिंसाचाराचा विस्मृतीत गेलेला इतिहास जगाला दाखवायचा प्रयत्न बीबीसीने केला आहे. तो खोडसाळ असल्याचा भाजपचा आरोप आहे.

खुद्द मोदी आणि भाजप यांनी एक खोडी काढली, नाही का? गेल्या दोन वर्षांपासून १४ ऑगस्ट हा दिवस 'विभिषिका दिन' म्हणून सरकार पाळते. मोदींनीच त्याची घोषणा केलेली आहे. 'हॉरर डे' म्हणजे काय, तर देशाची फाळणी आपण स्वतंत्र होत असताना झाली, त्याची याद असावी म्हणून त्या दिवसाचा सरकारी स्मरण दिन पाळायचा. भाजपला म्हणजे हिंदुत्ववाद्यांना या आडून खुणवायचे हे, की फाळणी झाली तेव्हा हिंदूंच्या कत्तली मुसलमानांनी केल्या आणि दोन, आपले स्वातंत्र्य ही फार आनंददायक घटना नाही; कारण ती प्राप्त करतेवेळी देशाचे तुकडे झाले. शिवाय 'आपले' लोक मारले गेले.

**संघ परिवाराचा दुष्टपणा**

याचा अर्थ, कित्येक वर्षांनी संघ परिवारच अशा एका इतिहासाची देशाला आठवण करून देतो, जो संपूर्ण देशाने जाणीवपूर्वक विसरायचा प्रयत्न केलेला आहे. म्हणूनच फाळणी या विषयावर तीन-चार चित्रपट, चार-पाच कादंबऱ्या आणि दोन टीव्ही मालिका या पलिकडे कलात्मक नोंदीसारखेही काही नाही. संघ परिवाराचा हा दुष्टपणा आणि नालायकपणा ठरतो. एक तर तो स्वतः कधी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी राहिला नाही. दुसरे, फाळणी मंजूर नव्हती तर ती न व्हावी यासाठी काही खटपट करायला हवी होती, तीही संघाने केली नाही. उलट फाळणीचा दोष एकट्या गांधींजींवर टाकून त्यांच्या खुनाला उपयुक्त असे वातावरण तयार केल्याचा आरोप संघावर झाला.




**बीबीसीचे चुकले काय?**

मग बीबीसीने संघाच्या लाडक्या 'हॉरर डे'ला तितक्याच भयानक दिवसांची आठवण करून दिली तर चुकले काय? गोध्रामुळे अवघा देश हादरलेला होता. त्यातून सावरतो न सावरतो तोच पुढचे तीन दिवस कत्तली उसळल्या आणि भारत पुन्हा एकदा शरमिंदा झाला. सूड, प्रतिशोध, जशास तसे या हिंस्त्र तत्त्वज्ञानाच्या प्रात्यक्षिकात भारताची पुरती बेइज्जती झाली. भाजपला या प्रात्यक्षिकात अव्वल क्रमांक मिळाला. लोक म्हणू लागले, गुजरात ही भाजपची प्रयोगशाळा ठरली. या शाळेत भारत मात्र नापास झाला. खरे तर, मोदीच नापास झाले होते. त्यांना वाजपेयी म्हणाले होते, तू राजधर्म विसरलास!

परवेज आलम हे बीबीसीचे निवृत्त पत्रकार. ते टीव्हीवर सांगत होते, की आणीबाणीवेळी याच भाजपचे नेते बीबीसीच्या बातम्या कानात प्राण ओतून ऐकत. बीबीसीला विश्वासार्हतेची शाबासकी देत. आपण स्वतः कित्येक वेळा अडवाणी, वाजपेयी आदी नेत्यांनी केलेली बीबीसीची तारीफ ऐकली आहे. त्यामुळे भाजप सत्तेत असतो, तेव्हा वस्तुस्थितीबाबत हळवा होतो. विरोधी पक्ष म्हणून वावरतो, तेव्हा बीबीसीचे कौतुक करतो.

चतुराई आणि चलाखी हे भाजपचे म्हणजे संघाचे गुणविशेष. दुटप्पीपणा अन् दुतोंडी व्यवहार तर खासच. पक्षनेते सर्वोच्च न्यायालयाचा हवाला देत सांगू लागले, की मोदी निर्दोष ठरले आहेत. तेव्हा उगाचच कशाला माहितीपटाचा आधार घेऊन संशय निर्माण करता? झाले गेले धुळीला मिळाले! मग त्यांना प्रश्न असा, की केशवानंद भारती वि. केंद्र सरकार या खटल्यात सारे स्पष्ट झालेले असताना न्यायमूर्तींच्या नेमणुकांचा मुद्दा पुन:पुन्हा उकरून का काढला जातो? मुघल, इराणी, अफगाणी, तुर्की वंशांचे मुसलमान राजे येऊन गेले अन् मातीमोलही झाले. त्यांची वारंवार आठवण संघ परिवार का करून देत असतो?

इतिहास व भूतकाळ यांचे चर्वण करीत धार्मिक फाटाफूट करणारे राजकारण संघ परिवारच करतो जणू. बाकीच्यांना ते जमत नाही, असे नाही. ते बीबीसीने केले, की नाही हे माहीत नाही; परंतु काही जुन्या क्षणांचा अल्बम सर्वांसमक्ष उलगडून दाखवला तर त्यात चिडायला काय झाले? आपले ठेवावे झाकून अन् दुसऱ्याचे पहावे वाकून, ही भाजपची सवय देशाला ठाऊक झाली आहे.

बीबीसीच कशाला, अलीकडे मनुस्मृती व रामचरितमानस यांवरून हिंदुत्ववादी खवळले. त्यांना पुन्हा ऐतिहासिक मिरच्यांचा ठसका लागला. जो इतिहास त्यांना वैभवशाली वाटतो तो जात, वर्ण, वंश, लिंग यांत किती भयंकर विषमता पाळत होता, याची याद त्यांना या ग्रंथांतून करून देण्यात आली होती.

मोदींनी आपला कब्जा भाजपवर केल्यापासून त्या पक्षात अनेकांची घुसमट होऊ लागली आहे. असा एखादा पक्ष एका माणसाच्या चरणी रुजू केला, की त्या चरणाखालील मातीत सारे मिसळून जातात, असा जगाचा इतिहास आहे. म्हणून 'क्वेश्चन' मोदींचाच नाही...! ●●●

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

# सुपारी राजकारणाचा नवा अध्याय



अनंत बागाईतकर

**सुपारी घेऊन राजकारण करणारे आणि किंवा राजकीय सुपाऱ्या घेणारे राजकारणी सुपारीबाज ही राजकीय जात किंवा जमात आता सर्वांना माहीती झालेली आहे. भारतीय राजकारणाला अशा सुपारीबाज एकांड्या राजकीय शिलेदारांची नव्याने ओळख करून देण्याची आवश्यकता नाही. आपल्या प्रतिस्पर्ध्यांना राजकीय चीत करणे किंवा मात देणे यासाठी या एकांड्या शिलेदारांना सुपाऱ्या देण्याची प्रथा जुन्या काळापासून सुरू आहे. राष्ट्रीय राजकारणातही अशी अनेक मंडळी आहेत. तूर्तास आपण महाराष्ट्राचा विचार करूयात.**

सध्या महाराष्ट्रात भाजप आणि भाजपपुरस्कृत-उपकृत फुटीर शिवसेना गटाचे संयुक्त सरकार सत्तेत आहे. या सरकारच्या टिकाऊपणाबद्दल सर्वांच्याच मनात शंका आहेत. भाजपपुरस्कृत हा प्रायोजित कार्यक्रम असला तरी त्याचे आयुष्य फार तर महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीपर्यंतच राहील, असा सार्वत्रिक कयास व समजूत आहे. म्हणजेच हा प्रयोग अल्पायुषी आहे, ही खूणगाठ सर्वांच्याच मनात आहे. त्यामुळे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीला खिंडार कसे पाडता येईल किंवा ही आघाडी खिळखिळी करणे, दुर्बल करणे आणि विधानसभा निवडणुकीत आपला राजकीय कार्यभाग कसा साधता येईल यासाठी प्रयत्न करणे हे भाजप व फुटीर शिवसेनेचे आद्यकर्तव्य असणे ही बाबही अपरिहार्य आहे. हे राजकारण आहे आणि ही उघडीनागडी राजकीय वस्तुस्थिती मान्य करायला काहीच हरकत नाही. या दृष्टिकोनातून वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सुरू केलेल्या राजकारणाचा विचार करावा लागेल.

इंग्रजीत ट्रोजन हॉर्स नावाचा शब्दप्रयोग आहे. ग्रीकांना ट्रॉय शहर काबीज करायचे होते आणि तेथील शूर योद्ध्यांमुळे त्यांना दीर्घकाळ ते शक्य झाले नव्हते. अखेर ग्रीकांनी शक्कल लढवली आणि एक अवाढव्य असा लाकडी घोडा तयार केला. तो आतून पोकळ ठेवला आणि त्या घोड्याच्या आत निवडक व तरबेज असे सैनिक लपवले. हा घोडा ट्रॉय शहराच्या वेशीवर नेला. ट्रॉयच्या लोकांनी तो घोडा गावात नेला आणि त्यानंतर घोड्याच्या पोटात लपलेल्या तरबेज ग्रीक सैनिकांनी अचानक हल्ला करून त्या शहराचा बचाव मोडून काढला आणि त्यानंतर ग्रीक सैन्य ट्रॉय शहरात शिरू शकले. म्हणजेच सध्या भाजप व फुटीर शिवसेनेला प्रतिस्पर्धी महाविकास आघाडी पोखरण्यासाठी अशा ट्रोजन हॉर्सची आवश्यकता भासू लागली आहे. ती जबाबदारी वंचित बहुजन आघाडीतर्फे पार पाडली जात आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीबद्दल महाविकास आघाडी गाफील राहिल्यास त्यांचा घात झाल्याखेरीज राहणार नाही.

**रिपब्लिकन चळवळीची शोकांतिका**

प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीबरोबर हातमिळवणी करण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस



यांनी त्यांच्या इच्छेला फारसा प्रतिसाद दिला नव्हता. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. भीमशक्ती व शिवशक्ती एकत्र येण्याची घोषणा केली. यामुळे महाविकास आघाडीला बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. प्रकाश आंबेडकर व उद्धव ठाकरे यांनी एकाच व्यासपीठावरून एकत्र येण्याची व हातमिळवणी करण्याची घोषणाही केली. उद्धव ठाकरे यांनी हा निर्णय परस्पर केला काय, यासंदर्भात त्यांनी महाविकास आघाडीतील दोन प्रमुख पक्ष काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याबरोबर आधी चर्चा केली होती काय आणि चर्चा, विचारविनिमय किंवा सल्लामसलत केली नसेल, तर प्रकाश आंबेडकर यांच्याबरोबर हातमिळवणी करण्याचा निर्णय त्यांनी एकतर्फी केला काय, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. उद्धव ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांचे राजकीय वारसदार जरूर आहेत; परंतु त्यांच्या राजकीय आकलनाच्या सखोलतेबद्दल शंका निश्चितच आहेत. प्रकाश आंबेडकर यांच्याबरोबर हातमिळवणी करण्याच्या त्यांच्या निर्णयाने या शंकेत भर पडलेली आहे. याचे कारण स्पष्ट आहे. प्रकाश आंबेडकर यांचे राजकारण अतिप्रवाही-अतितरल-अतिचंचल किंवा स्पष्ट भाषेत सांगायचे झाल्यास बेभरवशाचेच राहिले आहे. ते व त्यांचा पक्ष किंवा संघटना यांना राज्यात मर्यादित व विखुरलेल्या प्रमाणात पाठिंबा आहे, ही बाब कुणीच नाकारत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कुटुंबातील ते एक आहेत, ही त्यांची सर्वाधिक मोठी जमेची बाजू किंवा राजकीय भांडवल आहे. त्यामुळेच अजूनही त्यांना ठिकठिकाणी पाठिंबा मिळत असतो. मात्र नवबौध्द आणि दलित समाजात त्यांना सार्वत्रिक पाठिंबा आहे, अशी स्थिती नाही. डॉ. बाबासाहेबांना मानणारा समाज अनेक राजकीय

पक्षांमध्ये विखुरला गेलेला आहे, हे वास्तव आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर त्यांच्या कुटुंबातले असले तरी या समाजाची एकगठ्ठा मते त्यांच्या हातात आहेत, असा दावा ते करू शकणार नाहीत. डॉ. बाबासाहेबांना मानणारेच आणि त्यांचे अनुयायी असलेले रामदास आठवले यापूर्वीच आणि आता अलीकडेच जोगेंद्र कवाडे हे भाजपबरोबर गेलेले आहेत. रिपब्लिकन चळवळीची ही शोकांतिका आहे, की या पक्षाने स्वतंत्र व स्वाभिमानी अस्तित्व राखण्याऐवजी सत्तेसाठी राजकीय तडजोडवाद पत्करला आणि चळवळच संपुष्टात आणली. हे मत बहुजन समाज पक्षाचे संस्थापक कांशीराम यांनी अनेक वेळेस आणि संसदेच्या व्यासपीठावरूनदेखील व्यक्त केले होते. थोडक्यात, प्रकाश आंबेडकर हेही या राजकीय तडजोडवादाला अपवाद ठरलेले नाहीत.

**आपण संघ परिवार व भाजपबरोबर कधीच गेलेलो नाही**

आपण किंवा आपल्या पक्षाने कधीही रा.स्व.संघ परिवार व भाजपबरोबर हातमिळवणी केलेली नाही, असे प्रकाश आंबेडकर यांनी उच्चरवाने सांगितले आहे; परंतु आता सर्वसामान्यांनादेखील यातील फोलपणा किंवा पोकळपणा लक्षात येतो. त्यांच्याच रिपब्लिकन परिवारातील दोन नेते भाजपच्या छत्राखाली गेल्यामुळे प्रकाश आंबेडकरांची अडचण होणे अगदी स्वाभाविक आहे; परंतु राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी थेट हातमिळवणीच केली पाहिजे, असा नियम नसतो. ज्याप्रमाणे टेबलावरून उघड हातमिळवणी होते तशीच ती टेबलाखालूनदेखील होऊ शकते ही गोष्ट चतूर, चलाख प्रकाश आंबेडकरांनाही चांगलीच माहीत आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत सोलापूर मतदारसंघातून ते काँग्रेसचे सुशीलकुमार शिंदे यांच्या विरोधात उभे राहिले. परिणाम काय झाला हे सर्वांच्याच समोर आहे. सोलापूरच्या मतदारांना असा एक लोकप्रतिनिधी मिळाला, की तो काय करतो हे कुणीच सांगू शकणार नाही. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी या नावाचे एक स्वामी महाराज सोलापूरचे प्रतिनिधित्व लोकसभेत करतात. याचे श्रेय प्रकाश आंबेडकर यांना जाते. कारण त्यांनी जी मते खाल्ली तेवढ्या मताधिक्याने स्वामी महाराज सोलापूरहून निवडून आले किंवा उलटे म्हणता येईल, की आंबेडकर व शिंदे यांच्या मतांची बेरीज केल्यास ती भाजपच्या उमेदवाराला पराभूत करणारी होती. भाजपविरोधी मतांची विभागणी होऊ नये आणि धर्मनिरपेक्ष शक्तींचा विजय व्हावा अशी जर आंबेडकरांची ठाम धारणा असती, तर ते सोलापूरहून उभे राहिले नसते. त्यामुळे आपण संघ परिवार व भाजपबरोबर कधीच गेलेलो नाही, हा प्रकाश आंबेडकरांचा दावा मान्य होणारा नाही. कदाचित ते त्यामध्ये एक शब्द विसरले असावेत. 'उघडपणे' आपण कधीच संघ परिवार किंवा भाजपबरोबर गेलेलो नाही, असे बहुधा त्यांना म्हणायचे असावे. मजलिस इत्तेहादुल मुसलमीन ऊर्फ एमआयएम हा पक्ष आणि त्याचे नेतृत्व हाच दावा करतात, की ते संघ परिवार व भाजपच्या घोर विरोधात आहेत आणि त्यांना जन्मात मदत करणार नाहीत की त्यांच्याशी हातमिळवणी करणार नाहीत. या त्यांच्या दाव्यातही 'उघड' हा शब्द ते सोयीस्करपणे विसरत असतात. बिहारमध्ये अलीकडेच झालेल्या पोटनिवडणुकांमध्ये ज्या ठिकाणी एमआयएमने उमेदवार उभा केला त्या ठिकाणी भाजपविरोधी पक्षाचा पराभव



झालेला आहे. एमआयएमने खाल्लेल्या मतांची संख्या बघितल्यावरच ते कुणाच्या मदतीसाठी उभे राहिले, हे स्पष्टपणे लक्षात येते.

**राजकीय लाभाचा मुद्दाही यामागे असू शकतो**

आंबेडकरांची विशिष्ट कार्यशैली आहे. सध्या ते काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर निशाणा साधून आहेत. याचे कारण एवढेच आहे, की या दोन्ही पक्षांचे तोंड दुधाने पोळलेले असल्याने ते आता सावधगिरीने पावले टाकत आहेत. या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वाचे स्पष्ट म्हणणे आहे, की प्रकाश आंबेडकर हे भरवशाचे नाहीत आणि दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, आपल्या ताकदीपेक्षा अवाजवी अशा जागांची ते मागणी करीत असतात. ही अवाजवी मागणी मान्य न झाल्यास ते निवडणूक समझोता मोडून सर्वत्र आपले उमेदवार उभे करून भाजपविरोधी मतांची विभागणी करायला मोकळे होतात. हा आजवरचा अनुभव आहे आणि हे ते का, कशासाठी आणि कुणाकरता (म्हणजे कोणत्या पक्षासाठी) करतात हे अनाकलनीय आहे. या खेळात ते स्वतःचे किती उमेदवार निवडून आणू शकतात, याचा ताळेबंद सर्व महाराष्ट्राला माहीत आहे. म्हणजेच स्वतः जिंकायचे नाही आणि इतरांना म्हणजे भाजपविरोधी पक्षांच्या उमेदवारांची पाडापाडी करायची. या खेळात प्रकाश आंबेडकरांना कोणता लाभ मिळतो हे त्यांनीच कधीतरी उघडपणे सांगितल्यास महाराष्ट्राच्या ज्ञानात भर पडेल. थोडक्यात सांगायचे झाल्यास, त्यांनी स्वतःची विश्वासार्हता स्वतःच्या हाताने नष्ट केलेली असल्याने आता कोणताच प्रमुख राजकीय पक्ष त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास तयार नाही. त्यामुळे त्यांनी सक्रिय राजकारणात नवखे असलेल्या उद्धव ठाकरे यांना हाताशी धरले असावे. शिवसेना आपल्याला राज्यसभेत पाठवू शकते, हा एक राजकीय लाभाचा मुद्दाही यामागे असू शकतो.

**...ते स्वतःचेच खरे स्वरूप उघड करीत सुटले आहेत**

महाविकास आघाडीच्या जनाधाराचे स्थूलमानाने वर्गीकरण करायचे झाल्यास, प्रामुख्याने मराठा व ओबीसी यामध्ये या आघाडीतील जनाधार विभागलेला आहे. काँग्रेसचा स्वतःचा असा दलित समाजातील मतदारवर्ग आहे. तसेच अल्पसंख्याक समाजाची बहुसंख्य मते ही काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच विभागलेली असतात. ओबीसी समाजाचे मोठे नेते या आघाडीत आहेत. थोडक्यात, सामाजिकदृष्ट्या महाविकास आघाडीचा जनाधार उल्लेखनीय मानावा लागेल. प्रकाश आंबेडकरांमुळे दलितांचा एक वर्ग महाविकास आघाडीबरोबर येऊ शकतो आणि मूळच्या जनाधाराला त्याची मदत होऊ शकते, असा राजकीय हिशोब यासंबंधी मांडला जातो. त्यामुळे प्रकाश आंबेडकरांना बरोबर घेण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी पुढाकार घेतला; परंतु काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस हे अनुभवी

पक्ष आहेत. त्यामुळे ते सहजासहजी प्रकाश आंबेडकर यांना बळी पडणार नाहीत. त्यामुळेच प्रकाश आंबेडकरांनी आता राष्ट्रवादी काँग्रेस आणि पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्यावरच भाजपशी लागेबांधे असल्याची टीका सुरू केली आहे. थोडक्यात, आपले अंतःस्थ संबंध उघडकीस येऊ नयेत यासाठी त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. मात्र या प्रक्रियेत ते स्वतःचेच खरे स्वरूप उघड करीत सुटले आहेत. आता या त्यांच्या विधानांमुळे ते महाविकास आघाडीत कशासाठी शिरकाव करू इच्छितात याची चुणूक किंवा झलकच त्यांनी सादर केली आहे. त्यांचे आताचे वागणे त्यांच्या नियमित कार्यशैलीचा सर्वात मोठा पुरावाच आहे. आता लवकरच ते स्वतःहून शिवसेनेबरोबरची आघाडी तोडतील, त्याचे खापर इतरांवर फोडतील आणि ठिकठिकाणी त्यांचे उमेदवार उभे करून महाविकास आघाडीचे उमेदवार पराभूत करण्यासाठी प्रयत्नशील राहतील. या सर्व गोष्टींचे सूत्रधार किंवा कर्तेकरविते कोण असतील हे सांगण्याचीही गरज नाही. कारण महाराष्ट्रातली सुबुद्ध, सुजाण जनता या मंडळींचे खरे स्वरूप पुरेपूर ओळखून आहे.

**भाजपमध्ये प्रवेश करूनही त्यांचा आत्मा शांत झालेला नाही**

भारतीय राजकारणात अशी विघ्नसंतोषी मंडळी प्रसिद्ध आहेत. राम जेठमलानी आज हयात नाहीत; परंतु त्यांनी राजकारणात मारलेल्या असंख्य कोलांटउड्या आणि त्या मारताना त्यांनी त्या त्या वेळच्या त्यांच्या राजकीय विरोधकांवर घेतलेले तोंडसुख हे गाजलेले होते. भाजप, जनता पक्ष, कधी काँग्रेस तर कधी एखादा प्रादेशिक पक्ष असा त्यांचा सततचा बदलता राजकीय प्रवास अखेरपर्यंत चालू राहिला. सुब्रम्हण्यम स्वामी हे आणखी एक उदाहरण. त्यांनीही अनेक राजकीय पक्षांबरोबर सोयरिकी केल्या आणि वेळोवेळी मोडल्या. आता त्यांच्या अखेरच्या टप्प्यात भाजपमध्ये प्रवेश करूनही त्यांचा आत्मा शांत झालेला नाही. राज्यसभेची मुदत संपल्यानंतर त्यांना पक्षाने चक्क वाऱ्यावर सोडून दिल्याने ते प्रचंड खवळलेले आहेत. आता त्यांनी पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्र्यांवर आगपाखड सुरू केली आहे; परंतु आयुष्यभर केवळ राजकीय विध्वंसक म्हणूनच काम केलेल्या या नेत्यांची विश्वासार्हता एवढी खालावलेली असते, की मग कुणीच त्यांना भीक घालीनासे होतात. सत्ताधारी पक्ष अशा राजकीय जिवाणूंचा त्यांना होईल तेवढा उपयोग करून घेत असतात आणि उपयोग झाला, की त्यांना वाऱ्यावर सोडून देत असतात. त्यामुळे महाराष्ट्रात आता शिवसेना व प्रकाश आंबेडकर यांच्या हातमिळवणीने कोणते राजकीय समीकरण उदयास येते, याची प्रतीक्षा करावी लागेल.

**हे राजकारणतले एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण**

प्रकाश आंबेडकर यांच्या कार्यशैलीचा आणखी एक पैलू म्हणजे ज्या राजकीय पक्षाबरोबर हातमिळवणी करायची त्या पक्षाच्या फक्त सर्वोच्च नेत्याबरोबरच त्यांचा संपर्क असला पाहिजे, असा त्यांचा अट्टाहास असतो. काँग्रेस पक्षाबरोबर त्यांनी हातमिळवणी करण्याचे जेव्हा जेव्हा प्रयत्न केले, तेव्हा आपण सोनिया गांधी यांच्याशिवाय अन्य कुणाबरोबर बोलणी करणारच नाही असा त्यांचा खाक्या असायचा. त्यामुळे त्या काळातील सोनिया गांधी यांचे राजकीय सचिव असलेले अहमद पटेल किंवा अन्य मंडळी ही प्रकाश आंबेडकरांच्या



या अट्टाहासावर नाराज असायची. काँग्रेसमध्ये अधिकारांचे विविध स्तर असतात. सोनिया गांधी यांचा निर्णय अंतिम असला तरी तो निर्णय झाल्यानंतर त्यांना भेटण्याची शिष्टाचार किंवा औपचारिकता पार पाडली जात असे. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर आणि त्यानंतरच्या विधानसभा निवडणुका परस्परांच्या विरोधात लढून पुन्हा सरकारस्थापनेसाठी आघाडी करताना सोनिया गांधी व शरद पवार हे एकमेकाला कधीच भेटले नव्हते. ती पहिली आघाडी सर्वोच्च नेतृत्वाच्या भेटीशिवाय स्थापन झालेली होती, हे राजकारणतले एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण मानावे लागेल. कालांतराने दोन्ही नेत्यांमधील संबंध सुधारल्यानंतर भेटीगाठी सुरू झाल्या, हे येथे नमूद करावे लागेल. आता मल्लिकार्जुन खर्गे हे दलित समाजाचे नेते काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांना प्रकाश आंबेडकरांबद्दल भरपूर माहिती आहे. त्यामुळे काँग्रेसपुढे आता त्यांची डाळ शिजणे शक्य नाही. गेल्या दोन-तीन निवडणुकांमध्ये काँग्रेसने त्यांना अजिबातच भाव दिला नव्हता आणि तोच प्रकार यापुढेही चालू राहील, अशी चिन्हे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतेही त्यांना चांगलेच ओळखून आहेत आणि म्हणूनच या दोन्ही पक्षांनी त्यांच्याबाबत उदासीन धोरण ठेवले आहे.

**आघाडीतील तीनही पक्ष तुल्यबळ आहेत**

प्रकाश आंबेडकरांमुळे महाविकास आघाडीतील जागावाटपाचे गणितही बिघडू शकते आणि त्यामुळेच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस हे त्यांना आघाडीत औपचारिकरीत्या सामील करून घेण्यास तयार नाहीत. विधानसभेच्या २८८ जागा आहेत. आघाडीतील तीनही पक्ष तुल्यबळ आहेत. त्यामुळे या तीन पक्षांमध्ये समसमान जागावाटप झाले तरी प्रत्येकाच्या वाट्याला ९६ जागा येतील. म्हणजेच प्रत्येक पक्षाला शंभरपेक्षा कमी जागांवर लढावे लागेल. हे अत्यंत ढोबळ वर्गीकरण झाले. गेल्या निवडणुकीत कोण कोणत्या जागी विजयी झाले, त्या जागा सोडण्यास कोणताही पक्ष तयार होणार नाही. त्यामुळे पराभूत झालेल्या पण दुसऱ्या क्रमांकावर ज्या पक्षाचा उमेदवार असेल त्या जागांवरच तडजोड करावी लागणार आहे. ते करताना प्रत्येक पक्षाकडील जिंकण्याची क्षमता असलेला उमेदवार, त्या पक्षाचे प्रभावक्षेत्र, सामाजिक स्थिती हे इतर निकष लागू होतील. त्यामुळे महाविकास आघाडीलाही जागावाटपाचा विशिष्ट असा फॉर्म्युला तयार करावा लागेल व त्यात प्रकाश आंबेडकरांना कसे सामावून घ्यायचे हे सर्वानुमते ठरवावे लागेल. तूर्तास शिवसेनेने स्वतः च्या कोट्यातून आंबेडकरांना जागा द्यावेत असेच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे बोलले जात आहे. त्यामुळे शिवसेनेलाही त्याबाबत फेरविचार करावा लागणार आहे. थोडक्यात, आघाडीत बिघाडी होणार नाही याची पूर्ण दक्षता तीनही पक्षांना घ्यावी लागेल. त्यासाठी बेभरवशाच्या राजकीय घटकांना त्यांनी दूर ठेवणेच त्यांच्या हिताचे ठरणार आहे. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# भाजपच्या 'अफूच्या गोळी'वरील उतारा

**अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाची तरतूद संविधानाने केली आहे. इंद्रा सहानी प्रकरणातील निकालामुळे ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येणार नाही; पण त्याच सर्वोच्च न्यायालयाने दुर्बल घटकांचे आरक्षण वैध ठरवले आहे. जातीनिहाय जनगणना केली, तर ओबीसींच्या आरक्षणाचाही पुनर्विचार करावा लागेल. या सगळ्या प्रक्रियेत भाजपच्या अफूच्या गोळीतील कणिका आणि कवच दोन्ही वेगवेगळे होईल. मग धर्माचे राजकारण भाजपला लाभ मिळवून देण्याची शक्यता कमी होते. बिहारमध्ये जातीनिहाय जनगणना यशस्वी झाली, तर मंडलीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याची प्रक्रिया भाजपला रोखता येणार नाही. कदाचित 'अफूच्या गोळी'वर हाच उतारा असू शकेल.**

**विचक्षण बोधे**

भाजपच्या हिंदुत्ववादाच्या राजकारणाला कसे उत्तर द्यायचे, ही विरोधी पक्षांची विवंचना आठ वर्षांनंतरही संपलेली नाही. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी भाजपवर मात केली. तिथल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पारंपरिक डाव्या विचारांच्या मतदारांनी ममतांवर रागावून भाजपला मते दिल्यामुळे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे १८ खासदार निवडून आले होते; पण हा राग कमी झाल्यावर ही मते तृणमूल काँग्रेसकडे वळली. शिवाय मोदी-शहांच्या प्रचारात मोठी गडबड झाल्याने तिथे भाजपला यश मिळाले नाही. दक्षिणेत तामिळनाडू, केरळ, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये भाजपचे अस्तित्व नाही. कर्नाटक वगळता दक्षिणेकडील राज्यांमध्ये भाजपचा हिंदुत्वाचा प्रयोग यशस्वी होऊ शकलेला नाही. सध्या तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि केरळ या तीन राज्यांवर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे; पण या राज्यांमध्ये तिथल्या प्रादेशिक पक्षांना आव्हान देणे आत्ता तरी कठीण आहे. ही राज्ये वगळली तर, इतर राज्यांमध्ये भाजपच्या विजयाची घोडदौड विरोधकांना थांबवता आलेली नाही. भाजपने कमंडलू मंडलने भरून टाकल्याने विरोधी पक्षांची कोंडी झाली.

**काँग्रेसने कधीच ओबीसींचे राजकारण केले नाही**

भाजपने केवळ हिंदुत्वाच्या मुद्द्यावर राजकारण केले असते, तर विरोधकांना भाजपवर मात करता आली असती; पण भाजपने हिंदुत्वाला ओबीसी राजकारणाची जोड दिल्यामुळे प्रामुख्याने प्रादेशिक पक्षांच्या राजकारणाला मोठा धक्का बसला. लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ देशाचे नेतृत्व वा परदेशी व्यासपीठांवर भारताचा राष्ट्रवादी चेहरा म्हणून मतदारांसमोर जात नाहीत. मोदी ओबीसी समाजातील असून मध्यम-मागास जातींमधून आलेले पंतप्रधान म्हणून लोकांसमोर जात असतात, देशाला विकसित करण्याची ग्वाही देत असतात. काँग्रेसने कधीच ओबीसींचे राजकारण केले नाही. उत्तर प्रदेश-बिहारसारख्या राज्यांमध्ये





प्रादेशिक पक्ष प्रबळ असले, तरी मोदींसमोर तेही निष्प्रभ ठरले. अशा वेळी भाजपच्या राजकारणाला जातीनिहाय जनगणनेतून आव्हान देता येऊ शकेल का, हा प्रश्न विरोधी पक्ष विचारत असतील, तर १५ महिन्यांवर आलेल्या आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये हा प्रचाराचा प्रमुख मुद्दा असू शकतो.

**देशात ५२ टक्के ओबीसी समाज**

भाजपने राजकारणातील स्वतःची 'अस्पृश्यता' नाहीशी करण्यासाठी लोहियावादी नेत्यांचा मंडल अजेंडा हिसकावून घेतला. इतकेच नव्हे, या नेत्यांनाही आपल्या पोटात घेऊन टाकले. काँग्रेसविरोधाचे बाळबोध राजकारण करता करता भाजपने त्यांचे अस्तित्व दुय्यम ठरवून टाकले हे या नेत्यांना कळलेही नाही. 'भारत जोडो' यात्रेच्या निमित्ताने योगेंद्र यादव यांच्यासारख्या लोहियावादी नेत्याचा काँग्रेसविरोध बोथट होऊ लागला आहे, ही भाजपविरोधी राजकारणासाठी बरी गोष्ट म्हणायची! माजी पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारून देशाच्या राजकारणाची दिशा बदलून टाकली. मंडल आयोगाने देशात ५२ टक्के ओबीसी

समाज असल्याचे म्हटले होते. दर दहा वर्षांनी जनगणना होते. त्यामध्ये धर्माच्या आधारावर लोकसंख्येची विभागणी समजते, तसेच अनुसूचित जाती-जमातींची नेमकी संख्याही कळू शकते; पण या जनगणनेमध्ये ओबीसी जातींची गणना होत नाही. १९३८ मध्ये जातीनिहाय जनगणना झाली होती. त्यानंतर जातीनिहाय लोकसंख्या मोजली गेली नसल्याने मंडल आयोगाच्या अहवालातील ओबीसींची आकडेवारी ग्राह्य धरावी लागते; पण या आकडेवारीनुसार ओबीसींना शैक्षणिक, सामाजिक वा राजकीय आरक्षण मिळत नाही. भाजपने लोहियावादी नेत्यांकडून मंडलचा अजेंडा बळकावला; पण ओबीसींच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवला नाही. आता बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीशकुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्या संयुक्त सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. पहिल्या टप्प्याचे काम प्रगतिपथावर आहे, दुसरा टप्पा मार्चमध्ये कार्यान्वित केला जाईल. यामुळे जातीनिहाय जनगणना करणारे बिहार हे देशातील पहिले राज्य ठरेल. या गणनेतून बिहारमधील ओबीसींची संख्या खरोखर निश्चित झाली. ही संपूर्ण प्रक्रिया वादातीत राहिली. तर अन्य राज्यांना बिहारच्या प्रयोगाची पुनरावृत्ती करता येईल. बिहारमधील प्रयोगाच्या यशावर देशाच्या राजकारणाची दिशा अवलंबून असेल, म्हणून ही जनगणना महत्त्वाची आहे.

**लालूंनी कधीही भाजपशी जवळीक साधली नाही**

समाजवादी नेते शरद यादव यांच्या निधनानंतर पुन्हा राजकीय वर्तुळात ओबीसी राजकारणाची चर्चा केली गेली. जेपींच्या आंदोलनातून आणि काँग्रेसच्या उच्चवर्णीयांच्या भोवती फिरणाऱ्या राजकारणाला छेद देणाऱ्या लोहियावादी विचारातून आणीबाणीनंतर नवे राजकीय नेतृत्व विकसित झाले. मुलायमसिंह यादव, लालू प्रसाद यादव, नितीशकुमार, शरद यादव हे नेते आत्तापर्यंत देशाच्या राजकीय पटलावर कमी-अधिक प्रमाणावर प्रभाव टाकत राहिले. शरद यादव वगळले तर उर्वरित नेते उत्तर प्रदेश-बिहारचे मुख्यमंत्री झाले. नितीशकुमार यांनी अतिमागासांचे राजकारण यशस्वी करून दाखवले; पण लालूप्रसाद यादव यांची वैचारिक बांधिलकी कोणाकडेही नव्हती. लालूंनी कधीही भाजपशी जवळीक साधली नाही. लालकृष्ण अडवाणी यांचा राम मंदिराचा रथ अडवण्याचे धाडस फक्त लालूंनी दाखवले होते. त्यांचे राजकारण यादवांपलीकडे गेले नाही आणि त्यांच्या १५ वर्षांच्या कार्यकाळात बिहारचा विकासाचा रथही थांबला, हा भाग वेगळा; पण अन्य समाजवादी नेत्यांनी थेट अडवाणी-वाजपेयींच्या राजकारणाशी जोडून घेतले, त्यांच्या सरकारमध्ये मंत्रीपद मिळवले. मंडल आणि कमंडलू दोन्ही एकत्र वावरू लागले. मग कमंडलूने मंडलच्या राजकारणाची एकत्र गाठ मारून आठ वर्षांमध्ये केंद्रात सत्ता मजबूत केली. कमंडलूच्या राजकारणाने मंडलचा राजकारणाच्या प्रगतीचा मार्ग अडवला, हे आत्ता कुठे आयुष्यभर काँग्रेसविरोधाचे राजकारण करणाऱ्या समाजवादी नेत्यांना समजू लागले आहे; पण गेल्या दोन वर्षांत ओबीसी राजकारणाला गती देण्याचे काम जातीनिहाय जनगणनेची मागणी करणाऱ्या भाजपमधील ओबीसी नेत्यांनी केले, हे मान्य करावे लागेल.

**भाजपने केला ओबीसींच्या गणनेला उघडपणे विरोध**



मंडलीकरणाच्या प्रक्रियेतील नेत्यांनी भाजपला अप्रत्यक्षपणे मुख्य प्रवाहात मान्यता दिली, असे म्हणता येईल. वाजपेयींचा भाजप आणि त्यांचे सरकार संघाला वा आत्ताच्या मोदींच्या भाजपला मान्य होते, असे नव्हे; पण भाजपच्या स्थित्यंतरामधील अपरिहार्य भाग म्हणून वाजपेयींच्या केंद्रातील सरकारकडे मोदींचा भाजप पाहतो. वाजयेपींच्या सरकारनंतर पुन्हा केंद्रात सत्ता मिळवायची असेल, तर केवळ हिंदुत्वाचे राजकारण पुरेसे ठरणार नाही, हे भाजपच्या लक्षात आले. त्यामुळे २०१४ मध्ये केंद्रात सत्ता मिळाल्यानंतर जाणीवपूर्वक ओबीसींच्या राजकारणाला भाजपने गती दिली. गेल्या आठ वर्षांमध्ये भाजपने हिंदुत्वाला ओबीसी राजकारणाची जोड दिली. जातीच्या समीकरणामध्ये ओबीसी हे प्रमुख मतदार ठरले. उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रात झालेल्या मंत्रिमंडळाच्या फेरबदलामध्ये ओबीसी नेत्यांना समाविष्ट केले गेले. मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याआधीच भाजपकडून या फेरबदलामध्ये किती ओबीसी मंत्री असतील, याची सविस्तर माहिती प्रसारमाध्यमांपर्यंत पोहोचवली गेली होती. भाजपच्या या प्रचारातून या राष्ट्रीय पक्षासाठी असलेले ओबीसी राजकारणाचे महत्त्व स्पष्ट होते. २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठीही ओबीसी मतदारांवर भाजपने लक्ष केंद्रित केलेले आहे. त्यासाठी भाजपचा ओबीसी मोर्चा कामाला लागलेला आहे. मधल्या काळात भाजपने ओबीसींचे राजकारण करताना चूक केली. मोदींच्या केंद्र सरकारला सत्तेचे केंद्रीकरण करण्याची सवय जडल्यामुळे मागास जातींची यादी निश्चित करण्याचा राज्य सरकारांचा अधिकार काढून घेतला गेला. या निर्णयामुळे मराठा समाजाला, उत्तर प्रदेशातही ओबीसींच्या यादीत अन्य जातींचा समावेश करण्यामध्ये बाधा आली. मग भाजपने घटनादुरुस्ती केली. या घटनादुरुस्ती विधेयकावरील संसदेत झालेल्या चर्चेमध्ये भाजपच्या खासदार संघमित्रा मौर्य यांनी स्वपक्षाच्या ओबीसी धोरणावर उघडपणे टीका केली होती. इथे पहिल्यांदा संघमित्रा यांनी ओबीसींच्या जनगणनेची मागणी केली होती. संघमित्रा यांचे वडील स्वामीप्रसाद मौर्य यांनी उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत भाजपचा हात सोडून समाजवादी पक्षात प्रवेश केला होता. निवडणुकीत त्यांचा पराभव झाला पण,

स्वामीप्रसाद हे उत्तर प्रदेशमधील 'सप'च्या नव्या ओबीसी नीतीचा तात्पुरता का होईना चेहरा बनलेले होते. संसदेमधील चर्चेमध्ये भाजपने जातीनिहाय जनगणनेवर मौन बाळगले; पण नंतर भाजपने ओबीसींच्या गणनेला उघडपणे विरोध केला. भाजपअंतर्गत झालेल्या या मागणीमुळे हिंदुत्व आणि ओबीसींच्या संयुक्त राजकारणाला तडा गेला. केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर पहिल्यांदाच हिंदुत्वाच्या राजकारणावर ओबीसी राजकारणाचा दबाव आल्याचे दिसू लागले. भाजपने ओबीसींच्या राजकारणाभोवती हिंदुत्वाचे कवच निर्माण केलेले असून ही 'अफूची गोळी' मतदारांना दिली तर सत्ता अबाधित राहील याची पूर्ण खात्री भाजपला आहे. जातीनिहाय जनगणना या गोळीचा प्रभाव काढून घेऊ शकते, या भीतीपोटी भाजपने ओबीसींच्या गणनेला विरोध केलेला आहे. हा विरोध भविष्यात विरोधी पक्षांचे भाजपविरोधात लढण्यासाठी प्रभावी हत्यार ठरू शकते.

**...तर हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण बोथट होईल**

भाजपसाठी धर्माची आणि जातीची जुळलेली समीकरणे यशाची गुरूकिल्ली ठरलेली आहेत. यातील एक जरी समीकरण बिघडले, तरी उत्तर प्रदेशासारखे मोठे राज्य भाजपच्या हातून निसटून जाईल. उत्तर प्रदेशमधील सत्ता गेली, तर केंद्रातील सत्तेला धक्का बसू शकतो. आगामी लोकसभा निवडणुकीआधीच उत्तर प्रदेशमध्ये विधानसभेची निवडणूक झालेली असल्यामुळे इथल्या योगी आदित्यनाथ यांच्या सत्तेला धक्का लागणार नाही, हे खरे; पण ओबीसी जनगणनेमुळे धर्माच्या राजकारणावर जातीच्या राजकारणाने मात केली तर, भाजपचे लोकसभा निवडणुकीतील विजयाचे गणित कोलमडून पडू शकते. यादव-मुस्लिम युतीची बिगरयादव ओबीसी आणि दलितांना भीती वाटते. त्यांचा उत्तर प्रदेश-बिहारमधील सर्व प्रकारचा वर्चस्ववाद इतर समाजांना मान्य नाही. यादव-मुस्लिमांची गुंडगिरी पुन्हा निर्माण होईल, हा भाजपचा प्रचार विजयाच्या प्रमुख कारणांपैकी एक होता; पण जातीनिहाय जनगणना झाली, तर भाजपला ओबीसी जातींच्या विकासासाठी खरोखरच धोरण आखावे लागेल. धर्मापेक्षा जातीचे राजकारण प्रभावी ठरले, तर हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण बोथट होईल. बहुसंख्याकांच्या मुस्लिमविरोधाला खतपाणी घालण्याची रणनीती भाजपला विजयाकडे घेऊन गेली आहे. जातीपेक्षा धर्माच्या नावाखाली समाजाला एकत्र केले, की शत्रू निश्चित करणे सोपे जाते. भाजपने मुस्लिमांना शत्रू केले, त्यांना समोर ठेऊन बहुसंख्याकांची मते मिळवली. या शत्रूचा जातीशी संबंध नाही. भाजपला मते देणाऱ्या ब्राह्मण मतदारांएवढाच इतर समाजातील मतदारांनाही हा शत्रू घातक वाटतो. इथे जात दुय्यम ठरते. काँग्रेसने ओबीसींना कधीही जवळ केले नाही. दलितांचा आधार असलेल्या राजकीय पक्षांसाठीही दलित-ओबीसी राजकारण जमले नाही. दलित मतदार कदाचित यादव उमेदवाराला मते देतील; पण उलटे गणित जमेलच, याची खात्री देता येत नाही. भाजपने जातीच्या राजकारणातील ही खोच अचूक शोधून काढली आणि ओबीसींना आपलेसे केले; पण ओबीसी समाजाने भाजपकडून न्यायाची अपेक्षा केली, तर भाजपला जातीनिहाय जनगणना करावी लागेल. भाजपने ओबीसींना राजकीय आधार दिला; पण आकांक्षा असलेल्या या समाजाला एका चौकटीत मर्यादेत कोंडून घालता येणार नाही. जातींची जनगणना झाली, तर ही




चौकट मोडून पडेल. उत्तर प्रदेशमध्ये धर्माच्या आधारावर मते मागता येऊ शकतात. बिहारमध्ये जातीची गणिते अधिक प्रभावी ठरतात. त्याच राज्यात मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी जातीनिहाय जनगणना सुरू केलेली आहे. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या अतिमागास जातींच्या यशस्वी राजकारणावर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. ओबीसींमधील अतिमागास जाती भाजपकडे वळल्या, तर बिहारमध्ये नितीशकुमार यांच्यावर मात करता येईल, असा भाजपचा कयास आहे; पण जातीनिहाय जनगणना झाली तर लोकसंख्येच्या आधारावर हा समाज आरक्षणामध्ये हिस्सेदारी मागेल. असे झाले तर ओबीसींचा तारणहार पक्ष म्हणून तयार केलेल्या भाजपच्या प्रतिमेला तडा जाऊ शकतो. केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना ओबीसींपर्यंत पोहोचवल्या, केंद्रीय मंत्रिमंडळात ओबीसी नेत्यांना प्रतिनिधीत्व दिले, हे युक्तिवाद कदाचित पुरेसे ठरणार नाहीत. ओबीसींच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवावा लागेल. महाराष्ट्रामध्ये ओबीसी आरक्षणाचा प्रश्न न्यायालयात जाऊन यशस्वीपणे लढवला, इतके स्पष्टीकरण पुरेसे ठरणार नाही. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट व्हायचे आहे. त्यामुळे ओबीसी प्रवर्गात असलेल्या जातींचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला आरक्षण द्यावे लागले आहे. ओबीसींच्या राजकारणाची गुंतागुंत वाढत जाईल हे भाजपला समजलेले आहे. त्यात भाजपने आर्थिक दुर्बल घटकांना दहा टक्के आरक्षण दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने दिलेल्या निकालातून या आरक्षणाचा लाभ फक्त उच्चवर्णीय दुर्बल घटकांना मिळेल, हे स्पष्ट झाले आहे. अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाची तरतूद संविधानाने केली आहे. इंद्रा सहानी प्रकरणातील निकालामुळे ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देता येणार नाही; पण त्याच सर्वोच्च न्यायालयाने दुर्बल घटकांचे आरक्षण वैध ठरवले आहे. जातीनिहाय जनगणना केली, तर ओबीसींच्या आरक्षणाचाही पुनर्विचार करावा लागेल. या सगळ्या प्रक्रियेत भाजपच्या अफूच्या गोळीतील कणिका आणि कवच दोन्ही वेगवेगळे होईल. मग धर्माचे राजकारण भाजपला लाभ मिळवून देण्याची शक्यता कमी होते. बिहारमध्ये जातीनिहाय जनगणना यशस्वी झाली, तर मंडलीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याची प्रक्रिया भाजपला रोखता येणार नाही. कदाचित 'अफूच्या गोळी'वर हाच उतारा असू शकेल. •••

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# मानवी हक्क म्हणजे काय?



नागार्जुन वाडेकर

**माणूस हा जन्मतः हक्क आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहे. मानवी हक्क म्हणजे असे सर्व हक्क, जे प्रत्येकास निसर्गतःच मिळालेले असतात. म्हणजेच मानवी हक्क जन्मतःच मिळालेले हक्क आहेत, ज्याच्याशिवाय माणूस जगू शकत नाही. माणसाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी, संवर्धनासाठी, बौद्धिक, वैचारिक तसेच सद्सद्विवेकबुद्धीच्या वाढीसाठी मानवी हक्क आवश्यक आहेत.**

मानवी हक्क म्हणजे माणसांचे हक्क, माणसांशी निगडित हक्क. वरवर सोपी वाटणारी ही गोष्ट समजून घेताना लक्षात येते, की हक्क ही संकल्पना अनेक वर्षांच्या कालखंडात विकसित होत आलेली आहे. विविध देशांत उदयास आलेल्या संस्कृती, इतिहास, तत्त्वज्ञांचे विचार, स्वातंत्र्यलढे तसेच न्यायालयीन निवाडे इत्यादींच्या योगदानातून माणसांचे हक्क ही संकल्पना रुजत गेली आहे. म्हणून मानवी हक्क या संकल्पनेचा अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती समजून घेताना ऐतिहासिक व सांकृतिक संदर्भ लक्षात घेणे गरजेचे ठरते.

**हक्कांची आवश्यकता:**

मानवी हक्क ही संकल्पना नवीन जरी वाटत असली, तरी तशी ती प्राचीन आहे. मानवी संस्कृतीच्या विविध टप्प्यांवर मानवाला जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या हक्कांना वेगवेगळी नावं वापरली आहेत – नैसर्गिक हक्क, नैतिक हक्क, मूलभूत हक्क, घटनात्मक हक्क, कायदेशीर हक्क इत्यादी. मानवाला आपलं जीवन भयमुक्त आणि आनंदी करण्यासाठी काही मूलभूत शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक गरजा असतात. म्हणून मानवाला या हक्कांची आवश्यकता वाटत आलेली आहे.

शारीरिक गरजांमध्ये प्रामुख्याने रोटी, कपडा, मकान, पाणी आणि वैद्यकीय सुविधांचा समावेश होतो. चांगले जीवन जगण्याकरिता या सुविधा पुरेशा प्रमाणात आणि गुणवत्तापूर्ण असणे, जसे समतोल आहार, पिण्याचे शुद्ध पाणी आणि प्रदूषणविरहित वातावरण तसेच सुरक्षित भोवताल इत्यादी सुविधांची आवश्यकता असते.

माणसांचे मन भय, चिंता आणि ताणतणाव यांपासून मुक्त असणे आवश्यक आहे. माणसाला स्वतःचे जीवन सन्मानाने जगण्यासाठी, व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठी, आंतरिक क्षमता विकसित करून ध्येय साध्य करण्यासाठी प्रतिष्ठेसह मानवी हक्क प्राप्त झाले पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, की बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे.

समाजात प्रत्येकाला सन्मानाने जगता आले पाहिजे, प्रत्येकाला आपलेपणाची भावना वाटायला हवी याकरिता समाजाने प्रत्येकाचे अस्तित्व स्वीकारणे आवश्यक आहे. देशाचे नागरिक म्हणून




एकमेकांनी परस्पर सहकार्याच्या भावनेने वागले पाहिजे. हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, अशी भावना असलेले वातावरण आपल्या भोवताली असणे आवश्यक आहे. म्हणजे प्रत्येकाला आपल्या मूलभूत हक्कांचा वापर करून विकास साधता येईल. देशात कुठल्याही भागात वास्तव्य करण्याच्या, संचार करण्याच्या, कायदेशीर व्यापार, उद्योग-व्यवसाय करण्याच्या, आपली भाषा, संस्कृती जपण्याच्या अधिकाराचा वापर करता येईल. समाजातील सर्व घटकांसाठी सुरक्षित वातावरण मिळण्याचा हक्क आहे, जसे मुलांना पुरेशा प्रमाणात खेळाची मैदाने, वृद्धांसाठी बागा, मोकळ्या जागा असणे आणि कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या महिलांसाठी ठिकठिकाणी स्वच्छ प्रसाधनगृहाची सोय असणे इत्यादी. अगदीच मूलभूत गरजा असूनही याकडे अजूनही गांभीर्याने पाहिले जात नाही.

आज मानवाला आपले जीवन आनंदी करण्यासाठी, सुखाचा शोध घेत असताना पैशांचीसुद्धा तितकीच आवश्यकता असते. त्यातून आर्थिक हक्कांची गरज निर्माण होते. किमान वेतन निश्चित असणे, समान कामासाठी महिला आणि पुरुष यांना समान वेतन मिळणे, हा आर्थिक हक्कांचाच भाग आहे. प्रत्येकाला कायदेशीर व्यवसाय करण्याच्या हक्कासोबतच सुलभ व्यावसायिक कर्ज मिळण्याच्या हक्काचासुद्धा यात अंतर्भाव असायला हवा.

यावरून हे लक्षात येते, की मानवाचे जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, न्याय या मानवी मूल्यांची आवश्यकता असते आणि या मानवी मूल्यांतूनच मानवी हक्कांची निर्मिती होताना

दिसते. असेही म्हणता येईल, की मानवी हक्कांच्या प्रत्यक्ष प्रभावी अंमलबजावणीच्या माध्यमातून संपूर्ण समाजाची मूल्यव्यवस्था बळकट होते.

**मानवी हक्कांचा अर्थ :**

माणूस हा जन्मतः हक्क आणि प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहे. मानवी हक्क म्हणजे असे सर्व हक्क, जे प्रत्येकास निसर्गतःच मिळालेले असतात. म्हणजेच मानवी हक्क जन्मतःच मिळालेले हक्क आहेत, ज्याच्याशिवाय माणूस जगू शकत नाही. माणसाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी, संवर्धनासाठी, बौद्धिक, वैचारिक तसेच सद्सद्विवेकबुद्धीच्या वाढीसाठी मानवी हक्क आवश्यक आहेत.

मानवी हक्क हा मानवाचा नैतिक दावा आहे, असे म्हणता येईल. मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे म्हणजे कायद्याने प्रत्येकाला समान वागणूक आणि समान संरक्षण मिळणे गरजेचे असते. मानवाच्या या हक्कांचे संरक्षण करण्याची आणि त्यांची हमी देण्याची जबाबदारी राज्यावर असते. देशात लोकशाही व्यवस्था असेल तरच मानवी हक्कांचा सन्मान होऊ शकतो. आपले हक्क नाकारले गेले, तर लोक सामूहिकरीत्या सरकारच्या चुकीच्या ध्येयधोरणांचा विरोध करू शकतात, शांततापूर्ण मार्गाने एकत्र येऊन संघटित होऊ शकतात. देशाची राज्यघटना हीच हक्कविषयक तत्त्वांचे प्रतिनिधित्व करते, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कायदे करण्याची तरतूद करते. आपल्या देशात कशा प्रकारचे कायदे करायला हवेत, हे सर्वसामान्य जनतेच्या मूल्यांवर अवलंबून असते.

**मानवी हक्कांचे स्वरूप :**

मानवी हक्कांची संकल्पना गुंतागुंतीची आहे. मानवी हक्कांचे स्वरूप आणि त्यांची व्याप्ती सूत्ररूपाने समजून घेण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ रोजी प्रसृत केलेला (Universal Declaration of Human Rights - UDHR) 'मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा' एक अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. जगभरातील जवळपास सर्वच राष्ट्रांनी हा जाहीरनामा संमत केलेला आहे. मानवजातीच्या हितासाठी सर्वच राष्ट्रे आपापल्या देशांत मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध आहेत. त्यामुळे जगभरात १० डिसेंबर हा दिवस 'जागतिक मानवी हक्क दिन' म्हणून साजरा केला जातो. मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील सरनाम्यानुसार, मानवी हक्कांचे स्वरूप अविभाज्य, वैश्विक आणि परस्परसंबंधी व परस्परावलंबी आहे.

**अविभाज्य हक्क –** मानवी हक्क आपणास निसर्गतः आणि जन्मतःच प्राप्त होतात. हे हक्क आपणास कोणी (स्टेट/शासन/सरकार) देत नाही. त्यामुळे ते काढूनही घेऊ शकत नाही किंवा कमीही करू शकत नाही. हे हक्क आपल्यापासून कोणी वेगळे करू शकत नाही किंवा हिरावून घेऊ शकत नाही अथवा चोरून घेऊ शकत नाही. हे हक्क वादातीत आहेत म्हणून ते कोणीच कधीही अमान्य करू शकत नाही. प्रत्येक मनुष्याला तो माणूस आहे म्हणून हे सर्व हक्क आपोआप मिळतात. म्हणून ते अविभाज्य व परंपरागत असतात.

**वैश्विक हक्क –** प्रत्येक व्यक्तीला ती कोणत्याही धर्म, जात, वंश, लिंग, सामाजिक वा आर्थिक स्तर किंवा भाषा, प्रांत, जन्मस्थानातील असली तरी तिला मानवी हक्क प्राप्त होतात. हे हक्क सर्वांनाच असतात, मग ती व्यक्ती कोठेही असो. एखादी व्यक्ती एका देशातून दुसऱ्या देशात गेल्यावरही तिचे हक्क तिच्या सोबतच असतात, अबाधित असतात. मात्र याला केवळ एक अपवाद आहे, जसे दुसऱ्या देशात गेलेल्या व्यक्तीला त्या देशाचे नागरिकत्व मिळेपर्यंत राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क किंवा मतदान करण्याचा हक्क अथवा निवडणुकीला उभे राहण्याचा हक्क असणार नाही. मात्र, इतर सर्व हक्क अबाधित राहतील, जसे जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क इत्यादी. याचाच अर्थ मानवी हक्क वैश्विक असतात.

**परस्परावलंबी हक्क –** सर्व हक्क सर्व माणसांसाठी एकाचवेळी अस्तित्वात असतात. म्हणून सर्व मानवी हक्क एकत्रितपणेच पाहावे लागतात. कोणताही हक्क स्वतंत्र काढून बघता येत नाही. कोणताही एक मानवी हक्क इतर हक्कांपेक्षा अधिक महत्त्वाचा किंवा कमी महत्त्वाचा नसतो. उदा. अन्न मिळविण्याच्या हक्काशिवाय जीविताच्या हक्काला अर्थच राहत नाही. तसेच शिक्षणाचा व माहितीचा हक्क नसेल, तर अभिव्यक्ती व भाषण स्वातंत्र्याला अर्थच उरत नाही. आपल्याला माहितीचा अधिकार मिळण्यामागे हीच भूमिका होती. यावरून असे दिसते, की जीविताचा हक्क, पोषक आहाराचा हक्क, अभिव्यक्ती व भाषण स्वातंत्र्याचा हक्क आणि असे सर्वच मानवी हक्क एकाच वेळी परस्परसंबंधी आणि परस्परावलंबी हक्क आहेत. या ठिकाणी एखाद्या कोळ्याच्या जाळ्याची कल्पना करून पहा, तुम्ही त्यातील एक धागा हलवला तरी संपूर्ण जाळे हलते, तसेच मानवी हक्कांचे स्वरूप आहे.

**मानवी हक्कांचे वर्गीकरण :**

**सकारात्मक आणि नकारात्मक हक्क –** मानवी हक्कांचे स्वरूप सकारात्मक किंवा नकारात्मक असते. सकारात्मक मानवी हक्क म्हणजे असे हक्क ज्यात राज्याने व्यक्तीला हे हक्क उपभोगता येण्याजोगे वातावरण निर्माण करणे अपेक्षित आहे. जसे की जगण्याचा हक्क यात राज्य/ सरकारकडून सकारात्मक कृतीची अपेक्षा असते. माणसाने प्राण्यासारखे जीवन जगणे अपेक्षित नसून त्याला सन्मानाने, अर्थपूर्ण आणि दर्जेदार जीवन जगता यावे अशी परिस्थिती राज्याने निर्माण केली पाहिजे. नकारात्मक हक्क म्हणजे सरकारला काही गोष्टींची कारवाई करण्यापासून मज्जाव केलेला आहे. राज्याला हे बंधनकारक असते, की त्याने व्यक्तीच्या कोणत्याही हक्कांचे हनन करू नये. जसे की अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क यात राज्याने/ सरकारने हस्तक्षेप करू नये, असे अपेक्षित असते. अशा वेळी या हक्कांचे स्वरूप नकारात्मक असते.

मानवी हक्कांच्या संरचनेस आणखी बळकट करण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यानंतर १९६६ साली आणखी दोन करारनामे प्रसृत केले – पहिला **नागरी आणि राजकीय हक्कांचा करारनामा** आणि दुसरा **आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा.** नागरी आणि राजकीय हक्कांच्या करारनाम्यात व्यक्तीचे नागरिक म्हणून काय हक्क आहेत आणि त्याला आपल्या देशाच्या राजकीय प्रक्रियेत सहभाग घेण्याच्या संदर्भात काय हक्क आहेत, यांची मांडणी केलेली आहे. तर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या करारनाम्यात

व्यक्तीला आपले जीवन दर्जेदार करण्यासाठी कोणकोणते आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क आहेत, याबाबतची चर्चा आहे. या तीनही दस्तऐवजांना एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय हक्कांचा करारनामा (इंटरनॅशनल बिल ऑफ राईट्स) असे म्हटले जाते. यातील पहिला जाहीरनामा सर्वच राष्ट्रांनी मान्य केलेला असला, तरी त्याचे स्वरूप बंधनकारक नाही. मात्र त्यानंतरचे दोन्ही करारनामे सही करणाऱ्या राष्ट्रांसाठी बंधनकारक स्वरूपाचे आहेत. हे करारनामे मान्य करताना काही राष्ट्रांनी आपापले प्राधान्यक्रम व अग्रक्रम वेगळे असल्याची भूमिका घेतली आहे. भारताने या तीनही दस्तऐवजांवर सही केली आहे. मात्र, काही बाबतीत आपली भूमिका राखून ठेवली आहे - उदा. गुन्हेगारांना फाशी देण्याची पद्धत. (जगभरातील अनेक देशांनी अशी पद्धत कायद्याने बंद केली आहे.)

**मानवी हक्कांचे प्रकार :**

फ्रान्समधील कायद्याचे प्राध्यापक करेल वसाक यांनी मानवी हक्कांचे तीन प्रकारांत वर्गीकरण केले आहे - पहिल्या पिढीचे मानवी हक्क, दुसऱ्या पिढीचे मानवी हक्क आणि तिसऱ्या पिढीचे मानवी हक्क. नागरी आणि राजकीय हक्कांमध्ये जीविताचा हक्क, गुलामगिरीपासून मुक्ततेचा हक्क, खाजगीपणाचा हक्क, क्रूर, अमानुष व अपमानास्पद वागणूक व शिक्षेपासून संरक्षणाचा हक्क यांचा समावेश होतो. राजकीय हक्क सरकार आणि समाज यांमधील दुवा निर्माण करतात. व्यक्तीला देशाच्या सरकारात सामील होण्याचा मार्ग देतात. नागरी आणि राजकीय हक्क पहिल्या पिढीचे हक्क म्हणून ओळखले जातात, जे सोळाव्या-सतराव्या शतकातील पुनर्रचनावादी सिद्धांताचा भाग आहेत, तसेच ते ब्रिटिश, अमेरिकन आणि फ्रेंच क्रांतीशी संबंधित आहेत.

आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क - 'अभावापासून मुक्तता' या संकल्पनेवर आधारलेले-दुसऱ्या पिढीचे मानवी हक्क म्हणून ओळखले जातात. हे हक्क व्यक्तीच्या मूलभूत गरजांशी संबंधित आहेत- रोटी, कपडा, मकान व अपेक्षित जीवनस्तर, पिण्यायोग्य पाणी, निरोगी वातावरण, उपासमारीपासून मुक्तता, शिक्षणाचा हक्क, कामाचा हक्क, सामाजिक सुरक्षा, मानसिक व शारीरिक आरोग्य या हक्कांचा यात समवेश होतो. या हक्कांना सकारात्मक हक्क म्हटले जात असले, तरी नागरी व राजकीय हक्कांशिवाय आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत.

वैयक्तिक आणि सामुदायिक हक्क हे तिसऱ्या पिढीचे हक्क आहेत. व्यक्ती विविध गटांत आणि समूहात राहतात. हे हक्क समूहाच्या सामूहिक प्रयत्नांतून प्रत्यक्षात येतात. हे हक्क बंधुत्वाच्या भावनेवर आणि एकत्रित राहण्याच्या इच्छेवर आधारलेले असतात. या हक्कांमध्ये खाजगीपणाचा हक्क, माहितीचा हक्क, विकासाचा हक्क, शांततेचा हक्क आणि स्वयं - निर्णयाचा हक्क, शाश्वत पर्यावरणाचा हक्क, शांततेचा हक्क इत्यादींचा समावेश होतो.

**समर्थनीय हक्क** - असे हक्क जे कायद्याने मागता येतात, त्यांच्या अंमलबजावणीसाठी कायदेशीर तरतुदी, उपाययोजना उपलब्ध असतात. या हक्कांना संरक्षण देण्याचे सकारात्मक बंधन राज्यावर असते. तर असमर्थनीय हक्क - असे हक्क जे कायद्याने मागता येत नाहीत; परंतु तेही हक्क मानवी अस्तित्वासाठी आवश्यकच असतात. भारतीय राज्यघटनेतील सर्वच मूलभूत हक्क हे मानवी हक्क आहेत. मात्र सर्वच मानवी हक्क हे भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत हक्कांत समाविष्ट केलेले नाहीत. उदा. खाजगीपणाचा हक्क, माहितीचा हक्क, जबाबदारीचा हक्क इत्यादी. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे सर्वच मानवी हक्क राज्याने ते अमलात आणणे अपेक्षित असते. मात्र ते एकदम करणे शक्य नसल्याने त्यांची अंमलबजावणी प्राधान्यक्रमानुसार टप्प्याटप्प्याने केली जाते. उदा. जनआंदोलनाच्या मागणीमुळे शिक्षणाचा मूलभूत हक्क, अन्नसुरक्षा हक्क असे काही हक्क भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या सूचीतून टप्प्याटप्प्याने मूलभूत हक्कांच्या सूचित समाविष्ट केले जात आहेत.

**मानवी हक्कांची व्याप्ती :**

प्रचलित मानवी हक्क व्यापक आणि सर्वसमावेशक आहेत. मानवी जीवनाचा असा कोणताही भाग असत नाही, ज्याला मानवी हक्कांचा स्पर्श होत नाही. भारत सरकारच्या मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ नुसार माणसाच्या जीविताशी, स्वातंत्र्याशी, समतेशी आणि प्रतिष्ठेशी निगडित असलेले सर्व हक्क म्हणजे मानवी हक्क. फ्रान्स (पॅरिस) येथे ऑक्टोबर १९९१ मध्ये विविध राष्ट्रांच्या कायदामंत्र्यांची शिखर परिषद भरली होती. या परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाने प्रसृत केलेल्या मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्यातील मानवी हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक देशांत मानवी हक्क संरक्षण कायद्याची निर्मिती करणे गरजेचे आहे, यावर सहमती झाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने मान्यता दिलेल्या या पॅरिस तत्त्वांच्या आधारे भारतातील मानवी हक्क संरक्षण कायद्याची निर्मिती झाली आहे.

राष्ट्रीय सरकारे, कायदे करताना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय न्यायालये निवाडे करताना मानवी हक्कांची आंतरराष्ट्रीय चौकट विचारात घेत असतात. तसेच जागतिक पातळीवर मानवी हक्कांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी ह्युमन राईट्स वॉच, ॲम्नेस्टी इंटरनॅशनलसारख्या स्वयंसेवी संस्था काम करत असतात. व्यक्तीलासुद्धा आपल्या देशातील कायदेशीर पर्याय वापरून झाल्यावरही न्याय मिळाल्याचे समाधान वाटले नाही, तर आंतरराष्ट्रीय न्यायालयापर्यंत जाता येण्याचा मार्ग निर्माण करून ठेवण्यात आला आहे. यावरून असे म्हणता येईल, की मानवी हक्कांच्या स्वरूपाप्रमाणेच व्याप्तीसुद्धा वैश्विक आहे. मानवी हक्कांच्या प्रेरणा एक जागतिक सहिष्णू समाज निर्मितीच्या आहेत आणि सर्वांच्या सहकार्याने त्या प्रत्यक्षात आणणे सहज शक्य आहे, असे म्हणता येईल.

एकीकडे शासनाने घटनात्मक बंधने पाळली पाहिजेत असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा समाजाचे जबाबदार घटक म्हणून आपणही नैतिकदृष्ट्या समाजात शारीरिक, मानसिक आणि सामाजिक सकारात्मक वातावरण निर्माण करण्यास बांधील असतो. आपल्या आणि इतरांच्या हक्कांप्रती आदर निर्माण करण्याविषयी समज आणि जागरुकता निर्माण करणे आपले कर्तव्य मानणे, हे मानवी हक्क संरक्षण आणि संवर्धनाचे पहिले पाऊल आहे. ●●●

**(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सहयोगी प्राध्यापक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**

# जवाहरलाल नेहरू विरुद्ध नरेंद्र मोदी



शेषराव चव्हाण

**नेहरू हे एक स्पष्ट अज्ञेयवादी होते, ज्यांचा असा विश्वास होता, की सार्वजनिक जीवनात कोणत्याही प्रकारच्या धार्मिक विधींना स्थान नाही. त्यांनी देशावर राज्य केलेल्या सतरा वर्षांच्या काळात जातीयवादाच्या काळ्या शक्तींविरोधात ते कधीही डगमगले नाहीत. शिवीगाळ किंवा हल्ल्याला ते कधीही घाबरले नाहीत. धर्मनिरपेक्षता हा नेहरूंच्या राजकारणाचा केवळ कागदी स्थिरक नव्हता; ते एका अर्थाने त्यांच्या देशभक्तीचे प्रमाण होते.**

नरेंद्र मोदी जवाहरलाल नेहरूंवर तीन मुद्यांच्या आधारे टीका करीत आलेले आहेत.

१. नेहरूंनी आपल्या १७ वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात भारताच्या विकासासाठी काहीही केले नाही.

२. सरदार वल्लभभाई पटेल यांना पंतप्रधान न करून त्यांच्यावर अन्याय केला.

३. नेहरू-गांधी घराण्यांनी भारतावर राज्य केले आणि करीत आहेत.

नेहरूंवरील वरील आरोपांनुसार मोदी कितपत वाजवी आहेत याचा अंदाज पुढील तथ्यांवरून लावता येईल.

**भारताच्या विकासासाठी नेहरूंनी काहीही केले नाही**

जवाहरलाल नेहरूंनी देशाची अंतर्गत आणि बाह्य धोरणे आखण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली. एकूणच राष्ट्रीय कार्यक्रमाची आखणी आणि त्याची अंमलबजावणी या दोन्हींमध्ये त्यांची जवळजवळ विशेष भूमिका राहिली आहे. ते इतर कोणापेक्षाही, देशाच्या योजना आखण्यासाठी आणि तयार करण्यासाठी अधिक जबाबदार आहेत.

नेहरूंना खात्री होती, की एक विशाल आणि वैविध्यपूर्ण देश एकत्र ठेवणारी एकमेव शासनप्रणाली ही लोकशाही आहे. भारतातील निरक्षर जनतेला मताचा अधिकार देणे मूर्खपणाचे आहे, हा युक्तिवाद त्यांनी बाजूला सारला. मोठ्या प्रमाणात निरक्षरता असूनही, भारतीय मतदारांनी राजकारण्यांच्या आश्वासनांना ओळखण्याची सक्षम असलेली जाण वारंवार दाखवली आहे.

नेहरू हे मूलतः कृतीत लोकशाहीवादी होते आणि त्याहूनही अधिक विचारात, ते अभिजात परंपरांमध्ये वाढले होते आणि त्यांच्याकडे हुकूमशहाच्या सर्व क्षमता व सोयी होत्या; पण सर्व समस्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाची त्यांची प्रेरणा ही उच्च आदर्शवादी होती. त्यांच्यासाठी समानता हा लोकशाहीचा गाभा होता. ते विविध कल्पनांनी परिपूर्ण होते. एखादी कल्पना त्यांच्या विचारामंध्ये आकार घेऊ लागे, तसतशी ते अमलात आणण्याचा प्रयत्न करत, अशा वेळी ते तज्ज्ञांच्या आणि इतरांच्या मत व टीकेचे स्वागत करत आणि त्याला एक ठोस आकार देत, अनेकदा टीकेशी जुळवूनही घेत.

**नेहरू हे स्वातंत्र्य चळवळीचे 'नायक' होते**

जवाहरलाल हे स्वातंत्र्य चळवळीचे निर्विवाद नायक होते, ते



तरुण आणि वृद्ध दोघांनाही प्रिय होते. ते जिथेही जात तिथे 'जय' (विजय)च्या आनंददायक घोषणांनी त्यांचे स्वागत होत असे. त्यांनी स्वतःबद्दल खालील निनावी लेख लिहिला, जो नोव्हेंबर १९३७ मध्ये 'मॉडर्न रिव्ह्यू'मध्ये प्रकाशित झाला होता.

'राष्ट्रपती जवाहरलाल की जय.' राष्ट्रपतींनी वाट पाहणाऱ्या लोकांच्या गर्दीतून हळूहळू जात असताना वर पाहिले. त्यांचे हात नमस्कारासाठी जोडले गेले. त्यांचा कठोर चेहरा हास्याने उजळला. हे एक उबदार वैयक्तिक हास्य होते, ज्या लोकांनी ते पाहिले, त्याला प्रतिसाद देत त्यांनीही स्मितहास्य आणि आनंद व्यक्त केला.

अचानक गर्दीमध्ये भावनाविवश झालेला हसरा चेहरा स्तब्ध झाला आणि पुन्हा तो कठोर आणि दुःखी वाटू लागला. असे वाटत होते, की हे हसणे व त्यासोबतचे हावभाव यामागे एक वास्तव आहे; ज्याप्रमाणे एखादा व्यापारी आपला व्यापार चांगला चालावा यासाठी अनेक उक्त्या आखत असतो, त्याप्रमाणेच ज्या गर्दीचा तो प्रिय बनला होता. त्या गर्दीची सद्भावना मिळवण्यासाठीची तर ही उक्ती नसावी? असे ते होते का?

परत एकदा तसेच काही एक चित्र. एक मोठी मिरवणूक आहे आणि हजारो लोकांनी त्यांच्या मोटारकारला वेढलेले आहे आणि भन्नाट परमआनंदात त्यांचा जयजयकार करीत आहेत. ते गाडीच्या सीटवर स्वतःचा समतोल साधत उभे राहतात. ते लोकांच्या गर्दीमध्ये उंचपुरे, देवासारखे शांत भासत आहेत. अचानक पुन्हा चेहऱ्यावर स्मितहास्य येतं. ते आणखीनच उल्हासित वाटू लागतं आणि तणाव निघून गेल्यासारखं वाटतं. ते कशावर हसताहेत हे न जाणता जमावही

त्यांच्याबरोबर हसायला लागतो. ते त्यांच्या सभोवतालच्या हजारो लोकांसोबत एक प्रकारचं नात आणि मैत्रीचा जणू काही दावा करतात आणि लोकांची ती गर्दी आनंदी आणि मैत्रीपूर्ण वाटते आणि असे भासते, जणू ती गर्दी त्याला आपल्या हृदयात घेत आहे; परंतु परत एकदा स्मितहास्य एकाकी निघून जातं आणि धीरगंभीर चेहरा समोर येतो.

हे सर्व नैसर्गिक आहे की सावधपणे, विचारपूर्वक केलेली सार्वजनिक माणसाची फसवणूक? कदाचित हे दोन्ही असेल. जसा एखादा नट कोणत्याही सौंदर्य प्रसाधानाशिवाय चांगला अभिनय करतो, तशी इतरांना प्रभावित करण्याची कला जवाहरलाल यांनी चांगलीच आत्मसात केली आहे. जरी ते वरवर उदासीन दिसत असले तरी ते सार्वजनिक रंगमंचावर परिपूर्ण कलात्मकतेने सादर होत आहेत. हे सर्व काही त्याचे व देशाचे नेतृत्व करणार आहे का? त्यांच्या सर्व उघड इच्छाचा उद्देश काय आहे? त्यांच्या त्या मुखवट्यामागे काय दडले आहे, कोणती इच्छाशक्ती, कोणती अतृप्त इच्छा?

हे प्रश्न मनोरंजक वाटतील. जवाहरलाल हे एक आकर्षक व्यक्तिमत्व आहे, जे सामान्यांच्या मनात कुतूहल निर्माण करतं. भारतातील वर्तमानाशी आणि कदाचित भविष्यासोबत त्यांचे स्थान आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्यामध्ये भारताचे हित साधण्याचे किंवा मोठी हानी करण्याचे सामर्थ्य आहे. त्यामुळे या प्रश्नांची उत्तरे आपण शोधली पाहिजेत.

जवळपास दोन वर्षे ते काँग्रेसचे अध्यक्ष राहिले; पण काही लोकांना ते काँग्रेसच्या कार्यकारिणीत फक्त एक शिबिर–अनुयायी वाटत, ज्यांना काहींनी आपल्या वर्चस्वाखाली ठेवले होते. तरीही ते स्थिरपणे आणि चिकाटीने आपली वैयक्तिक प्रतिष्ठा आणि प्रभाव जनमाणसांत आणि सर्व प्रकारच्या लोकांमध्ये वाढवतात. ते शेतकरी आणि कामगार, जमीनदार आणि भांडवलदार, व्यापारी आणि फेरीवाले, ब्राह्मण व अस्पृश्य, मुस्लिम, शीख आणि पारशी, ख्रिश्चन आणि ज्यू या सर्वांकडे जातात–भारतीय जीवनाची विविधता पाहतात. या सर्वांशी ते एक निराळ्या भाषेत बोलतात, नेहमी त्यांना आपल्या बाजूने जिंकण्याचा प्रयत्न करतात. अतिशय विस्मयकारक ऊर्जेसह ते भारताच्या विस्तीर्ण अशा प्रदेशामध्ये फिरतात. प्रत्येक ठिकाणी त्यांचे विलक्षण लोकप्रिय असे स्वागत होते. सुदूर उत्तरेपासून केप कोमोरिनपर्यंत ते काही विजयी सीझरसारखे निघून जातात व जाताना त्यामागे एक प्रयोगशील कीर्ती आणि आख्यायिका सोडून जातात. हे सर्व काही त्यांच्यासाठी फक्त एक विलक्षण कल्पना आहे, जी त्यांना आनंदित करते किंवा एखादी मानस योजना किंवा एखाद्या शक्तीचा खेळ आहे जो त्यांना स्वतःलाच माहीत नाही? त्यांच्या आत्मचरित्रात ते ज्या शक्तीबद्दल बोलतात ती त्यांची इच्छाशक्ती आहे, जी त्यांना गर्दीतून गर्दीकडे नेत आहे आणि त्यांना स्वतःशीच कुजबुजायला लावत आहे, ''ही माणसांची लाट मी माझ्या हातात घेतली आणि माझी इच्छा आकाशात ताऱ्यांमध्ये लिहिली.''

हे अभासच वळण बदल तर काय? जवाहरलाल यांच्यासारखे श्रेष्ठ पुरुष त्यांच्या सर्व क्षमतांसह (एका) लोकशाहीमध्ये असुरक्षित आहेत. ते स्वतःला लोकशाहीवादी आणि समाजवादी म्हणवतात आणि निःसंशयपणे ते तसे वागतात; परंतु प्रत्येक मानसशास्त्रज्ञ हे



जाणतो, की मन हे अंततः हृदयाचे गुलाम असते आणि मनुष्याच्या इच्छा आणि अदम्य आग्रहांशी जुळवून घेण्यासाठी तर्कशास्त्र नेहमीच तयार केले जाऊ शकते. या तर्काप्रमाणे एखादा छोटासा तिढा निर्माण व्हावा आणि जवाहरलाल कदाचित लोकशाहीची सामग्री बाजूला सारून हुकूमशहाही बनू शकतात. ते अजूनही लोकशाही आणि समाजवादाची भाषा आणि नारे वापरत असतील; परंतु फॅसिझमने या लोकशाही आणि समाजवादाच्या भाषेवर किती चरबी चढवली आहे आणि नंतर ती निरुपयोगी लाकडासारखी फेकून दिली, हे आपल्या सर्वांना माहीत आहे.

**नेहरू हे फॅसिस्ट नव्हते**

जवाहरलाल हे निश्चितच स्वभावाने फॅसिस्ट नाहीत. फॅसिझमचे स्वरूप आणि असभ्यता ते जाणून आहेत. त्यांचा चेहरा आणि अभिव्यक्ती असे काही भाष्य करते, की ''खाजगी ठिकाणातील व्यक्तिगत मुखवटे हे सार्वजनिक ठिकाणातील व्यक्तिगत मुखवट्यापेक्षा चांगले आणि उत्तम असतात.''

फॅसिस्ट मुखवटा हा सार्वजनिक मुखवटा आहे. सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी तो आनंददायी वाटत नाही. त्यांचा गर्दीमधला व सार्वजनिक सभांमधला आवाज हा एक जिव्हाळ्याचा आवाज आहे, जो व्यक्तीशी आपलेपणाने बोलतो आहे. सभांमधला हा आवाज ऐकत असताना एखाद्याला त्या संवेदनशील चेहराच्या मागे नेमके काय लपले आहे, हे लक्षात आल्यावर त्याबद्दल कुतूहल निर्माण होते. कोणते ते विचार, काय विचित्र गोंधळ, कोणती इच्छा जी दडपली जाते आणि एका ऊर्जेकडे वळते? कोणती ती उत्कट इच्छा, जी त्यांना स्वतःलाही मान्य करण्याची हिंमत होत नाही? विचारांची रेलचेल त्यांना सार्वजनिक भाषणात खिळवून ठेवते; परंतु इतर वेळी त्यांचे दिसणे त्यांच्याशी विश्वासघात करते. कारण त्यांचे मन विचित्र क्षेत्रात आणि कल्पनांमध्ये भटकते आणि ते क्षणभर त्यांचे साथीदार विसरतात आणि त्यांच्या मेंदूतील जीवांशी ऐकू न येणारा संवाद साधतात. त्यांच्या जीवनाच्या प्रवासात त्यांनी गमावलेल्या माणसांचा ते विचार करतात का? कठोर आणि वादळी होताना त्यांना त्यांची आस आहे का? किंवा ते ज्या भविष्याची, संघर्ष आणि विजयांची स्वप्ने पाहत आहेत, ती विस्कटतील का? त्यांना हे चांगले ठाऊक असले पाहिजे, की त्यांनी निवडलेल्या मार्गाच्या वाटेवर विसावा नाही आणि विजयी होणं म्हणजे स्वतःच एक मोठं ओझं होणं आहे. जसं

लॉरेन्सने अरबांना म्हटल्याप्रमाणे, ''विद्रोहासाठी विश्रामगृहे असू शकत नाहीत, त्यात आनंदाचा लाभांश दिला जाऊ शकत नाही.''

आनंद त्यांच्यासाठी असू शकत नाही; परंतु जीवनाच्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी नशीब आणि दैव बलवत्तर असल्यास आनंदापेक्षा काही तरी मोठे असू शकते.

जवाहरलाल नेहरू हे फॅसिस्ट होऊ शकत नाहीत; पण त्यांच्यामध्ये हुकूमशहाच्या सर्व गोष्टी आहेत. अफाट लोकप्रियता, चांगल्या परिभाषित उद्देशाकडे निर्देशित केलेली प्रबळ इच्छाशक्ती, ऊर्जा, संघटनात्मक क्षमता, कणखरपणा आणि गर्दीवर त्यांचे संपूर्ण प्रेम, इतरांबद्दल असहिष्णुता आणि दुर्बल आणि अकार्यक्षम लोकांसाठी काही एक विशिष्ट तिरस्कार. त्यांचा तापट स्वभाव सर्वज्ञात आहे. त्यांना जे आवडत नाही ते बाजूला सारून नवीन तयार करण्याची त्यांची अतिउत्साही इच्छा लोकशाहीच्या संथ प्रक्रियांना कदाचित क्वचितच जास्त वेळ प्रवाह देईल. सामान्य काळात ते केवळ एक कार्यक्षम आणि यशस्वी कार्यकारी प्रमुख असतील आणि अशा या क्रांतिकारी काळात सीझरवाद नेहमीच दारात असतो. अशा परिस्थितीत जवाहरलाल स्वत:ला सीझर बनवण्याची शक्यता नाही का?

पण यात जवाहरलाल आणि भारतासाठी धोका आहे. कारण सीझरवादाद्वारे भारताला स्वातंत्र्य मिळेलच, असे नाही आणि परोपकारी व कार्यक्षम जुलूमशाहीत देश थोडासा समृद्ध होइल; पण तो खुंटलेला राहील व त्यांच्या लोकांच्या मुक्तीच्या दिवसाला उशीर होईल.

सलग दोन वर्षे जवाहरलाल काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेले आहेत. त्यांनी एकप्रकारे स्वत:ला इतके अपरिहार्य बनवले आहे, की तिसऱ्यांदा त्यांनी निवडून यावे, असे सुचवणारे अनेकजण आहेत; पण यामध्ये भारताचे आणि खुद्द जवाहरलाल यांचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यांना तिसऱ्यांदा निवडून देऊन, काँग्रेसच्या जीवावर एका माणसाला मोठे करू आणि लोकांना सीझरवादाच्या दृष्टीने विचार करायला लावू. जवाहरलालमधील चुकीच्या प्रवृत्तींना प्रोत्साहन देऊ आणि त्याचा अहंकार आणि अभिमान वाढवू. तो एकटाच भारताच्या समस्या सोडवू शकतो याची त्याला खात्री होईल, असे चित्र उभे करू. कार्यालयाबाबत उघड उदासीनता असूनही त्यांनी गेली सतरा वर्षे काँग्रेसमधील महत्त्वाची पदे सांभाळली आहेत, हे लक्षात आणून देऊत. त्याने अशी कल्पना केली पाहिजे, की तो अपरिहार्य असा घटक झाला आहे.

त्यांना सलग तिसऱ्या वर्षी काँग्रेसचे अध्यक्षपद देणे भारताला परवडणारे नाही. यामागे काही वैयक्तिक कारणे आहेत. जवाहरलाल हे एक धाडसी वक्ते तर आहेतच, ते अध्यक्षपदी राहिल्यास हळूहळू त्यांची क्रयशक्ती खालावत जाईल. ते विश्रांती घेऊ शकणार नाहीत. कारण जो वाघावर स्वार होतो, त्याला खाली उतरण्याची अनुमती नसते; पण आपण निदान त्यांना खूप ओझ्याखाली आणि जबाबदाऱ्यांखाली त्यांचे मानसिक संतुलन बिघडण्यापासून रोखू शकतो. भविष्यात त्यांच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा करण्याची अशा आहे. खूप कौतुक आणि स्तुती करून आपण त्यांना बिघडवू नये. त्यांचा अहंकार आधीच भयंकर आहे. त्याला आळा घातला पाहिजे. आम्हाला सीझर नको आहे.



**नेहरूंच्या लोकशाही पद्धतीमुळे देशाला लाभ!**

नेहरू स्वत:ला हुकूमशहा बनवू शकले असते, पण त्याऐवजी ते म्हणतात, की 'भारतात लोकशाहीची मुळे मजबूत झाली पाहिजेत.' १९४७ पासून एका किंवा दुसऱ्या प्रकारची मुक्तता मिळालेल्या अंदाजे १५० राष्ट्रांपैकी, आपण जवळजवळ एकमेव आणि निश्चितच, अशा आकाराचे आणि विविधतेचे एकमेव राष्ट्र आहोत, ज्याने केवळ लोकशाही निर्माण केली नाही, तर ती सात दशके टिकवली. नेहरूंच्या लोकशाही पद्धतीमुळे देशाला भरपूर लाभ मिळाला. त्यांच्यासाठी लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष म्हणून त्यांची प्रतिमा सर्वाधिक महत्त्वाची होती. फाळणीनंतर झालेल्या हिंसेमुळे उत्तेजित झालेल्या भावना आणि त्यामुळे लाखो लोकांच्या स्थलांतरानंतरही त्यांनी आपले धर्मनिरपेक्ष चारित्र्य जपले. भाषिक राज्यांनंतरही भारताची राष्ट्रीय जाणीव आणि एकता ही वाढतच गेली.

**नेहरूंनी धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार केला**

नेहरू हे एक स्पष्ट अज्ञेयवादी होते, ज्यांचा असा विश्वास होता, की सार्वजनिक जीवनात कोणत्याही प्रकारच्या धार्मिक विधींना स्थान नाही. त्यांनी देशावर राज्य केलेल्या सतरा वर्षांच्या काळात जातीयवादाच्या काळ्या शक्तींविरोधात ते कधीही डगमगले नाहीत. शिवीगाळ किंवा हल्ल्याला ते कधीही घाबरले नाहीत. धर्मनिरपेक्षता हा नेहरूंच्या राजकारणाचा केवळ कागदी स्थिरक नव्हता; ते एका अर्थाने त्यांच्या देशभक्तीचे प्रमाण होते.

नेहरूंसाठी धर्मनिरपेक्षता हा राज्य-कौशल्य आणि विवेकपूर्ण राजकारणाचा एक सुज्ञ प्रस्ताव होता. हे त्यांना केवळ त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनाच नव्हे, तर त्यांच्याच पक्षातील लोकांनाही शिकवावे लागले. १९५१ मध्ये एका जाहीर सभेत, हिंदू राष्ट्राच्या अनुपयुक्त आणि अकार्यक्षमतेबद्दल घोषणा करण्याचे धैर्य त्यांच्यात होते. त्यांनी असा युक्तिवाद केला, की ''हिंदू राष्ट्राचा अर्थ फक्त एकच असू शकतो आणि तो म्हणजे, तुम्ही आधुनिक मार्ग सोडून एका संकुचित, जुन्या पद्धतीच्या विचारसरणीत जा आणि भारताचे



विभाजन करा. जे हिंदू नाहीत त्यांना कमी लेखा. तुम्ही आश्चर्यपूर्वक म्हणू शकता, की तुम्ही मुस्लिम किंवा ख्रिश्चन किंवा इतरांची काळजी घ्याल, जसे पाकिस्तानमध्ये तेथील राज्यकर्ते म्हणतात, की ते हिंदूंची काळजी घेतील. तुम्हाला असे वाटते का, की कोणताही वंश किंवा व्यक्ती दीर्घकाळापर्यंत त्यांची काळजी घेईल, हा दावा मान्य होईल का? तुमची राज्यघटना हीच हमी देते का? आम्ही जगासमोर जाहीर केले आहे, की या देशातील प्रत्येक नागरिकाला तो कोणत्याही धर्माचा, जातीचा, पंथाचा असला, तरी त्याला समान हक्क आहेत आणि भारताच्या स्वातंत्र्यात प्रत्येकजण समान वाटेकरी आहे. जर तुमचा विश्वास असेल, तर त्यात मग या जातीयवादी संघटना जे म्हणतात तेच मुळात चुकीचे, निरुपयोगी आणि हानिकारक आहे आणि ते संपवले गेले पाहिजे.''

हिंदू बहुसंख्य लोकांच्या बाजूने बोलू पाहणाऱ्या संकुचित विचारसरणीचा नेहरू समाचार घेतात. त्यांनी त्यांची जागा बऱ्यापैकी चपळाईने दाखवली. हिंदू विवाह विधेयकावरील चर्चेदरम्यान मे १९५५ मध्ये ज्यावर ते बोलले होते, त्या हिंदू समाजाच्या आंतरिक भावनेच्या त्यांच्या उत्कृष्ट प्रदर्शनाशी कोण जुळवून घेईल? त्यांनी सुमारे २,३०० वर्षांपूर्वीच्या अशोकाच्या शिलालेख क्रमांक १२ मधून उद्धृत केले आणि पुराणमतवाद्यांना आठवण करून दिली, की भारतीय परंपरांपैकी सर्वोत्तम परंपरा आपल्याला सांगतात, की ''स्वतःच्या धर्माची प्रशंसा करणे टाळा आणि दुसऱ्याच्या धर्माची निंदा करणे किंवा गांभीर्याशिवाय किंवा प्रसंगाविना बोलणे टाळा. योग्य प्रसंग आल्यावर इतर धर्माच्या व्यक्तींचाही योग्य तो सन्मान केला पाहिजे. अशा प्रकारे वागल्याने व्यक्ती निश्चितच स्वतःच्या धर्मवाद्यांचा मान उंचावतो आणि इतर धर्माच्या व्यक्तींनाही मदत करतो. याउलट वर्तन केल्याने स्वतःच्या धर्माला इजा होते आणि इतरांच्या धर्माचाही अपमान होतो. जो स्वतःच्या धर्माचा आदर करतो आणि दुसऱ्याच्या धर्माची भक्ती करण्यापासून तुच्छतेने वागतो आणि इतर सर्व धर्मांवर त्याचा गौरव करू पाहतो, तो स्वतःच्या धर्माला इजा करतो.''

१९५२ मध्ये मद्रासमध्ये श्रोत्यांशी बोलताना नेहरूंनी भारताच्या मूलभूत एकात्मतेच्या आशयावर चिंतन केले, ''भारतात अनेक धर्म आहेत. काही लोक एका धर्माचे आहेत, तर काही दुसऱ्या धर्माचे. ते एकमेकांवर अवलंबून आहेत; पण भारताचा विचार केला तर ते सर्व भारताचे आत्मा आणि तंतू आहेत. मग ते कोणत्याही धर्माचे असोत, ते सर्व भारताचे समान वाटेकरी आहेत. एका धर्माच्या लोकांचा भारतात जास्त वाटा आहे आणि दुसऱ्या धर्माच्या लोकांचा कमी असा विचार करणे किंवा म्हणणे योग्य किंवा खरे नाही. ते सर्व भारताचे नागरिक आहेत. धर्म हा त्यांच्या खाजगी जीवनाचा, खाजगी विवेकाचा प्रश्न आहे, तो नागरी किंवा राष्ट्रीय जीवनाशी संबंधित नाही.''

**नेहरूंनी संसदेला महत्त्व दिले**

नेहरूंनी अनेकदा त्यांच्या विरोधकांचे द्वेषपूर्ण शाब्दिक हल्ले सहन केले, तरी त्यांनी संसदीय सरकारबद्दल गहन समज आणि आदर दाखवला. त्यांनी संसदेला खूप महत्त्व दिले. एकदा राममनोहर लोहिया उठले आणि म्हणाले, ''मी आजारी आहे आणि नेहरूंच्या अभिजाततेबद्दल ऐकून कंटाळलो आहे. मला माहीत आहे, की नेहरूंचे आजोबा मोगल दरबारात शिपाई होते.'' नेहरू हळूच उठले आणि म्हणाले, ''मी सन्माननीय सदस्याचे आभार मानू इच्छितो. मी लोकांपैकी एक आहे हे सिद्ध करण्याचा मी प्रयत्न करत असल्याचे ते सिद्ध करत आहेत.'' त्यांच्या या उत्तराने सभागृहात शांतता पसरली.

नेहरूंच्या नेतृत्वावर कधी कधी डाव्या पक्षांनी टीका केली, तर काही वेळा उजव्या पक्षांनी मात्र त्यांना यथोचित असे आव्हान दिले नाही. १९५७ मध्ये दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत लोकशाहीची आणखी एक चाचणी घेण्यात आली. सत्ताधारी काँग्रेस पक्षाने निवडणुकीतील यशासाठी त्यांच्या कार्यक्रमापेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर जास्त भरवसा ठेवला. नेहरूंना मत म्हणून उघडपणे काँग्रेसला मत मागितले गेले; पण पंचवार्षिक योजना, सामुदायिक विकास प्रकल्प, समाजाच्या समाजवादी रचनेची उद्दिष्टे आणि शेवटी भारताचा जगात वाढणारा दर्जा यांविषयी नेहरूंनी स्वतःच पक्षाच्या सत्तेतील कामगिरीबद्दल अधिक बोलले आहे. तथापि, बहुसंख्य मतदारांमध्ये नेहरू नावाची जादू होती, हे सर्वांनी मान्य केले होते. परिणामी, काँग्रेसने लोकसभेच्या ७५% जागा आणि राज्य विधानसभेच्या ६५% जागा जिंकल्या. याने त्यांची लोकांवरील अफाट पकडीची पुष्टी केली आणि त्याच्या आंतरराष्ट्रीय स्तरात भर पडली.

गुवाहाटी काँग्रेस कालखंडानंतर एक काळ असा आला, की नेहरूंना उदासीन व निरस वाटत होते. त्यांना पद सोडायचे होते. एप्रिल १९५९ मध्ये त्यांनी काँग्रेस संसदीय मंडळाला सांगितल्याप्रमाणे, ''मला आता असे वाटते, की मी स्वतःला मुक्त करू शकेन आणि पंतप्रधान म्हणून नव्हे, तर भारताचा एक स्वतंत्र नागरिक म्हणून जगू शकेन. पंतप्रधानांच्या कार्याला विश्रांती मिळत नाही, ते एक सतत आणि अखंड चालणारे काम आहे, त्याचा बराचसा नित्यक्रम आहे आणि त्यामध्ये बरेच काही महत्त्वाचे निर्णय घेणे आवश्यक असतात.''

ही घोषणा काँग्रेस आणि देशासाठी धक्कादायक ठरली. मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी किंवा काँग्रेस पक्षातील कोणीही त्यांना निवृत्त होऊ देण्यास तयार नव्हते. सर्वत्र त्यांच्यावर पदावर राहण्यासाठी दबाव आणला गेला. (पुवार्ध)

# नमस्कार, मैं. रविश कुमार....



प्रा. अर्जुन
अ. पगारे

**माझ्या या प्रवासात मी खुर्चीवर बसलेल्या अनेकांना स्वतःच अस्तित्व गमावताना पाहिलं, तुम्हीदेखील पाहिलं असेल. अनेक संस्थांना उद्ध्वस्त होताना पाहिलं. द्वेषाच्या वातावरणात अनेक लोकांना दिशाभूल होताना पाहिलं; मात्र याच प्रवासात मी एक नवीन संस्था तयार होतानादेखील पाहतो आहे. ती म्हणजे प्रेक्षकांची संस्था. तुम्हा लोकांची संस्था. ही संस्था छोटी असेलही; मात्र आपल्या लोकशाहीत 'लोक' नावाचं झाड तुम्ही सुकू दिलेलं नाही.**

(NDTV चे संपादक रविश कुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर केलेल्या निवेदनाचा अनुवाद)

तुमचा अंदाज अगदी बरोबर आहे, की मी काय सांगणार आहे; परंतु माझी तुम्हाला विनंती आहे, की मी जे पण सांगणार आहे, ते थोडं धाडस करून ऐका. भारतात पत्रकारितेचा सुवर्णकाळ कधीच नव्हता, तसं पत्रकारितेचं भस्मयुगदेखील नव्हत. भस्मयुग याचा अर्थ मी असा घेतो, की जेव्हा या पेशातील सगळ्या चांगल्या बाजू अतिशय वेगाने भस्म केल्या जात आहेत. हा दिवस भारतीय पत्रकारितेत येणारच होता. इथे वेगवेगळ्या नावाने अनेक टीव्ही चॅनल सुरू झालेत; परंतु आहेत ते सर्व 'गोदी मिडिया'. या नव्याने आलेल्या पत्रकारितेने पत्रकारितेची व्यवस्था आणि पत्रकारितेसाठीचं आवश्यक वातावरण संपुष्टात आणलं. असं असलं तरी, खरी पत्रकारिता करण्याचा दावादेखील सगळेच करतात. महत्त्वाचं तेदेखील असा दावा करतात, ज्यांच्या ताकदीने या देशात दररोज पत्रकारिता पायदळी तुडवली जाते. हेच पत्रकारिता करणारे जेव्हा उच्च दर्जाची पत्रकारिता करण्याची भाषा करतात, तेव्हा त्यांच्याकडे संशयाने पाहणे आवश्यक आहे. गोदी पत्रकारिता आणि सत्ताधारी दोन्ही, पत्रकारितेचा नवा अर्थ तुमच्यावरती लादण्याचा प्रयत्न करत आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे, त्यांना जे सांगायचे आहे तेच दाखवणार. तेव्हा तुम्ही पुन्हा एकदा या जाळ्यात अडकण्याची शक्यता निर्माण होते.

या वेळी मला माझ्या संस्थेविषयी काहीच बोलायचं नाही. कारण भावनिक स्थितीत तुम्ही स्वतःला तटस्थ ठेऊ शकत नाही. NDTV मध्ये मी २७ वर्षे काम केलं. एवढ्या मोठ्या प्रवासात मी अनेक चढ-उतार पाहिले. अनेक सहकारी, त्यात वरिष्ठ, कनिष्ठ सर्वांची साथ मला मिळाली. ती माझ्यासाठी मोलाची होती. त्या सर्वांविषयी आज जास्त बोलता येणार नाही. मात्र माझ्यासाठी जे आदरणीय आहेत, त्यांची आठवण या क्षणी येत आहे. खूपच चांगल्या आठवणी माझ्या NDTV सोबत राहिल्या आहेत.

आज या क्षणी कोणा एका व्यक्तीचं नाव घेणं माझ्यासाठी फारच अवघड आहे. कारण माझ्या व्यावसायिक जीवनात अनेक लोकांचा हात आहे. माझे जुने सहकारी आणि सध्याचे सहकारी सर्वांकडूनच मला काही ना काही मिळाले आहे. त्यामुळे मी सर्वांचाच ऋणी आहे. अशा भावनिक वेळी एकाच व्यक्तीचं नाव घेणं न्याय्य होणार नाही. या वेळी मला प्रत्येक चेहरा चांगला वाटतो आहे. कारण या सर्वांनी



मला अनेक अनुभव देऊन माझं आयुष्य समृद्ध केलं आहे. ज्यावेळी लग्न झालेली मुलगी सासरी निघते, तेव्हा ती वेळोवेळी मागे वळून आपल्या माहेराला बघत असते. सध्या माझीही अशीच अवस्था झाली आहे. तेव्हा मलासुद्धा मागे वळून पाहू द्या. पुढे कधीतरी विस्ताराने NDTV विषयी बोलेन. खास करून NDTV विषयी, डॉ. प्रणव रॉय, राधिका रॉय यांच्यासंदर्भात. माझा NDTV सोबत २७ वर्षांचा प्रवास आहे, त्यामुळे खूप गोष्टी आहेत. त्यादेखील जरूर सांगेल, जेव्हा मी भावनिक नसेल आणि तुम्हीदेखील.

ऑगस्ट १९९६ मध्ये माझा NDTV सोबतचा प्रवास सुरू झाला, तो अनुवादकाच्या रूपाने. त्या अगोदर मी प्रेक्षकांकडून आलेले पत्र निवडण्याचं काम करत होतो. तेव्हा प्रेक्षक पोस्टाने पत्र पाठवत असत. माझं काम होतं, त्यातून योग्य पत्रांची निवड करून त्यावर रिपोर्ट तयार करणे आणि निवेदक, प्रोड्युसर यांना सादर करणे. मजुरीचं काम होतं त्याच हिशेबाने पैसेदेखील मिळत होते. आजही अनेकांची पत्रे, मेसेज मला येतात. मी अनेकांचे पत्र, मेसेज वाचतो. शक्य तेवढ्या प्रतिक्रिया देण्याचा प्रयत्न करतो. अनेकांकडे मी पाठवलेली उत्तरे असतीलही. प्रेक्षकांच्या पत्रांसोबत सुरू झालेला प्रवास आजही सुरू आहे. त्या पत्रांमधून अनेक त्यांच्या अपेक्षा, काहींनी मार्गदर्शन, काहींनी तक्रारी, तर काहींनी रागावलेदेखील आहे. यामध्येच माझं झोपणं, जागणं, जगणं सुरू होतं. यातून आपल्याशी माझं नातं कसं जुळत गेलं, मी स्वतःला तुमच्यात इतका

गुंतवत गेलो, ते आजपर्यंत घरी पुन्हा परतलोच नाही. मात्र आता स्वतःला वेळ देऊ शकेल. आजची सायंकाळ अशी आली आहे, की आज चिमणीला स्वतःचं घरटं डोळ्यांना दिसेनासं झालंय. तिला कोण सांगणार, तिचं घरट कोणीतरी पळवून नेलंय. आता मात्र त्याच्यासमोर उरलंय ते फक्त मोकळं आभाळ.

असो, त्यानंतर अनुवादक झालो. पुढे रिपोर्टर झालो. त्यातून मला खूप काही शिकायला मिळत गेलं. त्या शिक्षणातूनच NDTV मध्ये समूह संपादक झालो आणि आज या पदाचा राजीनामा देत आहे. यामागे खूप मोठ्या शक्ती आहेत. त्यामुळे ही वेळ येणार याचा अंदाज मला अगोदरच आला होता, मात्र तो दिवस आज उजाडला. आज चांगलं तर निश्चितच वाटत नाहीये, मात्र जेव्हा केव्हा माझं मूल्यमापन कराल, तेव्हा मात्र माझ्या बाबतीत ही सहानुभूती ठेऊ नका, की पत्र निवडण्याचं काम करणारा पुढे मोठा समूह संपादक झाला. कारण मी त्यांच्यासारखा नाही, की उतरतात विमानातून आणि चहा विकण्याच्या गोष्टी करतात. मी माझा संघर्ष मोठा कठीण होता, हे सांगण्याचा माझा उद्देश नक्कीच नाही. मला वाटतं, या देशात अनेकांचा संघर्ष हा डोंगर चढण्यासारखा आहे.

माझ्या या प्रवासात मी खुर्चीवर बसलेल्या अनेकांना स्वतःचं अस्तित्व गमावताना पाहिलं, तुम्हीदेखील पाहिलं असेल. अनेक संस्थांना उद्ध्वस्त होताना पाहिलं. द्वेषाच्या वातावरणात अनेक लोकांना दिशाभूल होताना पाहिलं, मात्र याच प्रवासात मी एक नवीन संस्था तयार होतानादेखील पाहतो आहे. ती म्हणजे प्रेक्षकांची संस्था. तुम्हा लोकांची संस्था. ही संस्था छोटी असेलही, मात्र आपल्या लोकशाहीत 'लोक' नावाचं झाड तुम्ही सुकू दिलेलं नाही.

मला जेव्हा संधी मिळाली, तेव्हा मी पूर्ण स्वतःला झोकून काम केलं. कारण मला ही संधी मला तुमच्यासाठीच मिळाली आहे. तुम्हा सर्व प्रेक्षकांचा माझ्यावर खूप अधिकार राहिला आहे. तुम्हांमुळे माझ्या अवतीभोवती न्यूज रूम तयार झाली. जनतेची न्यूज रूम जी ऑफिसमध्ये नाही तर तुमच्या घरात, तुमच्या डोक्यात तयार झाली.

भारतातीलच नाही तर जगातील किती तरी प्रेक्षकांनी मला मदत केली. शिवाय या मोबदल्यात त्यांनी माझ्याकडे कधीही पैशाची मागणी केलेली नाही. विदेशातील अनेकांनी माझ्यासाठी व्हिडिओ रेकॉर्ड केले, संशोधन करून मला पाठवलं. मी केलेल्या सर्वच कार्यक्रमांत प्रेक्षकांचं मोठं सहकार्य मला मिळालं आहे. तुम्ही प्रेक्षकांनी माझ्या माहितीत अनेक सुधारणा सुचवलेल्या आहेत. अनेक तज्ज्ञ, भारतीय प्रवासी, स्थानिक भारतीय विद्यार्थी, प्रेक्षक होण्यासोबतच माझ्यासोबत राहिले. स्वतः पत्रकार बनून पत्रकारिता व्यवसायातील या छोट्याशा बेटाला वाचवण्यात योगदान देत राहिले. या सर्व प्रक्रियेला उद्ध्वस्त होताना पाहणे, प्रेक्षक होण्याच्या प्रक्रियेला उद्ध्वस्त होताना पाहणे आणि पुन्हा त्यांना प्रेक्षक होताना पाहणे, हा सुखद अनुभव राहिला. तुम्हा प्रेक्षकांमधील अनेकांनी वेगवेगळ्या भाषांमध्ये अनुवाद करून मला सहकार्य केले. संदर्भांची कमतरता तुम्ही कधी पडू दिली नाही. ती फक्त याकरिता, की 'प्राइम टाईम'मध्ये सर्वोत्तम दाखवलं जावं. कारण प्राइम टाईम माझा नाही तर तुमचा होता.

कधी शो खराब झाला, तर तुम्ही सांगायला संकोच केला नाही. तुम्ही प्रेक्षकच माझे निरंतर संपादक म्हणून माझ्यासोबत राहिलात. एखादं झाड मोठं होतं, त्याकरिता त्याला अनेक पावसाळ्यांचं पाणी लागतं. त्याचप्रमाणे तुमच्यासारख्या प्रेक्षकांत एखाद्या रविश कुमारच असणं आहे. तुम्ही प्रेक्षकच प्रत्येक हंगामात पाऊस बनून पडता आणि इथे सुकणाऱ्या झाडांना हिरवं करत जातात. तुमच्यामुळेच You Tube,Twitter वर अनेक पत्रकार उभे राहू शकले. त्या सर्वांच्या मागे तुम्हीच खंबीरपणे उभे आहात. अनेकांना तुम्ही subscriptions करून आर्थिक मदत मिळवून देण्यात पुढाकार घेता.

या लोकशाहीत एकही संस्था, जी मजबूतपणे उभी राहिलेली दिसत नाही. इथे न्यायव्यवस्था कमजोर होत जाते, तेव्हा तुम्ही प्रेक्षक आश्वासक म्हणून पुढे सरसावता. मला वाटतं, तुम्हीच पत्रकारितेचा स्तंभ आहात. पत्रकारिता आता कुठल्याही संस्थेत दिसत नाही. ती पत्रकारिता तुमच्यासारख्या प्रेक्षकांत जिवंत असल्याचे जाणवते. तुमच्यामुळे काही नि:पक्ष पत्रकार प्रश्न विचारताना हिंमत करतात. हेच तुमचे फार मोठे योगदान आहे.

लोकांचा आवाज कोणीतरी दाबून टाकेल. त्या आवाजात धार्मिक व्देष भरून लोकशाहीला संपविण्याचा प्रयत्न केला जाईल, मात्र तुमच्यासारख्या प्रेक्षकांचं असणं लढणाऱ्यांना ताकद देत राहिलं. इथे लोकशाही संपेल; परंतु सुंदर लोकशाहीचं स्वप्न कधीही भंगणार नाही. कारण तुम्ही प्रेक्षक तुमच्या जबाबदारीला चांगले ओळखून आहात. या संकटाच्या काळात तुम्ही एका पत्रकारावर विश्वास ठेवता, त्याच्यावर प्रेम करता. अनेक मोठ्यांनी माझ्या डोक्यावरून हात फिरवला, कोणी मला फुलं दिली, कोणी माझ्या तब्येतीची काळजी करत खाण्याच्या वस्तू दिल्या, कधी उन्हात उभा राहिलो, तर माझ्या डोक्यावर छत्री धरली, कोणी खिशाला पेन लावला. आज NDTV पेक्षा मी तुमच्या आठवणीत जास्त रमतो आहे.

मला तुम्हा सर्व प्रेक्षकांचा अभिमान वाटतो. अनेक वेळेला मला वाटत, मी संस्थेचा कमी आणि तुमचाच जास्त प्रतिनिधी आहे. मला माझ्या संस्थेत काम करण्याचं स्वातंत्र्य मोठ्या प्रमाणात मिळालं, मात्र मी त्या स्वातंत्र्याला फार सांभाळलं. कारण तुमची नजर सतत माझ्यावर होती. माझ्याकडून चूक होणार नाही, माझ्यात अहंकार घुसणार नाही याची काळजी घेतली. माझ्यासमोर जग बदलत राहिलं, मी मात्र टेस्ट क्रिकेटमधल्या खेळाडूसारखा पिचवर टिकून राहिलो; परंतु आता कोणी तरी तो सामना संपवला आणि त्याला T-20 मध्ये रुपांतरीत केले.

लोकांना चार आणे समजणारे जगतसेठ प्रत्येक देशात आहेत, आपल्याकडेही आहेत आणि जर ते सांगत असतील, की तुमच्यापर्यंत योग्य माहिती पोहोचवण्याची आमची इच्छा आहे, तर याचा अर्थ आपल्या खिशात रुपया टाकून तुमच्या खिशात चार आणे टाकण्याचा त्यांचा विचार आहे. हे समजून घ्या. एखाद्या पत्रकाराने त्यांच्याविषयी लिहिले, बोलले तर त्याविरुद्ध खटला भरतात आणि दुसऱ्या बाजूला पत्रकारितेची चिंता करतात. मात्र तुम्ही प्रेक्षक हे सर्व समजता. म्हणूनच आज मी माझ्या संस्थेपेक्षा तुम्हा प्रेक्षकांची आठवण काढतो आहे. मी NDTV मधून राजीनामा दिला आहे. नमस्कार. •••

**(लेखक राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत.)**

# वादांमुळं गाजलं मुस्लिम मराठी साहित्य संमेलन

**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी वर्तमान राजकारणावर भाष्य करताना म्हटलं, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दिलं जाणारं शासकीय अनुदान बंद करावं. हा सगळा पैसा अशा छोट्या साहित्य संमेलनाकडे वळवावा. कारण त्या संमेलनातून जत्रेशिवाय दुसरं काहीच होत नाही. जेव्हा माणसांनी तयार केलेल्या विविध व्यवस्था फितूर होतात, बेईमान होतात, तेव्हा साहित्यिकाची जबाबदारी वाढते आणि समाज सगळा त्याच्यामागे जात असतो. वर्तमान अवस्थेत कोणत्याही यंत्रणा प्रामाणिक राहिलेल्या नाहीत. आजचा काळ असा विचित्र आहे, की कुठे पाऊल ठेवलं तर कुठे स्फोट होईल हे सांगता येत नाही.**

**कलीम अजीम**

तब्बल २२ वर्षांनी नाशिकमध्ये भरलेलं मुस्लिम मराठी साहित्य संमेलन अनेक वादांनी गाजलं. दोन साहित्य संस्थांचा वाद व नंतरचा घटनाक्रम त्यातील प्रमुख बिंदू होता.

पहिलं, १९९० साली सोलापूरला स्थापन झालेल्या मुस्लिम मराठी साहित्य परिषदेने २००९ साली औरंगाबादला शेवटचं संमेलन भरवलं होतं. त्यानंतर १४ वर्षांनी साहित्य परिषदेने नाशकात सदरील मेळावा घेतला. यापूर्वी २००० मध्ये असंच संमेलन नाशिकला झालं होतं. चर्चेत येण्याचं दुसरं प्रमुख कारण म्हणजे, अध्यक्ष म्हणून निवड झालेले अब्दुल कादर मुकादम यांचं पूर्वाश्रमीचं मुस्लिम सत्यशोधक मंडळाचं सक्रिय सदस्यत्व ग्रहण करणे. कारण आजही महाराष्ट्रातील मुस्लिम समुदाय हमीद दलवाईंना मुस्लिमविरोधी धोरणांचा प्रचारक मानतो. वेळेचं भान राखून अध्यक्षांनी, मी दलवाई विचारांपासून फारकत घेऊन एक तप लोटला आहे, तसंच मी मंडळाचा सदस्य व विचारांचा समर्थक नसल्याचा ऑडिओ खुलासा केला. त्यामुळे तो विरोध तिथंच मावळला.

तिसरं कारण म्हणजे विहिंप, आरएसएस व त्यांच्या समविचारी 'विवेक'सारख्या ब्राह्मणी व हिंदुत्ववादी विचारांच्या संस्था, संघटना व प्रचारकांनी संमेलनाचा घेतलेला धसका! शेवटचा आठवडा संघविचारांच्या अपप्रचारामुळे नाशिकचं मुस्लिम मराठी साहित्य संमेलन गाजलं.

नियोजित वेळेच्या दीड-दोन तास उशिरा संमेलन सुरू झालं. उद्घाटन समारंभाला 'द वायर'च्या सुप्रसिद्ध न्यूज अँकर व पत्रकार आरफा खानम शेरवानी येणार होत्या. विमान तिकिटाची व्यवस्था करूनही काही कारणास्तव त्या पोहचू शकल्या नाहीत; परंतु त्याच दिवशी त्यांनी राहुल गांधींच्या 'भारत जोडो'साठी श्रीनगरच्या लाल चौकात उपस्थित असल्याचा फोटो ट्विटरवर अपलोड केला होता. म्हणजे श्रीनगरहून त्यांना नाशिकचं अंतर वेळेत कापता आलं नाही.

संमेलनाच्या उद्घाटनापूर्वी परिसरातून दिंडी काढण्यात आली. तसंच इकरा अरबी मदरसा इंग्लिश स्कूलच्या वतीने दिंडीत पथनाट्य सादर केलं. भाभानगर येथील दादासाहेब गायकवाड सभागृहातील प्रा. फकरुद्दीन बेन्नूर साहित्यनगरीत संमेलनाची सुरुवात दुपारी सव्वा बाराच्या सुमारास कुरआनच्या आयात पठणाने झाली. इरशाद पीरजादे यांनी आपल्या सुमधूर आवाजात 'आयात', तर इकबाल मुकादम यांनी 'नात ए पाक' सादर केली. त्यानंतर डॉ. युसूफ बेन्नूर आणि उपस्थितांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचं सामूहिक वाचन केलं. वृक्षास जलपान करून संमेलनाचं उद्घाटन करण्यात आलं.

प्रमुख संयोजक डॉ. फारुख शेख यांनी वर्तमान फूटपाड्या राजकीय स्थितीत सदरील संमेलन का घ्यावे लागत आहे, याची मीमांसा केली. संमेलन फक्त भाषाप्रेमींचा सोहळा नसून भारतीय व मराठी मुस्लिमांची राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अभिव्यक्ती असल्याचं त्यांनी म्हटलं. धर्म, जातीच्या नावाने भेद निर्माण करणाऱ्या विघातक शक्तींना उत्तर देऊ पाहणारा हा सांस्कृतिक प्रयत्न आहे, असंही त्यांनी म्हटलं.

उद्घाटक माजी राज्यसभा सदस्य हुसैन दलवाई, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, प्रमुख संयोजक डॉ. फारुख शेख, स्वागताध्यक्ष व



अध्यक्षासह एकूण २० जण उद्‌घाटन मंचावर उपस्थित होते. हुसैन दलवाई यांनी राज्यातील प्रादेशिक मुस्लिम व भाषेचा अनुबंध उलगडून दाखवला. शिवाय अजूनही मोठ्या प्रमाणात मुस्लिम मराठीपासून अलिप्त असल्याचीही खंत व्यक्त केली. आपल्या भाषणात त्यांनी वर्तमान केंद्रीय व राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या मुस्लिमविरोधी धोरणांचा समाचार घेतला. मराठी भाषेची मक्तेदारी मिरवणाऱ्या ब्राह्मणी प्रवृत्तीवरदेखील त्यांनी बोट ठेवलं.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी वर्तमान राजकारणावर भाष्य करताना म्हटलं, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दिलं जाणारं शासकीय अनुदान बंद करावं. हा सगळा पैसा अशा छोट्या साहित्य संमेलनाकडे वळवावा. कारण त्या संमेलनातून जत्रेशिवाय दुसरं काहीच होत नाही. जेव्हा माणसांनी तयार केलेल्या विविध व्यवस्था फितूर होतात, बेईमान होतात, तेव्हा साहित्यिकाची जबाबदारी वाढते आणि समाज सगळा त्याच्यामागे जात असतो. वर्तमान अवस्थेत कोणत्याही यंत्रणा प्रामाणिक राहिलेल्या नाहीत. आजचा काळ असा विचित्र आहे, की कुठे पाऊल ठेवलं तर कुठे स्फोट होईल हे सांगता येत नाही.

प्रस्तावना, स्वागताध्यक्ष, कार्याध्यक्ष, मुख्य संयोजक, प्रमुख पाहुणे इत्यादींच्या लांबणाऱ्या भाषणांमुळे अध्यक्षांचे भाषण व वेळ कापली गेली. आयोजकांनी २० मिनिटात आटोपण्यास सांगितलं आहे, अशा सूचनेने अध्यक्ष अब्दुल कादर मुकादम यांनी आपलं मनोगत सुरू कलं. मुकादम इस्लामचे अभ्यासक असल्याने त्यांनी इस्लामच्या नीती, धोरण, तत्त्वज्ञान व सुवर्ण युगापासून भाषणाला प्रारंभ केला. इस्लामचा संपूर्ण सार कुरआनमध्ये आलेला आहे. अर्थक्रांतीपासून संस्कृतीपर्यंत प्रत्येक गोष्टीची मांडणी त्यात केली आहे. पूर्वीपासून इस्लामला बदनाम करण्यात येत आहे. सध्या काही हिंदुत्ववादी संघटना तेच कार्य करत आहेत. त्यामुळे समाजात दुष्परिणाम निर्माण होत आहेत. भाषेला कुठलाही धर्म उपस्थित केलेला नसतो. भाषा वाचत नाही तोपर्यंत त्याचा अर्थ समजत नाही. याचा अभ्यास करणे अतिशय महत्त्वाचं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली, तरीदेखील अद्याप समग्र क्रांती होऊ शकलेली नाही. क्रांती होण्यासाठी तसेच सर्वांना समान अधिकारासाठी ज्ञानाचा प्रसार करणे आवश्यक आहे. त्यासाठी साहित्य आणि साहित्यिकांची मोलाची भूमिका आहे.

पुढे साहित्य, संस्कृती, लेखनाची प्रेरणा, लिखाणाच्या विविध प्रयोगांवर भाष्य करत त्यांनी म्हटलं, राज्यात अनेक मुस्लिम लेखकांनी मराठीतून लेखन केले आहे. मुस्लिम साहित्य संमेलन हे त्याचे पुढचे पाऊल आहे. याविषयी मुक्त चर्चा होत असेल, तर ते प्रगतीसाठी योग्य आहे. या चर्चेत काही मूलगामी मुद्दे उपस्थित होत असतील, तर त्याचाही विचार केला जाईल.

## मंजूर झालेले ठराव

(१) राज्य सरकारने मुस्लिम स्वातंत्र्यसेनानींचा कोष तयार करावा.

(२) विज्ञान व संशोधन क्षेत्रात मुस्लिमांना प्रोत्साहन देत आर्थिक तरतूद करावी.

(३) मरहूम माजी आमदार सय्यद अमीन यांची १७ पुस्तके मंत्रालय तथा महाविद्यालयाच्या ग्रंथालयात उपलब्ध होण्यासाठी शासनाने आदेश काढावा.

(४) प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत मुस्लिम विद्यार्थ्यांना दहा टक्के शिष्यवृत्ती द्यावी. केंद्र सरकारने रद्द केलेली मौलाना आझाद संशोधन शिष्यवृत्ती पुन्हा सुरू करावी.

(५) वक्फ जमिनीचा वापर मुस्लिम समाजाच्या सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक, विकासासाठी करावा.

(६) अलीगड विद्यापीठाच्या औरंगाबाद येथे मंजूर केंद्रासाठी निधी देऊन ते कार्यान्वित करावे.

(७) मुस्लिम आरक्षणास मुंबई उच्च न्यायालयाने योग्य ठरवले आहे, त्यानुसार मुस्लिमांना पाच टक्के आरक्षण द्यावे.

(८) मुस्लिम मराठी साहित्याचे विद्यापीठ स्तरावर अध्यासन केंद्र सुरू करावे. मुस्लिम साहित्यनिर्मितीसाठी नवलेखकांना अनुदान व पुरस्कार द्यावेत.

(९) साहित्य संस्कृती मंडळ व राज्यस्तरीय भाषा विकास मंडळाने प्रकाशित केलेल्या मुस्लिमांसंदर्भातील ग्रंथांचे पुनर्मुद्रण करावं.

(१०) राज्यातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका फातिमाबी शेख यांच्या नावाने राज्यातील सर्व विद्यापीठांत स्वतंत्र अध्यासन सुरू करावं. तसंच फातिमाबी शेख यांच्या नावाने शिक्षिकांसाठी पुरस्कार सुरू करावा.

(११) साहित्य सांस्कृतिक व इतर शासकीय मंडळांवर मुस्लिम साहित्यिकांना योग्य प्रतिनिधित्व द्यावे.

दुपारच्या सत्रात ‘साहित्य आणि सांस्कृतिक दहशतवाद’ या विषयावरील महापरिसंवाद झाला. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. मुस्तजीब खान, प्रा. राम पुनियानी, प्रा. महेबूब सय्यद, साहील कबीर, प्रा. अली निजामुद्दीन, अन्वर राजन, प्रा. जावेद पाशा, प्रा. नारायण भोसले आणि मुजफ्फर सय्यद यांनी भाग घेतला.

प्रा. मुस्तजीब खान व प्रा. अलीमुद्दीन यांनी सांस्कृतीक

दहशतवाद व भारतातील जातीभेद यावर भाष्य केले.

अन्वर राजन म्हणाले, खरं बोलल्याशिवाय आपल्या प्रश्नाला वाचा फुटणार नाही. दहशतवादाचा सामना आपण मोठ्या प्रमाणात करत आहोत. उद्या कोणाचा नंबर लागेल, याची शाश्वती नाही. किती लोक गेले यापेक्षा किती लोकांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. मुस्लिम मराठी संमेलने घेणे म्हणजे हा एक बंडाचा भाग असल्याचं त्यांनी सांगितलं.

ब्राह्मणी दहशतवादावर सडेतोड प्रहार करताना मुंबई विद्यापाठातील प्रा. नारायण भोसले यांनी कथा-कादबऱ्यांतून प्रतीत होणाऱ्या कुरघोडीवर बोट ठेवलं. ते म्हणाले, ब्राह्मणी दहशतवादाने शूद्र तथा मनुस्मृतीच्या बंदीची मागणी केली नाही. छत्रपतींच्या अनुषंगानेदेखील हा दहशतवाद पोसण्यात आलेला आहे. त्यातूनच त्यांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटलं जाते. त्यावर आक्षेप नोंदवला तर पुन्हा ब्राह्मणी दहशतवाद फोफावतो.

प्रा. राम पुनियानी यांनी भारतातील राजकीय संकटावर भाष्य करताना म्हटलं, आज साहित्यिकांची जबाबदारी वाढली आहे. साहित्य सांस्कृतिक बदलाची एक पार्श्वभूमी तयार करतो. मुन्शी प्रेमचंद नवाबराय नावाने उर्दू भाषेमध्ये लिहीत होते. त्यांनी तत्कालीन सत्तेला आव्हान दिलं होतं. आज भारतीयतेवर जे संकट आलं आहे, त्याचा मुकाबला करण्यासाठीही परिषदेने प्रयत्नशील असावे.

त्यानंतर झालेल्या बहुभाषिक काव्य मैफलीत हिंदी, उर्दू व मराठी भाषिक २५ कवी सहभागी झाले होते. मुबारक शेख यांच्या अध्यक्षतेखाली ही काव्यसभा पार पडली. लियाकत नामोले (नाशिक) यांनी उर्दू-हिंदीसाठी, तर अरुण घोडेराव (नाशिक) यांनी मराठीसाठी सूत्रसंचालन केलं. शफी शेख (बोल्डा), अय्यूब नल्लामंदू (सोलापूर), बिस्मिल्ला सोनोशी (बुलडाणा), साहील कबीर (कुरुंदवाड), वाय.के. शेख, (दौंड), बी.एल. खान (बुलडाणा), अहमद पीरनसाब शेख (हिंगोली), जाफर शेख (नांदेड) उपस्थित होते. रात्री उशिरा सुरू झालेल्या या मैफलीत श्रोत्यांची संख्या कमी; पण मंचावर कविंची संख्या मुबलक होती.

**दुसरा दिवस**

२९ जानेवारीला सकाळी संमेलनाध्यक्ष अब्दुल कादर मुकादम यांची प्रकट मुलाखत साहील कबीर व कलीम अजीम यांनी घेतली. या मुलाखतीत मुकादमांनी बालपण ते नव्वदीपर्यंतचा त्यांचा जीवनप्रवास उलगडला. साहील कबीर यांच्या प्रश्नांचं उत्तर देताना शिवसेनेचे संस्थापक सदस्य असल्याची त्यांनी कबुली दिली व अद्यापही सेनेचे विचार मान्य असल्याचं सांगितलं. कलीम अजीम यांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना लालकृष्ण आडवाणी घरी कसे आले, त्यांनी भाजपमध्ये येण्याची ऑफर कशी दिली, किरीट सोमय्या यांनी त्यांना कसं उत्तर दिलं, हा रंजक किस्सा सांगितला.

दुपारच्या सत्रात 'मुस्लिम मराठी साहित्य चळवळीची तीन दशके : साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक अन्वयार्थ' या विषयावरील परिसंवादात प्रा. फारुख शेख, प्रा. इ.जा. तांबोळी, प्रा. शकील शेख, प्रा. जब्बार पटेल यांनी भाग घेतला. त्यानंतर 'आम्ही भारताचे लोक' या विषयावर परिसंवाद झाला. डॉ. अलीम वकील यांच्या अध्यक्षतेखाली जावेद पाशा कुरैशी, डी.एल. कराड इत्यादींनी मते मांडली. प्रा. कुरैशी यांनी वर्तमान लोकसभेत मुस्लिमांच्या प्रतिनिधीत्वावर भाष्य केलं, तर कराड यांनी कष्टकरी व श्रमिकांच्या हक्कांना डावलणाऱ्या वर्तमान सरकारवर तोफ डागली. डॉ. अलीम वकील यांनी अध्यक्षीय समारोपात ब्रिटिशांच्या फूटपाड्या राजकारणाचा समाचार घेत, फाळणी, हिंदू राष्ट्रवाद, संघाच्या भेदनीतीवर प्रहार केले.

'वर्तमान स्थितीतील मुस्लिम मराठी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक वेध' या विषयावरील परिसंवादात चार वक्त्यांनी भाष्य केलं. विक्रम गायकवाड यांनी हिंदू राष्ट्रवादात दहशतीत लोटलेल्या साहित्यिकांविषयी खंत व्यक्त केली, तर अकबर लाला यांनी हिंदू धर्मांधतेच्या सत्ताकाळात अल्पसंख्याकावर होत असलेल्या हल्ल्याचा समाचार घेतला. डॉ. रफीक पारनेरकर यांनी इस्लामिक साहित्यातील अनुबंध मुस्लिम मराठी परिप्रेक्ष्यात मांडले. इकबाल मुकादम यांनी साहित्यातून कोकणी मुसलमान व त्यांची संस्कृती अदृष्य होत असल्याबद्दल खंत व्यक्त केली. पुण्यातील एमआयटी विद्यापीठाचे सल्लागार प्रा. एस.एन. पठाण यांनी अध्यक्षीय समारोपात साहित्याने समन्वयाची भूमिका बजावावी, असा सल्ला दिला. ●●●

**(लेखक मुस्लीम साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

### वादाने रंगले साहित्य संमेलन

- संघ विचारांचे प्रचारक असल्याचा आरोप असलेले प्रा. एस.एन. पठाण व भाजपचे पदाधिकारी विक्रम गायकवाड यांना संमेलनात बोलावल्याबद्दल स्थानिकांनी आक्षेप नोंदवला. गायकवाड भाजपचे सक्रिय पदाधिकारी आहेत, तर प्रा. पठाण हिंदू राष्ट्रवाद्याचे व हिंदुत्ववाद्याचे विचार रेटतात, असा आरोप केला गेला. बाबरी मशिदीवरील ताबा मुस्लिमांनी सोडावा, यासाठी जनमत घेतल्याचं व लोकांचे मन परिवर्तन केल्याचा पठाण यांच्यावर आरोप आहे.
- बहुभाषिक काव्य मैफलीत उर्दू शायरांनी वर्चस्व गाजवलं. मंचावरील सगळ्या खुर्च्या याच शायरांनी बळकावल्याचं दिसून आलं. त्यामुळे अनेक मराठी कवी नाराज दिसून आले. मराठी साहित्य संमेलनात उर्दू कवींना कशाला बोलावलं, अशी चर्चा संमेलनस्थळी होती.
- 'सांस्कृतिक दहशतवाद' विषयावरील परिसंवादावर 'साप्ताहिक विवेक' व 'तरुण भारत'सारख्या हिंदुत्ववादी पत्राने आक्षेप नोंदवत टीका केली होती. त्या टिपणाचे लेखक प्रमोद पाठक सभागृहात पूर्ण दोन दिवस हजर होते.
- संमेलनाला परवानगी मिळवण्यासाठी संयोजकांना खूप शिकस्त करावी लागली. पोलिसांनी बंदिस्त हॉलमध्येदेखील परवानगी नाकारल्याचे सांगण्यात आलं. आदल्या दिवशी ग्रंथदिंडीचा मार्ग बदलण्याच्या अटीवर परवानगी दिली गेली.

# धर्मांतरविरोधी राजकारणाचे दुष्परिणाम



डॉ. सुरेश वाघमारे

**हिंदू धर्माने उच्च जातींना दिलेले अधिकार व त्या अधिकारांमुळे त्यांनी येथील शूद्र-अतिशूद्रांना, अस्पृश्यांना दिलेली अमानुष, अमानवी वागणूक हे धर्मांतराचे खरे कारण आहे; परंतु या देशातील हिंदू धर्मातील ठेकेदारांना आपले जातीय वर्चस्व संपूर्ण अस्पृश्य, बहुजन समाजावर प्रस्थापित करायचे आहे. त्यामुळे ख्रिश्चन, मुस्लिम यांना लक्ष्य करत सर्व प्रकारच्या धर्मांतराला कायद्याने बंदी घालून आमचा गुलामीच्या नरकातून बाहेर जाण्याचा मार्ग बंद करण्याचा प्रयत्न केला जात आहे.**

या देखण्या देशात दुर्धर रोग म्हणजे अस्पृश्यता आणि अस्पृश्यतेची मूळं जातीव्यवस्थेत आहेत आणि हिंदू धर्माचे प्रमुख वैशिष्ट्य जातीव्यवस्था आहे. जी जातीव्यवस्था आजही जात नाही. कारण ती माणसांच्या मनामनात बसली आहे. तिला हिंदू देवाचं संरक्षण, धर्माचा आधार आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे, हे असत्य आहे. कारण भारत हा देश जातीप्रधान देश आहे. कारण हा देश जातींनी भरलेला, वेढलेला आहे. जात हेच वास्तव आहे. येथील बहुसंख्य लोकांच्या दुःखाचं कारण जात आहे. या जातींनी दुःख, दैन्य, दास्य आणि अस्पृश्यता निर्माण केली. या जातीयवादी हिंदू संस्कृतीने मानवतेला पायाखाली तुडवून येथील तमाम शूद्र-अतिशूद्रांना पशूसमान जीवन जगण्यास भाग पाडले. यातूनच ही संस्कृती नावाची विकृती निर्माण झाली. या विकृत संस्कृतीमध्ये सापासारख्या विषारी प्राण्याला श्रद्धेने दूध पाजण्याची परंपरा आहे; पण माणसासारख्या माणसाला दुरून पाणी दिले जाते. मुंगीसारख्या किटकाला साखर घालणे पुण्य समजले जाते; पण माणसाला सन्मानाने भाकर देणे पाप होते. हिंदू धर्माच्या या विकृत संस्कृतीमध्ये रेड्याला वेद म्हणण्याचा अधिकार होता; पण माणसांनी वेद म्हटले, तर जीभ कापली जात असे. तुळशीसारख्या झुडपाचं लग्न लावायला ब्राह्मण पुरोहित भक्तीभावाने जातो; पण अस्पृश्यांची लग्ने लावणे त्याला अशुभ वाटत होते. अशा अमानवी विचारधर्मातून आम्हाला बाहेर काढून माणुसकीची आणि सन्मानाची वागणूक देणाऱ्या बौद्ध धर्माच्या वाटेवर आणून सोडण्याचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलं. त्यानंतर मातंग, उत्तर प्रदेशातील चर्मकार व ओबीसी समाजही या वाटेकडे वळू लागला. त्यामुळे हिंदू धर्माचे मालक, ठेकेदार म्हणून वावरणाऱ्या लोकांना धक्का बसला व त्यांनी या धर्मांतराला विरोध करायला सुरुवात केली. या धर्मांतराची वास्तव कारणे शोधण्याऐवजी काल्पनिक कारणे सांगून या धर्मांतराला विरोध केला जाऊ लागला. सन २०१४ नंतर तर संघाची सत्ता आली. त्यामुळे त्यांनी धर्मांतरासंबंधीचे कायदे करून मानवमुक्तीचा मार्गच बंद करण्याचे षड्यंत्र सुरू केले आहे.

**धर्मांतरविरोधी कायदे :**

धर्मांतर करताना ख्रिश्चन, मुस्लिम धर्माला पुढे केले आहे. कारण संघ या दोन्ही धर्मांना आपला शत्रू मानतो. या धर्माचे या देशातून



उच्चाटन करणे, हा त्याचा अजेंडा आहे. 'बंच ऑफ थॉट्स' माजी सरसंघचालक मा.स. गोळवलकर लिखित ग्रंथ हे संघाचे बायबल मानले जाते. या ग्रंथाचा मराठी अनुवाद हिंदुस्थान साहित्य, पुणे यांनी १३ ऑगस्ट १९७१ रोजी 'विचारधन' नावाचा ग्रंथ प्रकाशित केला आहे. या ग्रंथाच्या पृष्ठ क्रमांक १४१ ते १६१ वर त्यांनी हे हिंदू राष्ट्र आहे, त्याला मुसलमान आणि ख्रिश्चन यांचा अंतर्गत धोका आहे, असे स्पष्टपणे म्हटले आहे. म्हणजे सन १९२५ साली स्थापन झालेल्या संघटनेने १९६६ मध्ये हा ग्रंथ प्रकाशित केला आणि तेव्हापासून त्यांनी ख्रिश्चन, मुसलमान धर्माला टार्गेट केले आहे. आजही कायदे करताना त्यांनाच पुढे केले जाते; पण धर्मांतर कायद्यात केवळ मुसलमान किंवा ख्रिश्चन असा कुठेच उल्लेख नाही. कारण या कायद्याचे नाव 'धर्मांतरविरोधी कायदा' असे आहे. त्यामुळे बौद्ध धर्मांतरासाठी तो कायदा लागू होत नाही, असे म्हणता येणार नाही. धर्मांतरविरोधी कायदा भारतातील विविध राज्यांत करण्यात आला आहे. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

१) **ओडिशा** : धर्मांतरविरोधी कायदा करणारे हे पहिले राज्य आहे. सन १९६७ मध्ये तत्कालिन ओरिसामध्ये हा कायदा करण्यात आला. धर्मांतर घडवून आणून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस एक वर्षे शिक्षा व पाच हजार रुपये दंडाची तरतूद आहे, तर अनु.

जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणणाऱ्यास दोन वर्षे कारावास व दहा हजार रुपये दंड आहे.

२) **मध्य प्रदेश** : या राज्यात हा कायदा १९६८ मध्ये आणण्यात आला. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस एक वर्ष शिक्षा व पाच हजार रुपये दंड आहे. अनु.जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणणाऱ्यास दोन वर्षे शिक्षा व दहा हजार रुपये दंड आहे.

३) **अरुणाचल प्रदेश** : या राज्यात हा कायदा १९७८ मध्ये करण्यात आला. दंडाची व कारावासाची तरतूद वरील राज्यांप्रमाणेच करण्यात आली आहे.

४) **छत्तीसगढ** : या राज्यात २००६ मध्ये हा कायदा आला. राज्यात धर्मांतर कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास तीन वर्षे शिक्षा व वीस हजार रुपये दंडाची तरतूद आहे. अनु.जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणणाऱ्यास चार वर्षे शिक्षा व एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

५) **गुजरात** : हे राज्य संघाची प्रयोगशाळा मानली जाते. या राज्यात २००३ मध्ये हा कायदा असला तरी या कायद्याचे उल्लंघन झाल्यास तीन वर्षे शिक्षा व पन्नास हजार रुपये दंडाची तरतूद आहे. तर अनु.जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणणाऱ्यांवर चार वर्षे कारावास व एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

६) **उत्तराखंड** : या राज्यात सन २०१८ मध्ये हा कायदा आला. या कायद्याचे उल्लंघन केल्यास एक वर्ष कारावास व पाच हजार रुपये दंड आहे. तर अनु.जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणणाऱ्यास दोन वर्षे कारावास व सात हजार रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद आहे.

७) **हिमाचल प्रदेश** : या राज्यात सन २०१९ मध्ये हा कायदा करण्यात आला आहे. या राज्यात या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास १ ते ५ वर्षे कारावासाची तरतूद आहे, तर अनु.जाती-जमातीत घडवून आणणाऱ्यास १ ते ७ वर्षे कारावास अशी शिक्षा आहे.

८) **उत्तर प्रदेश** : सन २०२० मध्ये हा कायदा लागू करण्यात आला आहे. या राज्यात या कायद्याचे उल्लंघन केल्यास १ ते ५ वर्षे कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे आणि अनु.जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणल्यास २ ते ५ वर्षांचा कारावास व १५ हजार रुपये दंडाची शिक्षा आहे.

९) **कर्नाटक** : या राज्यात सन २०२१ मध्ये हा कायदा आला आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्यास दहा वर्षे कारावास व एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे. भाजपाचे मुख्यमंत्री बस्वराज बोम्मई यांच्या काळात हा कायदा अतिशय घाईत आणण्यात आला. या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे अनु.जाती-जमातीत धर्मांतर घडवून आणल्यास कडक शिक्षेची तरतूद आहे, तसेच या सर्व राज्यातील कायद्यान्वये धर्मांतर घडवून आणणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे. या सर्व राज्यांमध्ये कायदा आणला गेला असला, तरी उत्तर प्रदेश व गुजरात या राज्यात कायद्याची अंमलबजावणीदेखील सुरू झाली आहे. उत्तर प्रदेशात तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतरावेळी दिलेल्या २२ प्रतिज्ञांवरही आक्षेप घेतला आहे. आपल्या विवाह पत्रिकेवर २२ प्रतिज्ञा छापल्या म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा धर्मांतरविरोधी कायदा लागू करण्याचे प्रमुख कारण लव्ह



जिहाद, आर्थिक प्रलोभन, बळजबरीने धर्मांतर केले जाते, असे नमूद केले आहे आणि या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने तर धर्मांतरामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो आणि नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावरही यामुळे गदा येऊ शकते, अशी भीती १४ नोव्हेंबर २०२२ रोजी व्यक्त केली आहे. हा अत्यंत गंभीर प्रश्न असून तो हाताळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे निर्देश दिले आहेत. अशा प्रकारची धर्मांतरे रोखण्यात अपयश आले, तर देशात कठीण परिस्थिती उद्भवेल, असा इशारा मा. न्या. एम.आर. शहा यांनी दिला आहे. धर्मस्वातंत्र्य असू शकते; पण सक्तीच्या धर्मांतरातून धर्म स्वातंत्र्य मिळू शकत नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. यावरून सक्तीचे धर्मांतर या नावाखाली धर्मांतरावर रोख लावला जाणार, हे यावरून स्पष्ट होते.

सन २००३ मध्ये गुजरातमध्ये कायदा आला असला, तरी सन २०१४ पासून त्यांनी देशातील धर्मांतरावर लक्ष केंद्रित केलेले दिसून येते. त्याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास ऑक्टोबर २०१५ मध्ये लातूर येथे डी.एस. नरसिंगे यांनी १५० हिंदू मातंग व्यक्तींसह धर्मांतर केले. त्यावेळी आणि आजही धर्मांतरविरोधी कायदा महाराष्ट्रात लागू करण्यात आलेला नाही. तरीही डी.एस. नरसिंगे यांच्या धर्मांतराची पोलिसांनी चौकशी केली. धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींची यादी देण्याचा पोलिसांनी आग्रह धरला. महाराष्ट्रात धर्मांतरविरोधी कायदा नसतानाही पोलिसांच्या चौकशीचा अर्थ काय घ्यायचा? या संदर्भातील माहिती देताना डी.एस. नरसिंगे म्हणतात, की या धर्मांतरानंतर तीन-चार महिन्यांनी म्हणजे जानेवारी २०१६ मध्ये मोहन भागवत लातूरमध्ये आले, तेव्हा त्यांनी मातंगांनी धर्मांतराची घाई करू नये, असे आवाहन केले होते. याचाही शांत डोक्याने विचार करण्याची गरज आहे.

थोडक्यात, धर्मांतरविरोधी कायद्यानुसार धर्मांतर आर्थिक प्रलोभनातून घडून येते. लोकांना नोकरीचे आमिष दाखविले जाते आणि त्यातून त्यांचे धर्मांतर केले जाते. धर्मांतराचे दुसरे कारण बळजबरीने किंवा लोकांवर दबाव आणून धर्मांतर घडवून आणले जाणे. १४ नोव्हेंबर २०१५ रोजी सर्वोच्च न्यायालयानेही असेच मत नोंदविले आहे. तिसरे कारण लव्ह जिहाद आहे. त्यातूनच धर्मांतरे घडवून आणली जातात.

या सर्व कारणांचा शोध घेतला तर हे लक्षात येते, की स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम व ख्रिश्चन धर्मांतरे बळजबरीने प्रलोभनाने झाल्याची उदाहरणे सापडतात; पण स्वातंत्र्योत्तर काळातील धर्मांतरांचा अभ्यास केल्यास बळजबरीने, दबाव आणून, शस्त्राचा धाक दाखवून किती

धर्मांतरे झाली आहेत, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. तसेच गरिबी हे धर्मांतराचे प्रमुख कारण आहे काय, याचाही शोध घेण्याची गरज आहे.

गरिबी हे धर्मांतराचे कारण असेल, तर दलित-आदिवासी यांच्याशिवाय या देशातील सवर्ण जातीत गरीब लोक नाहीत काय? मग त्यांनी धर्मांतर का केले नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वातंत्र्योत्तर काळात सामूहिक मुस्लिम धर्मांतराची एकमेव घटना मीनाक्षीपुरम् येथे घडली आहे. तामिळनाडूतील तिरुनवेला जिल्ह्यापासून १५ कि.मी. अंतरावर असलेल्या मीनाक्षीपुरम् या गावातील १४३ कुटुंबातील ६०० लोकांनी १९ फेब्रुवारी १९८१ रोजी मुसलमान धर्माचा स्वीकार केला; पण हे धर्मांतर करण्यासाठी मुसलमानांनी दबाव टाकला नव्हता किंवा पैशाचे आमिषही दाखवले नव्हते. मीनाक्षीपुरम् येथे अस्पृश्यांसाठी वेगळे रस्ते होते, त्यांना वाहन चालविण्याची बंदी, शिक्षणबंदी, दागिने घालण्याची बंदी होती. या गावातील थेवर या सवर्ण जातीच्या अशा अमानुष अत्याचाराला कंटाळून हे धर्मांतर केले होते. या गावात थेवर जातीच्या घरासमोरून पायात वाहन घालून जाण्यास अस्पृश्यांना बंदी होती. तसेच त्यांच्यावर अमानुष बंधने टाकण्यात आली होती. त्यानंतर १५ नोव्हेंबर १९८१ रोजी भाऊसाहेब पवार या मातंग नेत्याच्या नेतृत्वाखाली मातंग समाजाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. ही धर्मांतरे बळजबरीने किंवा प्रलोभन दाखविले म्हणून झालेली नव्हती.

एवढेच नव्हे, तर काँग्रेस सरकारमध्ये असलेले तत्कालिन काँग्रेस नेते जगजीवन बाबू यांनीही मुस्लिम धर्म स्वीकारण्याची घोषणा केली होती. ही घोषणा पैशाच्या प्रलोभनातून केलेली नव्हती. या देशात ख्रिश्चन धर्मांतरे मोठ्या प्रमाणात झाली. विशेषतः आदिवासी समूहातही मोठ्या प्रमाणात धर्मांतरे झाली; पण सर्वच धर्मांतरे ही पैशाच्या लोभासाठी झाली' असे म्हणता येणार नाही. नाडर जमातीतील स्त्री पहिल्यांदा ख्रिश्चन झाली. त्याचे कारण नाडर जमातीतील स्त्रियांना कमरेच्या वर वस्त्र घालण्यास बंदी होती, त्याला विरोध म्हणून नाडर स्त्रियांनी कमरेच्या वर वस्त्र घातली, तेव्हा धर्माच्या ठेकेदारांनी त्यांची वस्त्रे भर रस्त्यात फाडली. त्यामुळे त्यांनी आपली अब्रू झाकण्यासाठी ख्रिश्चन धर्म स्वीकारला तर ते चुकले कुठे?

समाजशास्त्रज्ञ धुर्ये यांनी 'जाती, वर्ग आणि व्यवसाय' या ग्रंथात संपूर्ण भारतात अस्पृश्य जातीवर कशी बंधने टाकलेली होती, याचे सविस्तर वर्णन केले आहे. हे वाचल्यानंतर अस्पृश्यांवर होणाऱ्या अमानवी अत्याचाराची कल्पना येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, माणसाला सामाजिक गुलामीत ठेवणे नाही, तर मानसिक विकास घडवून आणणे हे धर्मांतराचे अंतिम ध्येय असते आणि जो धर्म माणसाला गुलामीत ठेऊ इच्छितो त्याला मी धर्म मानत नाही. या भूमिकेतून त्यांनी धर्मांतर घडवून आणले. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास, हिंदू धर्माने उच्च जातींना दिलेले अधिकार व त्या अधिकारांमुळे त्यांनी येथील शूद्र-अतिशूद्रांना, अस्पृश्यांना दिलेली अमानुष, अमानवी वागणूक हे धर्मांतराचे खरे कारण आहे; परंतु या देशातील हिंदू धर्मातील ठेकेदारांना आपले जातीय वर्चस्व संपूर्ण अस्पृश्य, बहुजन समाजावर प्रस्थापित करायचे आहे. त्यामुळे



ख्रिश्चन, मुस्लिम यांना लक्ष्य करत सर्व प्रकारच्या धर्मांतराला कायद्याने बंदी घालून आमचा गुलामीच्या नरकातून बाहेर जाण्याचा मार्ग बंद करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

धर्मांतर सोहळ्यात २२ प्रतिज्ञा म्हटल्या म्हणून दलित मंत्र्याला लक्ष्य करून त्याला राजीनामा देण्यास भाग पाडले जाते. ब्रम्हा, विष्णू, महेश, राम, कृष्ण यांना देव मानत नाही, असे म्हणणे म्हणजे तमाम हिंदूंचा अपमान आहे, असा कांगावा भाजप-संघाची मंडळी करत आहेत. ज्या ब्रम्हाने शूद्रांना पायातून जन्म दिला, वेद पठण केले म्हणून ज्या रामाने शंभूकाचा खून केला, त्याला देव न मानणे हा हिंदू ठेकेदारांचा अवमान कसा ठरू शकतो?

या सर्व बाबींचा गुलामीतून बाहेर येऊ पाहणाऱ्या अस्पृश्य बहुजन समाजाने विचार करण्याची गरज आहे. अशा कायद्याला विरोध करण्याची गरज आहे. किमान महाराष्ट्रात तरी हा कायदा येऊ नये, यासाठी दक्ष राहिले पाहिजे. केरळ, राजस्थान येथे या कायद्याला विरोध केला म्हणून या राज्यात हा कायदा आणता आला नाही. तो आदर्श महाराष्ट्रानेही घेतला पाहिजे. अशा विचारांचे आमदार व सरकार सत्तेत येऊ नये, या भूमिकेतून मतदान करण्याची गरज आहे. कारण आता या देशाला हिंदू राष्ट्र करण्याची स्वप्ने पाहिली जात आहेत. त्यांच्या हिंदू राष्ट्रात गुलाम म्हणून राहण्यासाठी आम्हाला या धर्मातून बाहेर पडण्याची बंदी केली जात आहे. हे षड्यंत्र ओळखून वाटचाल केली नाही, तर पुन्हा आम्हाला गुलामीच्या खाईत लोटले जाणार आहे. त्या अंधारखाईत लाचारी, गुलामी, अमानुष अत्याचार याशिवाय काहीच असणार नाही.

मुस्लिमांना लक्ष्य करून 'लव्ह जिहाद' हे धर्मांतराचे प्रमुख कारण मानून धर्मांतराच्या वास्तव कारणास बाजूला करण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. सर्वसामान्य लोकांची दिशाभूल केली जात आहे आणि असे लोक संघाच्या जाळ्यात अडकत आहेत. २० नोव्हेंबर २०२२ रोजी परभणीत धर्मरक्षणाच्या नावाखाली निघालेला मूक मोर्चा त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. या मोर्चातही लव्ह जिहाद, प्रलोभने, धमकावणे, फसवणूक ही संघाने कल्पिलेली कारणेच पुढे केली. या देशात दररोज मिनिटांनी दलित महिलेवर अत्याचार होतो, दलितांची हत्या होते, त्यांना मंदिरात प्रवेश नाकारला जातो. या देशातील सूर्य दलितांची हत्या, महिलांची विटंबना पाहिल्याशिवाय मावळत नाही. तरीही दलितांनी या धर्मातच रहावे, असे या धर्मातील ठेकेदारांना वाटते. खरं तर, त्यांनी असे मूकमोर्चे काढण्यापेक्षा धर्मांतराच्या वास्तव कारणावर तोंड उघडण्याची गरज आहे. •••

**(लेखक आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत आहेत.)**

# प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा उलटा प्रवास



प्रा. डॉ. प्रदीप
पंजाबराव दंदे

**देशातील रिपब्लिकन पक्षच असा एकमेव पक्ष आहे, की ज्याच्या ध्येयधोरणात संविधानाचे प्रास्ताविक हे ध्येय मानले आहे. अशा स्थितीत धर्मनिरपेक्षतेचे पालन करणे हे ध्येय असलेला पक्ष जर कट्टर हिंदुत्ववादी संघटना, पक्षाशी युती-आघाडी करत असेल आणि त्याचा फायदा केवळ आणि केवळ नेत्याला आमदारकी, खासदारकी करण्यापुरताच होत असेल, तर मग अशा युती-आघाडीचा फायदा काय?**

तुमच्याकडे आंबेडकर तर आमच्याकडे कवाडे आहेत, हे दाखवण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाने फर्डे वक्ते आणि लाँग मार्च प्रणेते पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या गटाशी आघाडी केल्याची घोषणा केली. तेव्हा कवाडे यांनी एकनाथ शिंदे धाडसी नेतृत्व आहेत, धाडसी नेते आम्हाला आवडतात म्हणून आम्ही एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांच्या शिवसेना या पक्षाशी आघाडी केल्याचे म्हटले. शिंदे हे धाडसी आणि संघर्षशील नेतृत्व म्हणून शिंदे-कवाडे हे दोन ध्रुव एकत्र येत असल्याचे म्हणत असले, तरी आपला राजकीय विजनवास संपविण्यासाठी त्यांनी शिंदे पर्यायाने भाजपाशी आघाडी केली असल्याचे बोलले जात आहे.

**तुमच्याकडे 'आंबेडकर' तर आमच्याकडे 'कवाडे'**

ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीची शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाशी महापालिका व त्यानंतरच्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत युती करत असल्याचे म्हणताच, दुसऱ्या दिवशी शिंदे-कवाडे यांच्याशी युती होणे म्हणजे तुमच्याकडे 'आंबेडकर तर आमच्याकडे कवाडे' असे भासविण्यासाठी ही आघाडी बनली आहे.

राज्याच्या राजकारणात आंबेडकरी समाजाची मते ही सहा टक्क्यांच्या घरात आहेत. त्यात प्रकाश आंबेडकर यांचा वरचष्मा आहे. तो त्यांनी निर्माण केलेल्या 'अकोला पॅटर्न'ने पुन्हा नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत दाखवून दिला आहे. २०१९ च्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीतही त्यांना राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यतेसाठी केवळ दहा लाख मते कमी पडली होती. ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यानंतर राज्याच्या राजकारणात रामदास आठवले यांच्या पक्षाचे प्राबल्य आहे. हे शहरी भागापर्यंत मर्यादित असले, तरी राज्यभर त्यांचा वावर आहे. त्या तुलनेत निवडणुकांच्या राजकारणात प्रा. कवाडे सरांची ताकद तुलनेने अत्यल्प आहे. याची जाणीव भाजपसह शिंदे गटाला आहे. मात्र, निवडणुकांच्या रणांगणात प्रा. कवाडे सरांसारख्या खड्या वक्त्याचा फायदा घेणे आणि त्या बदल्यात त्यांना किंवा त्यांच्या मुलाला राजकीय स्थैर्य देणे, या एकमेव मुद्यावर ही आघाडी बनली आहे. आंबेडकर, आठवले, कवाडे यांच्याशिवाय रिपब्लिकन पक्षाच्या गवई, खोब्रागडे गटाची राज्याच्या राजकारणात ताकद होती; परंतु



राजाभाऊंच्या निधनानंतर खोरिपची अनेक शकले झालीत म्हणून त्यांना मानणारी मते विशेषत: विदर्भातील मते ही बहुजन समाज पक्षाकडे वळती झाली. तर दादासाहेब गवई यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा डॉ. राजेंद्र गवई यांना दादासाहेबांचा वारसा पुढे नेता आला नाही, ही आजची स्थिती आहे. राज्यातच नाही तर जिल्ह्यातही त्यांची ताकद क्षीण झाली आहे. आंबेडकर, आठवले, कवाडे, बसपा यांच्यानंतर राज्यभर वावर असलेला दुसरा गट नाही. नाही म्हणायला ते राष्ट्रीय असल्याचे बोलत असले, तरी जिल्ह्यातही अनेकांची ताकद नाही. त्यांचा वापर केवळ निवडणुकीपुरता केला जातो. हे पक्ष म्हणजे आमची कुठेही शाखा नाही या प्रकारची आहेत.

नेते निवडणुका जवळ आल्या, की या ना त्या पक्षाशी युती, आघाडी करतात. त्यामुळं दलितांची मतविभागणी होते. म्हणून आंबेडकरी समाजातील लोकांना इतर पक्षाशी युती केल्यापेक्षा आंबेडकरी समूहाच्या सर्व गटांनी एकत्र यायला पाहिजे, असा समाजाचा आग्रह असतो; परंतु राज्याच्या एकूणच राजकारणाचा विचार केला आणि निवडणूक निकाल पाहिले तर असे दिसून येते, की काँग्रेस असो की राष्ट्रवादी, भाजपा असो की शिवसेना, कोणत्याही पक्षाने एकट्याने निवडणूक लढली तर बहुमताचे सरकार येत नाही. रिपब्लिकन पक्षाने एकसंघपणे स्वतंत्र निवडणुका लढल्या, तरी तो निवडणुकीच्या आखाड्यात अल्पसंख्य ठरतो. स्थानिक पातळीवर निवडणुका लढविल्या तर काही ठिकाणी या पक्षाला यश येऊ शकते. मात्र, विधानसभा, लोकसभा निवडणुकीत तर ते शक्य नाही. कुणाच्या तरी मदतीशिवाय विधानसभा, लोकसभेत यश मिळत नाही. विधानसभेत उत्तर नागपूर, दर्यापूर यांशिवाय काही अन्य मतदारसंघांत मोठ्या संख्येने आंबेडकरी मतदार आहेत. तेथून पूर्वी रिपब्लिकन पक्षाचे आमदार विजयी झाले. आता ते अवकाश काँग्रेसने कवेत घेतले आहे. त्यामुळे नेत्यांनी कोणाशी युती-आघाडी करावी, हे त्यांचं त्यांना स्वातंत्र्य असलं, तरी ज्या धोरणातून पक्ष स्थापन झाला त्या धोरणांचे काय? देशातील रिपब्लिकन पक्षच असा एकमेव पक्ष आहे, की ज्याच्या ध्येयधोरणात संविधानाचे प्रास्ताविक हे ध्येय मानले आहे. अशा स्थितीत धर्मनिरपेक्षतेचे पालन करणे हे ध्येय असलेला पक्ष जर कट्टर हिंदुत्ववादी संघटना, पक्षाशी युती-आघाडी करत असेल आणि त्याचा फायदा केवळ आणि केवळ नेत्याला आमदारकी, खासदारकी करण्यापुरताच होत असेल, तर मग अशा युती-आघाडीचा फायदा काय?

**स्वकेंद्री राजकारण हा आंबेडकरी नेत्यांचा धर्म!**

प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी आठवले जेव्हा भाजपासोबत गेले, तेव्हा आठवले लांडग्यांच्या कळपात गेल्याचे म्हटले होते. आता तेच कवाडे लांडग्यांच्या कळपात जात असतील, तर त्याला काय म्हणावे? समूहकेंद्री राजकारणाऐवजी स्वकेंद्री राजकारण हा आंबेडकरी नेत्यांच्या राजकारणाचा धर्म बनला आहे काय? आंबेडकरी विचारवंत प्रा.डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'माझा कट्टा'वर बोलताना, पैसा व सत्ता हेच दलित नेत्यांच्या राजकारणाचे सूत्र असल्याचे विधान केले. त्यांचे हे विधान चिंतनाचा विषय आहे. देशातील दलितांचे एकूणच राजकारण भाजपाच्या अंगाने वळण घेत आहे. रिपब्लिकन नेत्यांना पैसा व सत्तेची हाव असल्याने ते असं वागतात, असं म्हटलं तर हे तितकं मनाला पटत नाही. १९९९ साली (अकरावी लोकसभा) अटलबिहारी वाजपेयी सरकार केवळ एका मताने पडले, तेव्हा रिपब्लिकन पक्षाचे चार खासदार होते. चारपैकी दोघांना कॅबिनेट मंत्री आणि दोघांना कॅबिनेट दर्जा असलेलं महामंडळाचं अध्यक्षपद अशी संधी होती. असे असतानाही केवळ भाजपाच्या धोरणाला विरोध म्हणून ती संधी नाकारली होती. त्यामुळं आजकालचं केवळ आमदारकी, खासदारकीसाठी नेत्यांचं वागणं हे 'आंबेडकरी नेतृत्वाचा उलटा प्रवास' या रावसाहेब कसबेंच्या विधानावर शिक्कामोर्तब करणारं आहे.

**नेत्यांना हे प्रश्न दिसत नाहीत का?**

मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाची गळचेपी केली जात आहे. महत्प्रयासाने दिलेले संविधानातील आरक्षण हेतूपुरस्सर, पद्धतशीरपणे सरकारी उद्योगाचे खाजगीकरण करून संपविले जात आहे. शिक्षण देणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य असले, तरी शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणापासून गरिबांना बेदखल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या मागास विद्यार्थ्यांना वर्ष, दोन-दोन वर्ष शिष्यवृत्ती मिळत नाही. याशिवाय बेरोजगारी, महागाई, घरकुल असे अनेक प्रश्न आ वासून असताना नेत्यांना हे प्रश्न दिसत नाहीत का?

एकट्या डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या, आरक्षणाच्या माध्यमातून लाखो, करोडो अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासांना स्थानिक स्वराज्य संस्थेत लोकप्रतिनिधी, हजारो आमदार, खासदार, मंत्री , आयएएस, आयपीएस, लाखो उपजिल्हाधिकारी, प्राध्यापक, वकील, अधिकारी बनविले; परंतु हे सर्व नेते संविधानाच्या चिंधड्या होत असताना संविधान आणि लोकशाही वाचविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी 'संघ विरुद्ध संविधान' चा नारा देणारेच संघाच्याच पालखीचे भोई बनत आहेत, ही खरी चिंतेची बाब आहे.

**आंबेडकरी नेत्यांचा प्रवास उलट्या दिशेने**

देशात पसरविले जाणारे द्वेषाचे राजकारण आणि मागासवर्गीयांचे न्याय्य हक्क, हे सर्व प्रश्न पाहता सर्वांनी एकत्र येऊन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत, सरकारी उद्योगांच्या खाजगीकरणाला विरोध व अन्य प्रश्नांवर आपला अजेंडा ठरवत निवडणुकीला सामोरे जायला हवे. त्याऐवजी समाजाचं काय, पेक्षा माझ्या सत्तेचं काय, यावरच नेत्यांचा भर दिसतो आहे. आज कवाडे सर यांनी शिंदे म्हणजे पर्यायाने भाजपाशी समझोता केला आहे. एवढेच नव्हे तर, डॉ. राजेंद्र गवईचा कलही त्याच दिशेने आहे? नागपूरच्या ॲड. सुलेखा कुंभारे अनेक वर्षांपासून भाजपसोबत आहेत. समाज म्हणून हे नेते एकत्र येत नाहीत; परंतु आपल्या वाट्याला काही मिळत असेल, तर मग मात्र दुसऱ्या मार्गाने भाजपसारख्या पक्षाशी युती-आघाडी करीत आहेत. अशा रितीने आंबेडकरी नेत्यांचा 'संघ विरुद्ध संविधान' म्हणत सुरू झालेला प्रवास 'संविधान विरुद्ध संघ' या उलट्या दिशेने सुरू आहे.

आंबेडकरी नेत्यांची अहमहमिका एवढी टोकाला गेली आहे, की ते विरोधी पक्षांशी युती-आघाडी करतील. मात्र, समाजाच्या हितासाठी एकत्र येऊन निवडणुका लढवित नाहीत. या स्थितीतून नेते बाहेर पडत नसतील, तर २०२४ नंतर आरक्षण, विशेषत: नोकऱ्यातील आरक्षण संपलेले असेल आणि आज हिंदू-मुस्लिम वाद दिसत असला तरी पुढे हिंदू-दलित विशेषत: आंबेडकरवादी, असा संघर्ष पहायला मिळणारच नाही असं नाही. त्यातून या नेत्यांनी बाहेर पडले पाहिजे. ज्या प्रकाश आंबेडकर यांच्या पक्षाला भाजपाची 'बी टीम' म्हटले जाते, त्यांनी यावेळी जी भूमिका घेतली त्याला 'ओ' देत संविधान, दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्याकांचे हक्क आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी भाजपाविरोधी एकजूट करून निवडणुकांना सामोरे जाणे, हेच सध्याचे सामाजिक वास्तव आहे.

●●●

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# शांताबाई कृष्णाजी कांबळे



प्रो. डॉ. नितीश सावंत

**मनुवादी संस्कृती 'स्त्री' आणि 'शूद्र' या समाजातील घटकांना शिकू देत नव्हती; परंतु या व्यवस्थेला तडा देण्याचे काम सुमारे शंभर वर्षापूर्वी शांताबाई कृष्णाजी कांबळे या पहिल्या दलित लेखिकेने केले. शिक्षिकेपासून शिक्षणाधिकारी पदापर्यंतचा त्यांचा प्रवास मनाला चटका लावून जातो. जातीयतेचे दाहक चटके, स्त्री म्हणून होणारी अवहेलना सहन करीत शांताबाई कृष्णाजी कांबळे या शंभर वर्षांचे आयुष्य जगून, भोगून २७ जानेवारी २०२३ रोजी आपल्यातून निघून गेल्या. त्यांच्याविषयी थोडेसे...**

हजारो वर्षे प्रस्थापित व्यवस्थेने गुलामगिरीत जीवन जगायला लावणाऱ्या दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने नवे आत्मभान आले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र जपून त्यांनी शिकायला सुरुवात केली; परंतु मनुवादी संस्कृती 'स्त्री' आणि 'शूद्र' या समाजातील घटकांना शिकू देत नव्हती; परंतु या व्यवस्थेला तडा देण्याचे काम सुमारे शंभर वर्षापूर्वी शांताबाई कृष्णाजी कांबळे या पहिल्या दलित लेखिकेने केले. जन्माने महार. महारकीची कामे करीत करीत पोटाला पोटभर अन्न नसताना, सुगीच्या वेळी, शेतावरच्या बैलांनी खाल्लेली आणि शेणातून पडलेली ज्वारी धुऊन स्वच्छ करून खाऊन त्यांनी सातवीपर्यंतचे शिक्षण खेड्याहून खेडे असलेल्या गावात आवडीने व जिद्दीने केले. शिक्षिकेपासून शिक्षणाधिकारी पदापर्यंतचा त्यांचा प्रवास मनाला चटका लावून जातो. जातीयतेचे दाहक चटके, स्त्री म्हणून होणारी अवहेलना सहन करीत शांताबाई कृष्णाजी कांबळे या शंभर वर्षाचे आयुष्य जगून, भोगून २७ जानेवारी २०२३ रोजी आपल्यातून निघून गेल्या.

भारतीय समाजरचनेत आजही जातीचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात जाणवते. मानवनिर्मित विषम समाजरचनेमुळे मानव म्हणून जन्माला येऊनही समाजातील काही घटकांना दाबण्या-दडपण्यासाठी व स्वत:ची सत्ता टिकविण्यासाठी ही अमानुष व्यवस्था काही वर्गाने उभारली आणि तळागाळातील समाजाचे मानवत्व हिरावून घेतले. जात कशी निर्माण झाली याविषयी विविध विचारवंतांनी विविध सिद्धांत मांडले आहेत. जातीमध्ये उपजाती आणि पोटजाती आहेत. प्रत्येक जातीत श्रेष्ठ-कनिष्ठतेची उतरंड आढळते. त्या उतरंडीमध्ये प्रत्येक जातीचे विशिष्ट स्थान निश्चित आहे. स्मृती-श्रुतीच्या आधाराने स्तरीकरण आहे व ते दैवी असल्याकारणाने त्यात परिवर्तन अशक्य आहे. हे सांगण्यासाठी व स्त्रीमहात्म्य नाकारण्यासाठी ब्रह्मा हा विश्वाचा निर्माता आहे, ही संकल्पना मांडली गेली. ज्याने-त्याने आपापल्या दर्जानुसार रहावे हा विचार मांडला गेला. मनुस्मृतीच्या कालखंडापासून ब्राह्मणेत्तर समूहाला दडपण्याचे कार्य विविध माध्यमांतून होत आहे.



क्रांतीबा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारक कार्याचा परिपाक म्हणून प्रस्थापित समाजरचनेला हादरे बसले. फुले-आंबेडकरांनी कठोर धर्मचिकित्सा केली आणि समाजपरिवर्तनाचे नवे प्रारुप बहुजन आणि शूद्रातिशूद्रांसमोर ठेवले. ज्या समूहाला आपले शोषण होत आहे याची जाणीव नव्हती, त्या समूहास आपण शोषित आहोत याची जाणीव त्यांनी करून दिली. अशी जाणीव झालेली मराठी साहित्यातील पहिली दलित लेखिका म्हणजे आपल्या जन्माची चित्तरकथा मांडणारी म्हणजेच ''माझ्या जन्माची चित्तरकथा'' या आत्मवृत्ताची लेखिका सौ. शांताबाई कृष्णाजी कांबळे होय. त्यांचा जन्म ०१/०३/१९२३ रोजी मु. पो. करगणी, ता. आटपाडी, जि. सांगली येथे दलित कुटुंबात झाला. घरची गरिबी, वडील गावातील पाटलांकडे सालानं जनावरे राखण्याचे काम करायचे. आई गावात गवताचे भारे विकायची. भीक मागायची. **(उर्वरित पान ३७ वर..)**



डॉ. अनमोल शेंडे


# आई समजून घेताना : उत्कट भावनांच्या कल्लोळाचे प्रभावी चित्रण

उत्तम कांबळे हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत आहेत. त्यांच्या एकूणच साहित्याला महाराष्ट्रातील वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला असून त्यांचे लेखन सूर्यसंस्कृतीशी आणि ज्ञानसंस्कृतीशी अभेद्य असे नाते जोडणारे आहे. परिवर्तन आणि स्पष्टता हा त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव आहे. उत्तम कांबळे यांचं समग्र लेखन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून उगवलेलं असून त्यांच्या लेखनात असलेलं विचारलालित्य वाचकांना झपाटून टाकणारं आहे. मानवी समाज सुखी होण्याची अखंड तहान त्यांच्या लेखनाला लागलेली असते. जगणे आणि लिहिणे यात कुठलेही अंतर न पडल्यामुळे त्यांचं लेखन पूर्ण एकजीव, घट्ट, जिवंत, प्रवाही नि जीवनाशी पूर्णपणे समरस झाल्याचे प्रत्ययाला येते.

उत्तम कांबळे यांचं 'आई समजून घेताना' हे मराठी साहित्यातील बहुचर्चित असं पुस्तक आहे. मागील पंधरा वर्षांत या पुस्तकानं अमाप लोकप्रियता संपादन केलेली असून वाचकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केलं आहे. अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या या पुस्तकाचा काही भाषांमध्ये अनुवादही झाला आहे. महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्वाधिक खपाच्या पुस्तकांच्या यादीत या पुस्तकाचा नामोल्लेख झाला असून सर्वाधिक खपाचं पुस्तक म्हणून ई टीव्हीने या पुस्तकावर बातमीही केली. एकूणच मराठी साहित्यसृष्टीतील एक महत्वाचं पुस्तक म्हणून 'आई समजून घेताना' या पुस्तकाची महता मान्य केली गेली.

उत्तम कांबळे यांच्या लेखनाला वेधक असे सामाजिक मूल्य आणि वाङ्मयमूल्यही आहे. त्यांची भाषा वाचकांच्या थेट काळजाशी नातं सांगणारी आहे. त्यांच्या भाषेला नाविन्यतेचा सोस असल्यामुळे कलाकृतीत उतरणारा आशय त्यामुळे अधिकच जिवंत आणि रसरशीत वाटतो. उत्तम कांबळे यांचे लेखन वाचणे हा प्रसन्न करणारा अनुभव जसा असतो, तसा स्वत:ला अद्ययावत करणारा, जागरूक करणारा, संपन्न अनुभवही असतो. केवळ वाचले पाहिजे म्हणून उत्तम कांबळे यांचे लेखन वाचले जात नाही; तर मनात आणि जीवनातही त्यांच्या साहित्यकृतीची प्रत्यक्ष नोंद व्हावी, या उत्कट जाणिवेतूनच त्यांच्या लेखनाचा विचार होतो. 'आई समजून घेताना' हे पुस्तक तर वाचकांच्या विचार-भावनांशी सख्य जोडणारं, सुंदर जीवनानुभव देणारं आणि नेणिवेचं कॅथॉर्सिस करणारं पुस्तक आहे.

'आई समजून घेताना' हे पुस्तक म्हणजे आईच्या म्हातारपणातील हकिकत आहे. आईच्या आयुष्याची चित्तरकथा आहे. वर्गीय आणि वर्णीय संघर्षाचा आलेख आहे. हे पुस्तक म्हणजे पिकलेल्या पानाचे जिवंत मनोगत आहे आणि स्त्रियांकडे तथा समाजाकडे पाहणारा नवा दृष्टिकोनही प्रदान करणारं आहे. 'आई समजून घेताना' हे पुस्तक स्वकथनाच्या अंगाने जाणारे असून मराठी साहित्यक्षेत्रात आईसंबंधी इतक्या प्रांजळपणे आणि सविस्तरपणे लिहिले गेलेले हे पहिलेच पुस्तक मानायला हवे. 'श्यामची आई' या पुस्तकाचा उल्लेख यासंदर्भात गैरलागू ठरावा. कारण 'श्यामची आई' ही कादंबरी आहे. कल्पनेचे मिश्रण या कादंबरीत असून वस्तुस्थितीपासून दूर जाणारी ही कादंबरी आहे. 'आई समजून घेताना' हे पुस्तक सद्यस्थितीवर आधारित आहे. इथे कुठल्याही कल्पनेला थारा नाही.




हे पुस्तक म्हणजे आईला समजून घेण्याचा मनस्वी प्रयत्न आहे; परंतु आईचे मानसविश्व आणि भावविश्व जाणून घेताना, समजून घेताना लेखकाला प्रचंड त्रास होतो. याचे कारण असे आहे, की लेखकाची आई वेगळ्या पर्यावरणात वाढलेली आहे. तिच्या दु:खाचा पोत वेगळा आहे. तिने जीवनाशी केलेला संघर्ष वेगळा आहे आणि लेखक ज्या सामाजिक पर्यावरणात वाढलेला आहे, ते वातावरण वेगळं आहे. लेखकाच्या वाट्याला आलेला संघर्ष, दु:ख वेगळं आहे. आईच्या जगण्याच्या कल्पना वेगळ्या आणि लेखक जगू पाहणाऱ्या प्रतिष्ठेच्या कल्पना वेगळ्या. त्यामुळे संवाद साधताना बऱ्याचदा दोघांचीही अडचण झालेली आहे. दोघांचंही अनुभवविश्व वेगळं असल्यामुळे, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असल्यामुळे एकमेकांच्या जाणीवविश्वाला छेद देणारी विधाने या पुस्तकात येणं हे स्वाभाविकच मानायला हवं.

आईची पाळेमुळे ग्रामीण भागाशी घट्टपणे जुळलेली आहेत. वरवरचेपणा किंवा देखावा तिला अजिबात आवडत नाही. लेखकाच्या जगण्यात शिरलेल्या मध्यमवर्गीय संकल्पना तिने झुगारून दिलेल्या आहेत. कुठल्याही परिस्थितीत मातीशी असलेलं नातं ही

आई तुटू देत नाही. त्यामुळेच व्हॅक्युम क्लिनर, वॉशिंग मशीन, कुकर, मिक्सर, टोस्ट मेकर ही आधुनिक उपकरणे तिला महत्त्वाची वाटत नाहीत. त्यामुळे कांदा-भाजी कापायला गावाकडून आणलेलं खुरपं तिला अधिक महत्त्वाचं वाटतं.

'आई समजून घेताना' या पुस्तकातील आई म्हणजे आक्का आहे. ही आक्का बोलायला अतिशय रोखठोक आहे. तिचं बोलणं खणखणीत नाण्याप्रमाणं आहे. म्हातारपणी उपवास करणं योग्य नाही, हे वय उपवास करण्याऐवजी सुखानं चार घास खाण्याचं आहे,असं जेव्हा लेखक म्हणतो तेव्हा आक्का म्हणते, मी काय स्वत:साठी उपवास करते ? तुझ्या मुलाबाळांसाठी, तुझ्यासाठी उपवास करते. तुझं चांगलं व्हावं म्हणून उपवास करते. खरे तर उपवास केल्याने काहीही होत नाही. उपवास करणे ही अंधश्रध्दा आहे; परंतु श्रध्दा-अंधश्रध्देचा विचार करण्याऐवजी ही आक्का घरच्यांच्या भल्याचा विचार करते, आपल्या मुलाच्या हिताचा विचार करते. आपण कसेही जगलो तरी आपला मुलगा चांगला जगला पाहिजे, नैतिकता त्याच्यातून गहाळ होऊ नये, प्रामाणिकतेला त्याने तिलांजली देऊ नये, वाईटाच्या मार्गाने त्याने जाऊ नये असे सतत तिला वाटते. त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी नाईलाज म्हणून एखाद्या शेतात ती शेंगा किंवा इतर वस्तू चोरी करण्यासाठी स्वत: जाते; परंतु आपल्या मुलाला मात्र ती चोरी करण्यासाठी पाठवत नाही. मुलाने खूप शिकावं, अशा चोरीच्या भानगडीत पडू नये, असं सतत तिला वाटत राहतं. आपल्या मुलावर तिचा प्रचंड विश्वास आहे. त्यामुळे सुगीच्या दिवसात आक्काला न सांगता तिने जमा केलेल्या थोड्याशा ज्वारीची चोरी लाडू विकत घेण्यासाठी जेव्हा लेखक करतो, तेव्हा चोरीचा आळ ती नवऱ्यावर आणते; परंतु आपल्या मुलावर मात्र आणत नाही. लेखकाचे वडील म्हणजे अण्णा चोरी न केल्याचं वारंवार सांगतात तरी त्यावर आक्काचा अजिबात विश्वास बसत नाही. उलट अण्णा मारतात तेव्हा ही आक्का लेखकाला म्हणते, तू नको घाबरू. रात्रंदिवस कष्ट करेन पण तुला शिकवेन. वाघिण आहे मी, कधी हरायची नाही. दिवसभर रोजगार करेन पण तुम्हाला जगवेन. काहीकाही पोरांना बाप नाही भावत. आपण लक्ष नाही द्यायचं. मी झाडाला झिंज्या बांधून संसार करेन. स्वत: उपाशी राहीन. तुला शिकविन. तू खूप शिक. तुझं तू चांगला जग. लेखकाच्या मनात अशा पद्धतीने ऊर्जेची पेरणी आक्का करते. आपलं जीवन शिक्षणाअभावी वाईट झालं तरी शिक्षण घेऊन आपल्या मुलाने मोठं व्हावं, अशी तिची सार्थ अपेक्षा असते.

या पुस्तकात आक्कामधील हिशोबीपणा जसा अभिव्यक्त होतो, तशी आक्कामध्ये असलेली स्वाभिमानी वृत्तीही अधोरेखित होते. व्यवस्थेने केलेला आक्काचा हा छळ आपसुकच लेखकांपर्यंत पोचतो. लेखकानंही आपल्या आयुष्यात प्रचंड गरिबी अनुभवली. बोर्डिंगमध्ये अधीक्षकांचे कपडे धुतले. त्यांच्या चादरी धुतल्या. त्यातून उरणारा साबण स्वत:च्या कपड्यांसाठी वापरला. हे सर्व करताना लेखकामधील मोठे होण्याचे जिद्दीचे दीप कधी विझले नाहीत. लेखकामधील हा बाणेदारपणा कमी न होण्यामागे आईच्या शिकवणुकीचे धडेच कारणीभूत आहेत, असेच हे पुस्तक वाचताना सतत जाणवत राहते.

या पुस्तकात एका जिद्दी आणि आयुष्यावर प्रचंड विश्वास असणाऱ्या आईचे चित्र अतिशय समर्थपणे साकार झालेले आहे. थांबण्यापेक्षा नव्या जीवनाचे स्वप्न पाहणारी ही आई स्वत:ला कधी निष्पर्ण होऊ देत नाही आणि इतरांनाही निष्पर्ण होण्याची दीक्षा देत नाही. मनाला पालवी देणारी, उगवणाऱ्या नवनव्या उष:कालाशी नाते जोपासणारी ही आक्का सतत मनाचे पुनर्वसन व्हावे यासाठी खंबीरतेचा पाठ उभी करते. निराश होऊन स्वस्थ बसणे तिला अजिबात आवडत नाही. उद्विग्न होऊन नकाराचे अंदाजपत्रक रेखाटत राहणे तिच्या तत्त्वात बसत नाही. वणव्यात उभे राहूनही तिच्यात कधी कडवटपणा येत नाही. तिचे जगणे म्हणजे युद्धाची छावणी झालेली आहे. या छावणीतून ती स्वप्न वजा होऊ देत नाही. हे स्वप्न सौहार्दाचं असते. चांगलं जगणं वाट्याला यावं यासाठीचं असते.

'आई समजून घेताना' या पुस्तकामध्ये व्यवस्थेने जन्माला घातलेला संघर्ष आहे. त्या संघर्षाचं मूर्त रूप लेखक आणि आक्का यांच्यामध्ये दिसून येते. हा सांस्कृतिक संघर्ष अनेक प्रश्नांना आपल्यासमोर उभे करतो. आपल्या भारताची संस्कृती खूप महान आहे, असे सरळधोपटपणे वारंवार बोलले जाते; परंतु नेमकी कुठली संस्कृती महत्त्वाची आणि कुठल्या, कशा संस्कृतीचा आपण गौरव गेला पाहिजे, याबद्दल स्पष्ट मत देण्याचे आपण बऱ्याचदा कटाक्षाने टाळत असतो. अन्याय करणाऱ्यांचीही एक संस्कृती असते. ती संस्कृती आपल्याला अभिप्रेत आहे का? कारण अशीही संस्कृती आपल्या देशात हजारो वर्षांपासून चालत आलेली आहे. 'आई समजून घेताना' या पुस्तकातून आईचे अनेक पातळ्यांवरील जगणे आणि तिचे व्यक्त होणे पाहिले, म्हणजे संस्कृतीचे खरे रूप आपल्याला दिसून येते.

लेखक उत्तम कांबळे यांचं हे चिंतनशील स्वकथन मनाला भिडणारं आहे. आईविषयीचे लेखकाचे निवेदन पाहिले म्हणजे वाचकांना या आईतच आपली आई दिसायला लागते इतकं हे स्वकथन मार्मिक नि प्रांजळ झालं आहे. आईचा आयुष्याकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन, तिच्या जगण्यातील ताणेबाणे आणि आईसोबत संवाद साधताना लेखकाची होणारी घुसमट फार सुंदर नि प्रभावी पध्दतीनं प्रगट झालेली आहे. आई आणि मुलगा या दोन पिढ्यांमधील संघर्ष या पुस्तकात पहायला मिळत असून सुशिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत, ग्रामीण-शहरी, मागासलेपण-पुढारलेपण असे काही महत्त्वाचे कंगोरे या संघर्षाला चिकटलेले आहेत. हा एका कष्टाळू आईचा जिद्दीचा प्रवास आहे. परिस्थितीने अस्तित्वच नाकारलेल्या एका पिढीचा हा एक प्रवास आहे. हा प्रवास लेखकाने अतिशय समर्थपणे आपल्या लेखनीतून चितारला आहे. आईला शब्दात बांधणं कसं कठीण काम आहे, पण हे कठीण कामही लेखकाने लीलया पेललेलं दिसून येते. स्वकथनाच्या रूपात साकार झालेली ही एक सेंद्रीय जीवनाकृती असून मुक्त मनाने गौरव करावा, अशी ही अतिशय सुंदर नि महत्त्वाची कलाकृती मानली पाहिजे. •••

**पुस्तकाचे नांव : आई समजून घेताना**
**लेखक : उत्तम कांबळे**
**प्रकाशक : लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई**
**पृष्ठ : १३०, किंमत : १५०/- रुपये**

# भट्टी पक्षाची असो वा अपक्षाची चकाकते ते 'तांबे'च

**ना**शिक पदवीधर मतदार संघात सत्यजित तांबेच निवडून येणार हे सर्वांनाच ठाऊक होते. त्यासाठी कोणाच्या भाकिताची अथवा कोणत्या पाहणीची गरज नव्हती. सहकार क्षेत्राचा राजकारणासाठी बळकट सोपान तयार करून सत्तेपर्यंत पोहोचणारे महाराष्ट्रात पन्नासेक तर घराणी आहेत. त्यात एक थोरात-तांबे घराणे आहे. या घराण्याला दीर्घ राजकीय परंपरा आहे. या घराण्याने विश्वासार्हता व प्रतिष्ठा प्राप्त केली आहे. या घराण्यात एक-दोन वर्षे नव्हे, तर पन्नासहून अधिक वर्षे विधिमंडळ राखून ठेवले आहे. बाळासाहेब थोरात यांची चाळीस, त्यांच्या सख्ख्या बहिणीचे पती असलेल्या डॉ. तांबे यांची पंधरा अशी ती ५० वर्षे होतात. तांबे यांच्या पत्नीची नगरपालिकेतील कारकीर्द त्यात समाविष्ट केली, की ही वर्षे वाढत जातात. अर्थात, हे थोरात घराण्याविषयीच नव्हे, तर पवार, चव्हाण, देशमुख, शिंदे, पाटील, मुंडे, राणे आदी अनेक घराण्यांपर्यंत नेता येते. सगळ्याच पक्षात कमी-अधिक प्रमाणात घराणेशाही आहेच. सत्तेचे केंद्रीकरण करून ते घराण्यांमध्ये गुंतवण्यासाठी लोक जबाबदार आहेत. लोकशाहीतही त्यांना प्रतिनिधीऐवजी कोणी तरी मालक हात जोडण्यासाठी लागतो. लोकही घराणेशाहीला जबाबदार आहेत. आपणच मालक आहोत आणि आपला कोणी मालक नाही, हे ज्या दिवशी लोक ठरवतील त्या दिवशी सत्तेचे विकेंद्रीकरण करणारी लोकशाही जन्माला येईल. तोपर्यंत आजोबा, मुलगा, नातू आणि पणतू असाच सिलसिला चालू राहणार आहे.

डॉ. तांबे यांनी काँग्रेसने दिलेले तिकिट का नाकारले, यामागे त्याग वगैरे काही नाही, तर आपल्या मुलाला संसदीय राजकारणात जाण्यासाठी त्यांना जागा मोकळी करून द्यायची होती. अर्थात, ही गोष्ट काही लपून राहिलेली नव्हती. संगमनेर विधानसभा मतदारसंघातून सत्यजित निवडणूक लढवू शकले नसते, कारण तेथून मामेबहिण प्रमोट करायची आहे. विखे पाटलांच्या इलाख्यात जाऊन विधानसभा लढवली की पराभव होतो, याचा अनुभव त्यांना आहेच. वडिलांनी वॉटरप्रूफ केलेल्या विधान परिषद मतदार संघाशिवाय त्यांना पर्याय नव्हता. नव्या पर्यायाची वाट पाहण्यात आणि तो मिळण्यात किती वर्षे गेली असती, हे सांगता येत नाही. शेवटी बापाचे संचित मिळवून हनुमान उडी मारायची असेल, तर अपक्ष म्हणून लढण्याशिवाय पर्याय नव्हता. ज्यांच्या अनेक पिढ्या काँग्रेससोबत वाढल्या, काँग्रेसचा एक भाग बनल्या, त्यांना भाजपमध्ये जाण्याचा निर्णय झटपट घेता



आला नसता. डॉ. तांबे यांनी तयार केलेले बहुतेक मतदार काँग्रेसचे आहेत. त्यांना सोडून भाजपमध्ये जाणे जोखमीचे होते किंवा भाजप गेमही करू शकली असती. सगळेच्या सगळे मतदार जे दोन-तीन दशके काँग्रेसबरोबर आहेत ते भाजपबरोबर जाऊ शकले असते का, हाही प्रश्न आहे. काँग्रेसमधील काहींनी अन्याय केला असे तुणतुणे वाजवणे सोपे होते. बंडाला सहानुभूती मिळाली असती. प्रत्येक उमेदवाराचे असेच असते. तिकिट मिळाले की न्याय आणि नाही मिळाले, की अन्याय. काँग्रेसने तांबे पिता-पुत्रावर कारवाई केल्याचा फरक काही पडणार नव्हता. कारण मतदारसंघाची बांधणी खूप चोख होती आणि विरोधी उमेदवार टिकणार नव्हता, हे निकालानंतर स्पष्ट झाले आहे. पक्ष कोणताही असो किंवा नसो; पण भट्टीतून बाहेर पडून जास्त चकाकते ते 'तांबे'च, या उक्तीची प्रचिती आली आहे आणि राजकारण किंवा लोकशाही घराणेशाहीच्या जबड्यातून बाहेर पडत नाही, हेही सिद्ध झाले आहे. महाराष्ट्रात अशी अनेक कुटुंबे सांगता येतील, की त्यांनी स्वतःहून आणि सत्तेसाठी स्वतः ला वेगवेगळ्या पक्षात विभागून घेतले आहे. वडील एका पक्षात तर भाऊ दुसऱ्या पक्षात, एक भाऊ एका पक्षात तर दुसरा दुसऱ्या पक्षात, सासरा एका पक्षात तर जावई दुसऱ्या पक्षात, असा प्रकार आहे. डॉ. तांबे यांच्या मनात जर मोठी पक्षनिष्ठा असती आणि पक्षादेश मानून त्यांनी स्वतःच निवडणूक लढवली असती, तर ते स्वतः निवडून आले असते. याविषयी त्यांच्या राजकीय शत्रूंनाही शंका नव्हती. इथे पक्ष प्रेमाऐवजी पुत्र प्रेम प्रभावी ठरले आणि त्यासाठी वडील किती त्याग करू शकतो, याचेही एक उदाहरण तयार झाले. वडिलांनीही

प्रारंभी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. आता मुलानेही तोच धडा गिरवला. कारण तो अधिक सुरक्षित होता. परिस्थिती अशी आहे, की कोणा एका कुटुंबाला दोष देता येत नाही. भारत जोडो यात्रेत अनेक पुढाऱ्यांनी आपल्या लेकराबाळांना कसे समोर केले, हेही आपण पाहिलेच आहे. काँग्रेसमध्ये या आणि नेतेपद मिळवा, अशी एकेकाळी जाहिरात करणाऱ्या सत्यजित यांनी जेव्हा आमदार होण्यासाठी पोकळी तयार झाली, तेव्हा ती स्वतःच भरून काढली. त्यांच्यावर विश्वास टाकून पक्षात राब राब राबणाऱ्या कोण्या सच्च्या कार्यकर्त्याला ही संधी दिली असती, तर महाराष्ट्रात सत्यजित ऐवजी त्यागजित निर्माण झाला असता. अर्थात, ही झाली कवी कल्पना. कारण राजकारण त्यागावर नव्हे, तर स्वार्थावर उभे असते.

# सरकारी शाळांचा अजून किती भो ऽऽऽ...



वर्ष मावळायला लागलं, की अनेक गोष्टींचे वार्षिक अहवाल बाहेर पडतात. काही पाहणी अहवाल असतात. एखादी गोष्ट कोणत्या गतीने आणि गुणवत्ता घेऊन निघाली आहे, यावर उजेड टाकण्याचा प्रयत्न असतो. काही अहवाल सरकार तयार करते, काही सरकारनं नेमलेल्या एजन्सी करतात, तर काही भांडवलशाहीचा पाळणा हलवत ओव्या म्हणणाऱ्या एनजीओ तयार करतात. असे अहवाल तयार करण्यास ते समाजकार्य मानतात. या कार्याचा मोबदला त्यांच्याकडे कोठून तरी जमा झालेला असतो. अशा एनजीओंची संख्या पावलीला पायलीभर या प्रमाणात वाढत चालली आहे. आपलं शिक्षण, आरोग्य आणि अजून काही काही तरी या संस्थांची आवडीची क्षेत्रं असतात. महाराष्ट्रातील सरकारी शिक्षणाचा अभ्यास करून अहवाल प्रसिद्ध करण्याची चढाओढ सुरू असते. असे अहवाल प्रसिद्ध झाले, की व्यवस्थेवरचा विश्वास डळमळायला लागतो. मग अनेक पालक गोठ्यातली जनावरं विकून आपली पोरं खाजगीत टाकतात. खाजगी म्हणजे गुणवत्ता आणि सरकारी म्हणजे गुणवत्ताहीन, असा एकदा सिद्धांत करून तो रुजवला म्हणजे सरकारी क्षेत्रं आचक्याउचक्या घ्यायला लागतात आणि खासगी क्षेत्रं बाळसेदार बनतात. अर्थात, हे सर्वच खोटं आहे अशातला भाग नाही. प्रश्न आहे तो सरकारला चोची मारून म्हणजे सरकारी क्षेत्राला बदनाम करून कल्याणकारी राष्ट्र चालवता येत नाही. सरकारने सार्वजनिक शिक्षणाची हमी घेतली आहे. त्यापासून सरकार दूर जाईल किंवा तसे वातावरण तयार होईल, असा प्रयत्न भांडवलशाहीच्या हितासाठी करणे उचित नाही. ज्या त्रुटी असतील त्या दाखवणे योग्यच आहे; पण त्यातून मार्ग काढून सार्वजनिक क्षेत्राची विश्वासार्हता वाढवणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. सरकारी शाळांची तपासणी करू नका, असे कोणी म्हणणार नाही; पण त्यांच्या नाकावर टिच्चून उभ्या राहिलेल्या आणि गाजरगवतासारखं वाढत जाणाऱ्या शाळांरूपी दुकानांचं काय करायचं, हा प्रश्न उरतोच. भांडवलशाहीच्या टॉनिकवर पोसल्या जाणाऱ्या एनजीओ त्याचा विचार करत नाहीत.

असाच एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे आणि तो आहे महाराष्ट्रातल्या सरकारी आणि खाजगी मराठी शाळांबाबतचा. इंग्रजीची अशी छाननी होत नाही. कारण त्या धनदांडग्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या असतात किंवा कोणातरी एनजीओंच्या असतात. तर नव्या अहवालात चिंताजनक वाटाव्यात अशा काही गोष्टी प्रसिद्ध झालेल्या आहेत. पाहणीत त्या आढळल्या आहेत. अर्थात, हे काही नवं नाही. कोणीही चौकात उभं राहून 'सरकारी शाळांची गुणवत्ता ढासळतेय' असं ओरडलं, की ते खरंच ठरतं. वास्तव तेच आहे. प्रश्न आहे तो ते कुणामुळे तयार होतं आणि कसं बदलायचं? त्यासाठीची इच्छाशक्ती कोणाकडे आहे. भांडवलशाहीच्या पालखीत बसलेल्या सरकारकडे आहे, की असाह्य बनत चाललेल्या समाजाकडे आहे, की पगारी एनजीओंकडे आहे? तर नवा अहवाल काय सांगतो आणि कोणत्या भारताचं चित्र उभं करतो आणि इंडियाशी त्याची स्पर्धा कशी लावतो, हे पाहू या. अहवालात पुढील गोष्टी अधोरेखित केल्या आहेत. १) पहिली ते आठवीपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना मराठी वाचता येत नाही किंवा वाचलेलं कळत नाही. २) तिसरीतील पोरं ज्यांना इंग्रजी शब्द वाचता येतात; पण अर्थ कळत नाही. ३) पाचवीतील विद्यार्थ्यांना बेरीज-वजाबाकी येत नाही. ४) आठवीत गणित सोडवू शकणारे विद्यार्थी जुजबी आहेत. ५) तिसरीतल्या पोरांना दुसरीचा धडा वाचता येत नाही. याशिवाय अनेक गोष्टी त्यात आहेत; पण सारांश काय, तर शिक्षणाची गुणवत्ता ढासळते आहे. पायाला वाळवी लागते आहे. महाराष्ट्राबरोबरच भारतातील शाळांचा सर्व्हेही अहवालात आहे. एकीकडे मराठीसाठी आक्रोश करणारे, काही करिअर करणारे लोक व संस्था आणि दुसरीकडे मराठी म्हणजे मातृभाषा वाचता न येणारे विद्यार्थी, असा हा मामला आहे. मराठीच्या नावानं कुणीतरी रडल्यासारखं करायचं आणि सरकारमधील कारभाऱ्यांनी सगळंच मराठीत आणू, असं सांगत डोळे पुसण्याचं नाटक करायचं, असं चित्र उभं राहतं. प्रत्यक्षात ना कोणी रडतं ना कोणी डोळे पुसायला येतं.

अहवालात एक चांगली गोष्ट वाचायला मिळते आणि ती म्हणजे खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. अर्थात, हे खरं असलं तरी त्यामागची कारणे गुलदस्त्यातच आहेत. मोठ्या फीमुळे संख्या घटली, की तेथील गुणवत्तेला ग्रहण लागल्यामुळे घटली, हे काही समजत नाही. शिक्षणाच्या खाजगीकरणानंतर अनेक ठिकाणी गोठ्यात, पत्र्याच्या शेडमध्ये किंवा झाडाखाली खाजगी शाळा चालू झाल्या आहेत. 'कमवा आणि खा' हे सूत्र त्यामागं असल्याकारणाने कोणीही शाळा सुरू करायला पुढं आलं. दारुची दुकाने चालवणारे,

गुटखा विकणारे, वाळूत कमी सिमेंट मिसळणारे, स्वतः शिक्षक असलेले अनेकजण पुढे आले आहेत. या सर्वांना गुंतवणूक न करता नफा कमवायचा होता. या साऱ्याचा परिणाम अगदी अलीकडे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असणार असा अंदाज बांधता येतो; पण या सर्वांना दारुच्या दुकानासाठी जसं परमिट मिळतं, तसं शाळा चालवायचं परमिट सरकार का देत होतं आणि देत आहे, या प्रश्नाचा शोध लागत नाही. शिक्षण पायाभूत विषय आहे. ज्याच्यावर समाज आणि राष्ट्र उभं राहतं, तो असा कोणत्या तरी चक्रव्यूहात अडकवला जात असेल आणि निकृष्ट व उत्कृष्ट शिक्षण अशी विभागणी होत असेल, तर तळात चिकटलेल्या समाजानं जायचं कुठं, हा विषय तयार होतो. त्याचंही उत्तर नव्या व्यवस्थेकडे आहेच. तळ्यातल्यांनाही सेवा क्षेत्रात जायचं. टर्नर, फिटर, वेल्डर व्हायचं आणि वरच्या मूठभरांनी सिलिकॉन व्हॅलीमध्ये जायचं, असं घडतं आहे. सिलिकॉन व्हॅलीत गेलेल्यांचे पालक रोज मातृभाषा वाचवा, असे गळे काढतात आणि ती वाचवण्याची जबाबदारी तळात धडपडणाऱ्या आणि खिचडीत शेंगदाणे मोजणाऱ्यांवर सोपवतात. यांची पोरं इंग्रजीत घुसतात आणि काही पालकांना शासनाच्या भाषाविषयक समित्यात सन्मानाच्या जागा मिळतात. कोण आहेत या समित्यांत जरा कुळीमुळी तपासा ना! पालकांनी आपल्या पोरांना कुठं न्यायचं हा त्यांचा अधिकार आहे असं मान्य केलं, तरी बहुसंख्य पाच-पाच वर्षे शाळेत जाऊनही बे चा पाडा म्हणू शकत नसतील. तर या सर्व पापाचे धनी त्यांना शिकवणाऱ्या आणि त्यांच्या गावात कधीही न राहणाऱ्या, वेगवेगळ्या एजन्सी चालवणाऱ्या शिक्षकांसह वरच्या टोळीवाल्या कारभाऱ्यांसह सर्वच जबाबदार आहेत.

## देशभरात पसरतेय आता नोकऱ्या बदलण्याची साथ...

भारतात आणि एकूणच जागतिकीकरण-खाजगीकरणाच्या प्रक्रियेत कोणत्या लाटा कधी येतील आणि 'किनारा तुला पामराला' या कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओळीला भेदून किनारा पार करत नागरी वसाहतीत कधी घुसतील याचा नेम राहिलेला नाही. सध्या जगात बेकारीची लाट प्रचंड स्वरूप धारण करते आहे. कोट्यवधी तरुण रिकामे मनगट आणि मन घेऊन फिरत आहेत. नव्यांना नोकऱ्या नाहीत आणि ज्यांच्याकडे होत्या त्या खाजगीकरण, यांत्रिकीकरण आणि अधिक नफा कमावण्याच्या शर्यतीत गायब होत आहेत. बेकार झालेले काहीजण आत्महत्या करत आहेत, काही गुन्हेगारी जगतात जात आहेत, तर काही बुवाबाबांच्या नादाला लागत आहेत. औद्योगिक क्रांतीच्या वेळी ज्या संस्थांत खूप मजूर किंवा कामगार त्या प्रसिद्ध मानल्या जायच्या. लाखो कामगारांना सामावून घेऊन उद्योगधंदे करणाऱ्या कंपन्या जगात होत्या. माणसाच्या जागी यंत्र आलं. माणसाच्या जागी नफा आला. कंपन्यांमध्ये कामगारांचा वावर कमी होऊ लागला. त्यांची जागा रोबोटने, यंत्रांनी घेतली. यांत्रिकीकरणाने पहिला हल्ला केला तो माणसाच्या तोंडात जाऊ पाहणाऱ्या घासावर. जेथे माणसाचा घाम गळायचा आणि त्याला कोरभर भाकरी मिळायची त्या जागा



भांडवलशाहीने यंत्राला दिल्या. कमीत कमी कामगार म्हणजे जास्तीत जास्त नफा हे सूत्र पुढं आलं आणि बेकारी नंगी होऊन नाचू लागली. रोज किती लोकांना नोकऱ्या लागल्या याऐवजी रोज किती नोकऱ्या गेल्या, याचेच आकडे आपण वाचत आहोत. बेकारीचा शेवट काय, महागाईचा शेवट काय, भांडवलशाहीचे शेवटचे मुक्कामाचे ठिकाण कोणते आणि तेथे कोण असणार आदी प्रश्न रोज चघळत, लाळ गाळत आपण पुढे जात आहोत. कुत्र्याच्या तोंडात असलेल्या हाडासारखे हे आहे. कोणताही कुत्रा पोट भरते म्हणून हाड चघळत नाही, तर लाळ गळते म्हणून चघळत असतो. लाळ गळल्यामुळे पोट भरल्यासारखा भ्रम होतो. या भ्रमातच कुत्र्याप्रमाणे अनेक बेकार जगत आहेत. ते देशाचे नागरिक आणि मालक आहेत. 'आम्ही भारतीय लोक' असं राज्यघटनेत त्यांच्यासाठी अगदी प्रारंभीच लिहून ठेवलंय.

बेकारीच्या दाहकतेबद्दल, तिच्या चटक्याबद्दल चर्चा चालू असतानाच दुसरी एक बातमी भारतात येऊन धडकली. अर्थात, ती भारतातीलच बातमी आहे. कुणाला ती आश्चर्यकारक वाटेल, कुणाला धक्कादायक, तर कुणाला आपण नेमके कुठं निघालो आहोत, असा प्रश्न विचारणारी असेल. भारतात खाजगी क्षेत्रात ज्यांना नोकऱ्या लागल्या, जे सध्या नोकऱ्या करत आहेत अशांपैकी ९० टक्के लोक आपली सध्या असलेली नोकरी सोडून नवी नोकरी पकडण्याच्या विचारात आहेत. अशामध्ये साठ-सत्तर टक्के तरुण आहेत, ज्यांना अलीकडेच नोकरी लागली आहे. बाकी चाळीशीच्या पुढे आहेत. हा निर्णय अशा परिस्थितीत घेतला जातोय, की ज्यावेळी नव्या नोकऱ्या तयार होण्याचे प्रमाण सुमारे तीस टक्क्यांनी घटले आहे. अशा वेळी नोकऱ्या सोडण्याचा निर्णय आणि नव्या नोकऱ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न धाडशीच म्हणावा लागेल. अर्थात, हे धाडस आपोआप आलेले नाही, तर लादले गेले आहे. एक प्रकारची सक्ती तयार करण्यात आली आहे. भविष्यावर कोणी तरी काळा रंग अंथरला आहे, असे काही या लोकांना वाटते आणि ते खरेही आहे. कर्ज काढून अतिशय कष्टानं ज्यांनी शिक्षण घेतलं, त्यांना नोकऱ्याही कष्टानेच मिळाल्या आहेत. काही का असेना; पण नोकरी मिळाली या आनंदात ते होते. पीएच.डी. झालेल्यांना शिपायाची नोकरी मिळाली, एम.ए. झालेला मजुराचं काम करू लागला, तर काही कंपन्यांतील नोकऱ्यांवर खूश होते. नोकरी मिळताच काहींनी लग्ने केली. काहींनी चार-पाचशे फुटांचं घर घेतलं, काहींनी मोटार घेतली. या सर्वांनाच वाटत होतं, की पुढे मागे आपला पगार वाढणार आहे, बढती मिळणार आहे. वेगवेगळ्या गोष्टींत कर्ज काढून, व्याज

भरून केलेली गुंतवणूक फळाला येईल; पण तसं घडणार नव्हतं. नोकरीच्या वेळी मिळालेला आणि सुरू झालेला पगार जागच्या जागीच अडकला. त्याला पाय फुटले नाहीत. शेंबडात माशी अडकावी त्याप्रमाणं विशिष्ट आकड्यांतच पगार अडकला. आहे त्या पगाराच्या थोबाडीत मारण्यासाठी महागाई आली. नोकरकपात आली. लांब लांब पल्ल्यांवर आहे त्या पगारावरच बदल्या आल्या. प्रारंभी दिलेल्या अनेक सोयी सवलती काढून घेण्यात आल्या. कामाचे तास वाढविण्यात आले. कर्जाचा हप्ता थकायला लागला आणि व्याज वाढायला लागले. पगार वाढवून द्या असं जो कोणी म्हणेल त्याला नोकरी सोड, तुझ्यापेक्षा कमी पगारात नोकरी करू पाहणारे अनेकजण रांगेत आहेत. म्हणजे बसमध्ये यायची संधी आहे; पण बसायला जागा नाही. किती वेळ ताटकळत उभं राहायचं, याचं गणित नाही. विशेष म्हणजे, आहे ती नोकरी कंत्राटी. कंत्राट संपत आलं, की नवे नियम, नव्या अटी. नोकरीविषयी कसलीही शाश्वती नाही. तिची एक्सपायरी डेट नाही. अशा परिस्थितीत एक दोन नव्हे, तर कोट्यवधी नोकर, कामगार अडकले आहेत. नोकरी लागल्यामुळे जन्माला आलेली अनेक रंगीबेरंगी स्वप्ने सुकू लागली, मतिमंद-अपंग होऊ लागली. आता काय करायचं? सरकारी क्षेत्रात दहा जागांसाठी एक लाख स्पर्धेत उतरले आहेत. अशा नोकऱ्यांच्या नादाला लागून अनेकांनी आपलं वय गमावलंय. रांगेत राहून अनेकांनी आपल्याच मुठीतील स्वप्नं स्वतःच जोर लावून चुरगळून टाकली आहेत. जणू काही स्वप्न पाहणं धोकादायक, सपना देखना मना है... वगैरेसारखं. खाजगीत नोकरी करणाऱ्यांचं नोकरी लागूनही असंच घडत आहे. फिक्स पे मध्ये किंवा लंगडत चालणाऱ्या पगारामध्ये आता काही भागात नाही म्हणून थोडाफार पगार वाढवून देणाऱ्या दुसऱ्या कंपन्यांमध्ये जाण्याचा विचार ते करत आहेत. अर्थात, तेथेही श्रम शोषणारी नवी भांडवलशाहीच आहे. ती कामगारांना बरं वाटावं म्हणून मोठमोठी पदे देते आणि पगारवाढीचा प्रश्न आला, की मौनात जाते. बाहेरचा रस्ता दाखवते. नोकरीतून काढून टाकण्यासाठी कोणता निपत्र-कायदा वापरला जात नाही. कारण तो फेकून देण्यात आला आहे. वर्षानुवर्षे लढवून मिळवलेल्या कामगार कायद्याची वाट लागली आहे. बेकायदेशीरपणे कामाचे तास वाढवून, आहे त्या पगारात शोषण केलं जातं. प्रतिकार केला, प्रश्न विचारला की नोकरी गेली. जागतिकीकरणातले हे नवे गुलाम आहेत. कधीही नोकरी सोडण्याचा आणि कुठंही हात पसरत जाण्याचा त्यांना हक्क आहे. नवे गुलाम कोणा एकाच्या सात-बारावर नाहीत. त्यांचे मालक सतत बदलत राहतात. जसे की, आताचे कंत्राटी कामगार आपला मालक बदलण्याचा विचार करत आहेत. कोणी तरी नवा मालक येईल आणि फाटलेल्या पगाराला ठिगळ लावेल, निदान रफू तरी करेल, अशी त्यांची स्वप्ने आहेत. या सर्वांनी स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांना म्हणजे या स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांना नवं सरोवर मिळणार आहे, का गवतानं भरलेलं नवं कुरण मिळणार आहे, हा प्रश्न पुन्हा वेताळासारखा लटकलेलाच राहणार आहे. कोणत्या गावात या असहाय्य पक्ष्यांचं आणि तुटपुंज्या पगारात जगताच येत नाही, असा टाहो फोडणाऱ्या पक्ष्यांचं काय होईल सांगता येत नाही. फक्त आणि फक्त त्यांचेच चेहरे टिपण्यासाठी व्यवस्थेकडे सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. एक तर हे पक्षी लज्जास्पद होऊन चेहरे लपवत जातील किंवा त्यांना तसं भाग पाडलं जाईल. नोकऱ्या आणि पगार आकसण्याच्या काळात, यंत्रासारखा तगडा स्पर्धक मैदानात उतरल्याच्या काळात या सर्वांचं काय होणार, याचा विचार ना राज्यघटनेत आहे, ना लाल किल्ल्यावर आहे, ना कोणत्या पक्षाच्या अजेंड्यावर आहे! धुमसता असंतोष किती काळ धुमसतच राहणार आहे, याचं गणितही कुणाकडे नाही. पक्ष्यांकडे तर नाहीच नाही. कारण प्रश्न विचारला, की नोकरी जाते.

# उर्फीच्या तंग कपड्यांनी पुरवलं राजकारणाला खाद्य



राजकारण म्हणजे कधी कधी महाभारतातला बकासूर बनतं. त्याला खायला रोज गाडीभर अन्न आणि एक माणूस लागतो. खाद्य नाही मिळालं, की ते काहीही खातं... अगदी एखाद्या चावट नटीच्या तंग कपड्यावरही त्याचं भागतं... अलीकडे राजकारणात प्रश्नांचा दुष्काळ आणि प्रतिक्रियांचा सुकाळ आहे. कुणाला काहीही प्रतिक्रिया देता यावी यासाठी कधी कृष्णेकाठी, कधी मुळेकाठी, कधी गोदेकाठी तर कधी चंद्रभागेकाठी राजकारणाला चेतना मिळेल अशा भावनांचा मोठा खेळ मांडला जातो. सर्व स्तरांतील लोकांना त्यात विनाशुल्क प्रवेश मिळेल अशी व्यवस्था केली जाते. कल्याणकारी राज्यात असं करावंच लागतं. काहींना तर उपलब्ध कमी वेळेत खूप मोठं करायचं असतं. शेवटी भावना या भरती-ओहोटीसारख्या असतात. त्यांनाही ओहोटी लागते. त्या कोरड्या व्हायला लागतात. आता काय पुढं, असाही प्रश्न तयार होतो; पण जात्याच प्रतिभावंत असलेल्या राजकारण्यांना विषयांचा दुष्काळ जाणवला तरी ते कुठं तरी झरा काढतात. त्यातून पाणी उपसतात. ते राजकारणात आणतात. अलीकडे राजकारणात महापुरुषांना, त्यांना सुशोभित करणाऱ्या उपाध्यांना, साधू-संतांना आणण्यात आलं. त्यावरून महाराष्ट्र ढवळून निघाला. प्रत्येक जण आपापला इतिहास आपापल्या सोयीचा करू लागला. जर दिल्लीने

इतिहास विषयावर सामान्यज्ञानाची स्पर्धा घेतली, तर महाराष्ट्रात परीक्षाकेंद्रे कमी पडतील. खूप लोक परीक्षा देतील. आपलाच इतिहास सच्चा आणि पक्का आहे, असं सांगतील. शेवटी इतिहास वगळला, की आपल्या राजकारण्यांकडे काय शिल्लक राहील देवा! तर इतिहासाचा अध्याय कमी होऊ लागला तसा राजकारणाला कुण्या नटीच्या तंग कपड्याचा खुराक पुरवण्यात आला. त्यावर काही काळ रवंथ करण्यात आलं.

संस्कृतीरक्षक असलेल्या काहींनी उर्फीचे चक्क कपडे शोधून काढले आणि अशा तंग, लक्ष्यवेधी, भडक कपड्यांमुळे संस्कृतीची आणि महिलांच्या प्रतिमेची किती हानी होतेय, यावर चर्चा सुरू झाली. तंग कपड्याचं प्रकरण रोज छोट्या टी.व्ही.वर गाजू लागलं, महिला आयोगात गेलं, पोलिसांत गेलं, हळूहळू धर्मात शिरू लागलं. या प्रकरणानं राजकारणालाच नव्हे, तर कुपोषित होऊ पाहणाऱ्या माध्यमांनाही टॉनिक दिलं. प्रकरण काय थांबायचं नावं घेत नव्हतं. डाव्या, उजव्या, पुरोगामी पक्षातून या प्रकरणाने प्रवास केला. भूगोलाने आणि इतिहासाने महान असलेल्या महाराष्ट्रात उर्फी प्रकरणामुळे बाकी काहीका नसेना; पण राजकारणात वस्त्रसंस्कृती घुसवायला, ती धू धू धुवायला, आपटायला अनेकांना संधी मिळाली आणि ती त्यांनी घेतलीही. वस्त्र प्रकरण समाजात, राजकीय पक्षांत विभागलं. त्याचे काही फायदे-तोटेही झाले. उघडी-नागडी फिरू नकोस, असा उपदेश करण्यापासून ते संस्कृती रक्षणापर्यंत अनेक विषय राजकीय फडात रंगले. खरे तर आपल्या देशात उर्फीच तंग कपडे घालते, लक्ष्यवेधी कपडे घालते, असे समजण्याचे कारण नाही. जर रस्त्यावरचे सीसीटीव्ही कॅमेरे पाहिले, तर लाखो उर्फी दिसतील; पण त्यांना पाहायचंच नाही असं ठरवलं असेल तर? तंग कपड्यांचं एक युगच आपल्याकडे आले आहे. समुद्राच्या किनाऱ्यापासून ते मॉलपर्यंत पसरलेलं ते कुणालाही दिसतं. दिवसभर नुसतं भाडभाड बोलणाऱ्या बायांनाच ते दिसत असंल, असं कोणी समजणार नाही. प्रश्न तंग कपड्यापुरता किंवा कोणा एका उर्फीपुरता किंवा सतत बोलणाऱ्यापुरता मर्यादित असता, तर गोष्ट वेगळी होती; पण हा प्रश्न गेली काही वर्षे अदृश्यपणे, अप्रत्यक्षपणे, जाणीवपूर्वक लादल्या जात असलेल्या सांस्कृतिक कलहाचा आहे. काश्मीर फाईल काय, आरत्या-महाआरत्या, भोंगा काय हे सारे घटक आपल्याला सांस्कृतिक युद्धाकडे नेतात. आपण त्याला बळी पडायचं का, हा ज्याचा त्याचा प्रश्न. •••

**– तात्या विंचू**

पान ३० वरून...


# शांताबाई कृष्णाजी कांबळे

इतके दारिद्र्य असूनही ते मुलीच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतात. मुलींच्या परीक्षेसाठी वडील व्याजाने पैसे काढून ज्वारी आणतात व तिच्या जेवणाची व्यवस्था करतात. मुलीच्या शिक्षणासाठी खर्च करता यावा म्हणून जेवणाखाण्यावरील खर्च कमी करताना दिसतात.

शांताबाईंच्या वडिलांना मुलाची अपेक्षा असताना तिसरी मुलगीच जन्माला येते तेव्हा ते तिला (शांताबाईला) जिवंत गाडण्यासाठी नेत असतात; पण आईमुळे ती वाचते. पारंपारिक हिंदू मानसिकता डोक्यामध्ये भिनलेली असल्यामुळे मुलीचा जन्म त्यांना ओझे वाटतो. वय वाढेल तसे शांताबाई आईला घरकामात मदत करतात. वडिलांपेक्षा आईची भूमिका प्रभावी दिसते. ''पोरीची शाळा पुरी करा. तिला मास्तर नवरा करून द्या. माजी आन हाय तुम्हाला'' असे ती मरताना आपल्या नवऱ्याला सांगते. शांताबाई साध्या शिक्षिकेपासून नोकरीला प्रारंभ करतात. वेळोवेळी जात या घटकामुळे ग्रामीण भागातील सवर्ण व्यक्ती त्यांच्या बदलीचा आग्रह धरीत असतात; परंतु शांताबाई त्या ठिकाणी अधिक मेहनतीने उत्कृष्ट स्वरुपाचे कार्य करून त्यांचा आग्रह अनाठायी असल्याचे सिद्ध करतात. त्यांच्या प्रौढ शिक्षण वर्गाला शिक्षण अधिकाऱ्यांच्या वतीने शाबासकी मिळते आणि लोकांच्या मनामध्ये परिवर्तन होते. शांताबाई या जशा पहिल्या दलित लेखिका त्याचप्रमाणे त्या सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या दलित शिक्षिका आहेत. शिक्षिका असूनदेखील त्यांना जातीयतेचे चटके सहन करावे लागतात. त्यांना पिण्यासाठी पाणी भरू दिले जात नाही. महार समाजातील म्हणून सीता कासारीन बांगड्या भरण्यास नकार देते. शिक्षण विस्तार अधिकारी होऊनदेखील राहायला जागा मिळत नाही; परंतु आई-वडील कांबळे गुरुजी (शांताबाईचे गुरु) महाजन मास्तर, गनी मास्तर, पाटील मास्तर व मास्तरीणबाई, यशवंत बापू, ग. दि. कुलकर्णी, देशमुख यांसारख्या चांगल्या लोकांनी त्यांना प्रेरणा आदी प्रोत्साहन दिले.

शांताबाई शिक्षिका झाल्यावर त्यांचा कृष्णाजी कांबळे यांच्याबरोबर विवाह होतो. ते आटपाडीच्या शाळेवर शिक्षक होते. ते करगणी या गावचे. शिकविण्यात हुशार होते. त्यांचा आवाज गोड होता; परंतु स्त्रियांविषयी त्यांचे वर्तन फारसे चांगले नव्हते. कारण लग्नातच एक स्त्री मास्तरनं माझं वाटोळं केलं, असं म्हणत गोंधळ घालतात. दुसरं म्हणजे शांताबाई गरोदर असताना ते मामेबहिणीशी लग्न करतात आणि शांताबाईला म्हणतात, मी तुलाही वागवीण घाबरू नकोस असे उपकार केल्याच्या आविर्भावात ते बोलतात. स्त्रीला अबला, भोगवस्तू मानणाऱ्या हिंदुत्ववादी परंपरेचा प्रभाव त्यांच्यावर होता, हेच दिसून येते. मनुवादी व्यवस्थेचे ते पाईक आहेत. स्त्रियांशी आपण कसेही वागलो तरी ते उपकारच असतात, अशी त्यांची वर्तणूक दिसते. ते शांताबाईंशी निष्ठेने वागत नाहीत; परंतु शांताबाईंनी आपली निष्ठा आयुष्याच्या अखेरपर्यंत सोडली नाही. आज त्या आपल्याला सोडून गेल्या. राहिल्या त्यांच्या फक्त आठवणी... •••

**(लेखक साहित्याचे अभ्यासक असून जयसिंगपूर कॉलेजमध्ये मराठी विभागप्रमुख आहेत.)**



# गांधी म्हणजे...

गांधी म्हणजे, असं काही जे आधी नव्हतंच
मारता येत नाही आणि मरतही नाही
असा एक हाडका माणूस

जुन्या रेषेवर घट्ट नवी रेषा
अजून ठळक अजून स्पष्ट
सार्वजनिक भिंतींवर काच तुटलेल्या फोटुत
दिसणारा इसम गांधी नाहीच

शहरातल्या सामसूम चौकातील
काठी घेऊन उभा असलेल्या दगडात
गांधी नाही
नोटांवर तर नाहीच नाही...

गांधी वाहत असतो अहिंसेच्या नितळ प्रवाहात
राबवत असतो विषमतेच्या वाटेवर
समतेचे प्रयोग
माणसं जोडून नेणाऱ्या होडीला
दाखवत असतो किनारा
अंधाराचे रस्ते बदलून साद घालतो उजेडाला

आंतरिक युद्धाच्या धुळवडीत
एकटं चालणं म्हणजे गांधी

गांधी मेलाय ही निव्वळ अफवाच
या मातीतल्या अणूरेणूत
आहेत जीवंतपणाचे बीज
गांधी कायमचा मिसळलाय या बीजांच्या गुणसूत्रात

शेवटच्या माणसाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पाहणाऱ्या
महात्म्यास
क्रांतिकारी जय भीम!

**– हेमंत दिनकर सावळे,**
जि. वाशिम



# तुकडे–तुकडे

त्यांनी प्रश्नपत्रिकेवर नजर टाकली
कठीण प्रश्न बाजूला ठेवले
सोप्या प्रश्नांना हात लावला
आणि केले पांढऱ्यावर काळे
दंगल शांततेत पार पडावी त्या
सहजतेने

गंजत चाललेल्या
आपल्या पडिक आवाजाची
जाणीव होताच
त्यानं हळूच
धर्माचा भोंगा लावला

तो इतका मठ्ठ
चेहऱ्यावरून माशीही उडवता
येत नाही
मात्र भावना भडकल्या, की
व्हियाग्रा खाल्ल्यासारखा वागतो

धरणीकंप झाला तरी
अगदी शांत झोपतो
त्याची शेषनागावर श्रद्धा आहे

धर्माच्या रक्षणासाठी
अधिकाधिक मुलं जन्माला
घातली पाहिजे

संन्यासी बाईच्या या वाक्यावर
एक संसारी पुरुष धार मारून गेला

आताशा दचकून उठतो झोपेतून
आयुष्य खंड–खंड होत
चालल्याची जाणीव
व्हरांड्यात मारते एरझाऱ्या
आणि तू आहेस की
घोरत राहतेस... अखंड स्वप्नात

**– मेघराज मेश्राम,**
नागपूर

**आजकाल लोकमान्य लेखकांसाठी, एक बरे झाले आहे, हयात माणसांपेक्षा, त्यांनी रचलेल्या पात्रांना, महत्त्व आले आहे**

ती जेवढी जुनी
तेवढी होत जातात गुणी,
दोषांवर पांघरूण,
गुणगानच तेवढे आणि

भजले जाणे,
पूजले जाणे
त्यांच्यावर रचले
जाणे गाणे

लोकमान्य असतील जी
त्यांच्याच साऱ्या कथा, कहाण्या, पडदे
भरभरून त्यांच्या लाटांवर लाटा आणा

रचलेल्या पात्रांवर
रचलेले उद्योग
छान चालतात हे
दूरदूर पसरतात

जिवंत माणसांकडे त्यामुळे लक्षच द्यावे
लागत नाही,
त्यांचे कुठलेही मागणेच दिसत नाही,
तेही विसरतात, हेही विसरतात

तेही घसरतात,
हेही घसरतात
हवे तेच, हवे तसेच
संदेश पसरतात

धुंदीत जगतात,
धुंदीत मरतात
धुंदीतच भरतात मग
लोक, गळ्यात घोषणा

लोकमान्य लेखकांना
एकूणच
बरे दिवस
आले आहेत ना?

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

# वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा

सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक - ४) / (६ महिने - २)

**चेक किंवा डीडी ने पेमेंट**

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ---------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : --------------------------------------------------पत्ता : ----------------------------

-------------------------------------------------- शहर : ------------------------------------

राज्य : ---------------------- पिन कोड : ------------------- फोन नं. (घर) : -------------------------

मो. नं. : ---------------------- इ-मेल : ----------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

